रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १८७ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹

## कल्याण-तळोजा फक्त ४५ मिनिटांत

**पनवेल :** मुंबईसह संपूर्ण महानगर प्रदेशात मेट्रोचे जाळे उभारण्यात येत आहे. मुंबई शहरासह ठाणे, कल्याण येथेही मेट्रोचे काम जोरात सुरू आहे. एमएमआरडीएमार्फत उभारल्या जात असलेल्या मुंबई मेट्रो लाइन-१२ (कल्याण ते तळोजा) प्रकल्पानं एक मोठी कामगिरी पूर्ण केली आहे. शिळफाटा रोडवरील डोंबिवली एमआयडीसी मेट्रो स्थानकाजवळ १०० वा गर्डर यशस्वीरित्या लाँच करण्यात आला आहे. या मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामात हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून यामुळं प्रकल्पाला आणखी गती मिळणार आहे. कल्याण ते तळोजा मेट्रो मार्ग हा सुमारे २३.५७ किमी लांबीचा उन्नत मार्ग असून या मार्गिकावर १९ मेट्रो पान २ वर

## स्कूटीच्या धडकेने वयोवृध्दाचा मृत्यू

**रसायनी :** रसायनीतील पराडे आदिवासीवाडी समोरील मोहोपाडा ते पराडे जाणाऱ्या डांबरी रस्त्यावर ७२ वर्षीय वयोवृध्दाचा अज्ञात स्कूटीच्या धडकेने मृत्यू झाल्याची घटना घडली. रविंद्र शांताराम मोरे हे पराडे आदिवासीवाडी समोरील डांबरी रोडवर रस्ता ओलांडत असताना पराडे बाजूकडून येणाऱ्या अज्ञात स्कूटीवरील चालकाने त्याच्या ताब्यातील स्कूटी भरधाव वेगाने चालवून रविंद्र शांताराम मोरे यांच्या पायाला ठोकर देवून अपघात केला. तसेच त्यांना रोडच्या बाजूला उभे करून निघून गेला. यावेळी रविंद्र मोरे यांना चक्कर येऊन ते खाली पडले असता पोलिसांनी त्यांना ग्रामीण रूग्णालय चौक येथे औषधोपचारासाठी नेले. पान २ वर

## वेधक

### सायबर गुन्ह्यातील आरोपी अटक

**पनवेल :** पनवेल शहर पोलीस स्टेशन सायबर पथकाने सायबर गुन्ह्यात ५ लाख १४ हजार ५०० रुपयाची फसवणूक करणाऱ्या आरोपीला अटक केली आहे. फिर्यादी संतोष अस्वले यांनी टाटा स्टीलची खरेदी करण्याकरीता गुगलवर नंबर शोधून आरोपी यास ऑर्डर देऊन त्यांना आरोपी याने खोटे इन्व्हाईस पाठवून त्यांची एकूण ५,१४,५०० इतके रुपयाची फसवणूक केली होती. या गुन्ह्याचा तांत्रिक तपास करून टाटा स्टील मॅन्युफॅक्चरिंग प्लांट या कंपनीच्या नावाने मोबाईल क्रमांकमध्ये अपलोड केलेला आरोपी सूर्यांश सहज सिंह याचे लोकेशन सुलतानपूर पान २ वर

### २ कोटीचा गुटखा नष्ट

**पनवेल :** नवी मुंबई अमली पदार्थ विरोधी पथकाने जुलै महिन्यात भिवंडी आणि कामोठे परिसरातून अवैध विक्रीसाठी आणलेला तब्बल दोन कोटी ७२ लाख रुपये किमतीचा गुटखा न्यायालयाच्या आदेशानुसार गुरुवारी (दि.११) खारघर डोंगरात जाळून नष्ट केला. नवी मुंबई अमली पदार्थ विरोधी पथकाला कामोठे येथे एका टेम्पोमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. पथकाने तात्काळ कारवाई करत टेम्पो चालकाला ताब्यात घेतले. या चालकाने हा गुटखा भिवंडी येथून मिळाल्याचे सांगितले. त्या माहितीच्या आधारावर, पथकाने भिवंडी येथे धाड टाकली. यावेळी अवैध विक्रीसाठी आणलेला गुटखा चार कंटेनरमध्ये पान २ वर

### शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन

**लातूर :** माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचं वयाच्या ९० व्या वर्षी निधन झालं आहे. लातूर येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मागील काही दिवसापासून ते आजारी होते. शिवराज पाटील चाकूरकर आयुष्यभर काँग्रेसच्या राजकारणात सक्रिय राहिले. मागील अनेक वर्षांपासून राजकीय जीवनातून निवृत्त होते. राजकारणातील अत्यंत अभ्यासू आणि स्वच्छ प्रतिमा असलेले राजकारणी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.१९८० मध्ये ते लातूर मतदारसंघातून पहिल्यांदा लोकसभेत निवडून आले आणि त्यानंतर १९९९ पर्यंत सलग सात निवडणुका जिंकत लोकसभेतील एक प्रभावी नेता म्हणून उदयास आले. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात पान २ वर

# वनविभागाचा थाट अन् बिबट्या मोकाट



**ग्रामस्थांमध्ये दहशत कायम; आक्षी, साखरेतील दोघांवर हल्ला**

**नागाव परिसरातील शाळांना सुट्टी**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।** सकाळची वेळ होती, प्रत्येकजण आपल्या कामात व्यस्त होते. मात्र अचानक आक्षी– साखरमधील एका चहाच्या दुकानात घुसून बिबट्याने कामगारावर हल्ला केला. या हल्ल्यात कामगार जखमी झाला. बिबट्याने हल्ला केल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच भीतीचे वातावरण निर्माण झाले. हल्ला करून बिबट्या तेथून पसार झाला. मात्र दहशत कायम राहिली. त्यानंतर बिबट्या कुठे गायब झाला, हेच समजले नाही. कांदळवन परिसरात संपूर्ण जाळी लावण्यात आली. कोलाड येथील वाईल्ड लाईफ रेस्क्यु टीमद्वारे ड्रोनद्वारे पाहणी करण्यात आली. वन विभागाने हातात काठ्या जाळी घेऊन सर्च ऑपरेशन केले. परंतु संध्याकाळ झाली, तरी बिबट्याचा सुगावा लागला नाही. त्यामुळे बिबट्याची दहशत कायमच असल्याचे दिसून आले आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून नागाव, आक्षी परिसरात बिबट्याने धुडगूस घातला असून अनेकांवर हल्ले केले आहेत.



(छायाचित्र : समीर मालोदे)

### रिकाम्या पिंजऱ्यांना बिबट्याची प्रतीक्षा

नागावमध्ये बिबट्याने ६ जणांवर हल्ला केल्यानंतर वनविभागाने संपूर्ण टीमसह त्याला पकडण्याचे प्रयत्न केले. मात्र वन विभागाच्या निष्क्रियतेमुळे नागावमध्ये बिबट्याने कर्मचाऱ्यांना गुगारा देत पलायन केले. शुक्रवारी बिबट्याने पुन्हा रुद्र रुप धारण करीत दोघांवर जीवघेणा हल्ला केला. मात्र पुन्हा एकदा वनविभागाला अपयश आले. वन विभागाने पिंजरे, थर्मल ड्रोन तसेच दिवसरात्र पाळत ठेवणारी विशेष पथके तैनात करून मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरु केली. मात्र गेल्या तीन ते चार दिवसांत बिबट्याला पकडण्यात वन विभागाला यश आले नाही.

> आक्षी येथील साखर परिसरात शुक्रवारी सकाळी बिबट्याने दोघांवर हल्ला केला आहे. त्यात ते जखमी झाले आहेत. एका कुत्र्यालादेखील बिबट्याने मारले आहे. रोहा येथील रिस्क्यू टीम दाखल झाली आहे. स्थानिकांनीदेखील बिबट्याच्या शोधासाठी ठिकठिकाणी जाळी लावली आहे. नागरिकांनी सतर्क राहवे. बाहेर पडू नये, स्वतःची काळजी घ्यावी.
>
> –रश्मी पाटील– सरपंच

### बिबट्यासाठी कोंबड्यांची मेजवानी

साखर परिसरात कांदळवन नजीक बिबट्याचा वावर असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे या परिसरात सकाळपासून सर्च ऑपरेशन सुरू करण्यात आले. बिबट्याला पकडण्यासाठी आता पिंजऱ्याचा वापर करण्यात आला आहे. चार पिंजरे ठिकठिकाणी लावण्यात आले असून परिसरात जाळीदेखील लावण्यात आली आहे. त्यामुळे आता बिबट्याला जेरबंद करण्यासाठी कोंबड्यांची मेजवानी ठेवण्यात आली आहे.

मंगळवारी सकाळी नागावमधील वर्तक वाडीमध्ये बिबट्याचा मुक्तसंचार स्थानिकांना दिसून आला होता. यामध्ये सुरुवातीला अमित वर्तक आणि प्रसाद सुतार यांच्यावर त्याने हल्ला केला होता. त्यानंतर मंदार गडकरी, कुणाल साळुंखे, भाऊसाहेब जावळे, अनिकेत पाटील यांच्यावरही हल्ला केला. यामध्ये वन कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. पकडण्यासाठी रचण्यात आलेल्या सापळ्यात बिबट्या सापडला नाही. अनेकवेळा चमका देऊन तो तेथून गायब झाला. गुरुवारीदेखील नागाव परिसरात बिबट्याचा शोध घेण्यासाठी वन विभागाचे कर्मचारी नागावमध्ये दाखल झाले होते. सर्च ऑपरेशन करूनही बिबट्या नागाव परिसरात सापडला नाही. बिबट्याच्या दहशतीखाली नागावकर असताना शुक्रवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास आक्षीमधील साखर येथील चहाच्या दुकानात घुसून बिबट्याने आनंदकुमार निषाद या कामगारावर हल्ला केला. त्यानंतर पान २ वर

# मिनीडोअर चालकांचा धडक मोर्चा



■ प्रलंबित मागण्यांसाठी हजारो चालक रस्त्यावर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी शुक्रवारी सकाळी रायगड जिल्हा विक्रम-मिनीडोअर चालक मालक संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली अलिबागमध्ये धडक मोर्चा काढण्यात आला. न्यायासाठी जिल्हयातील हजारो चालक रस्त्यावर उतरले. यावेळी प्रशासनाच्या विरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. आमच्या मागण्या पूर्ण करा अशी मागणी जोर धरत होती.

तीन चाकी, सहा आसनी मिनीडोअर वाहनांची सरसकट दोन वर्षे वयोमर्यादा वाढविण्यात यावी, चारचाकी सहा आसनी बीएस फोर मानांकित बदली वाहनांकरीता इंधन म्हणून सीएनजीच्या वापरास पान २ वर

# आठ शाळांचे होणार विलीनीकरण

■ मुले व मुलीची एकत्रीत शिक्षण व्यवस्था राबविणार

■ राजिप शिक्षण विभागाने दिली माहिती

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मुले आणि मुलींना एकत्र अभ्यास करण्याची आणि त्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी शासनाने मुले आणि मुलींच्या स्वतंत्र शाळांचे विलीनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. रायगड जिल्ह्यातील आठ शाळांचे विलीनीकरण होणार असल्याची माहिती जिप शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार मुलांच्या आणि मुलींच्या स्वतंत्र शाळांचे विलीनीकरण केले जाणार आहेत. एकत्रित शिक्षण व्यवस्था राबविण्यात येणार आहे. सहशिक्षणामुळे समानतेचे वातावण निर्माण करण्याचा प्रयत्न शिक्षण विभागाने केला आहे. तसेच संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि सामाजिक समरसता वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. मुलांच्या आणि मुलींच्या स्वतंत्र शाळांचे विलीनीकरण करून सह-शिक्षण व्यवस्था लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सह-शिक्षण शाळा हे एक आधुनिक आणि सर्वसमावेशक शिक्षण मॉडेल म्हणून ठरणार आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने मुले व मुलींची एकत्रीत शिक्षण व्यवस्था सुरू करण्याचा प्रयत्न केला आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये दोन हजार ४७४ जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. या शाळांमध्ये सुमारे ८७ हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जिल्ह्यात मुले आणि मुलींची स्वतंत्र शाळादेखील आहेत. या शाळांमध्ये मुले पान २ वर

## लाडकी बहीण योजना

# १६५ कोटी अपात्र लाभार्थ्यांनी लाटले

**मंत्री अदिती तटकरेंची कबुली**

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

राज्यातील लाडकी बहीण योजनेत तब्बल १६५ कोटी रुपये अपात्र लाभार्थ्यांनी लाटल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबतची लेखी उत्तरात कबुली दिली आहे.

१२ हजार ४३१ पुरुषांनी २५ कोटी रुपये तर ७७ हजार अपात्र महिलांनी १४० कोटी, तर ९५२६ शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी १४.५० कोटी रुपये लाटल्याचं आदिती तटकरेंनी माहिती देताना सांगितलं आहे. शासकीय अधिकारी कर्मचारी यांच्याकडून या पैशांची वसुली करून त्यांच्यावरती रितसर कारवाई केली जाणार असल्याचंही अदिती तटकरे यांनी उत्तर देताना म्हटलं आहे.

प्रत्येक गावात जिल्हा बँकेमार्फत लाडक्या बहिणींना एक लाख रुपयांच बिनव्याजी कर्ज देण्याची मुख्यमंत्री यांची घोषणा कागदोपत्रीच असल्याचंही समोर आलं आहे. या योजनेसंदर्भात मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती. मात्र अद्यापही शासन निर्णय जारी केला नाही. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत लेखी उत्तरात माहिती पान २ वर

## पोलिसांनी बालविवाह रोखला

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुका पोलिसांच्या तत्परतेमुळे हद्दीत होणारा एक बालविवाह रोखण्यास त्यांना यश आले आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील चेरवली वाडी तालुका पनवेल जिल्हा रायगड या गावात कातकरी कुटुंबियात बालविवाह होणार असल्याची शहानिशा करण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास कार्यालय अंतर्गत चाइल्ड हेल्पलाईन १०९८ चे जिल्हा प्रकल्प समन्वक प्रकाश नामदेवराव पवार यांनी पोलीस ठाण्यास पोलीस मदत मागितली होती. वपोनी गजानन घाडगे यांच्या आदेशान्वये सपोनि. कुदळे, पोहवा होल्गीर, व पीसी चालक अमरजीत गायकवाड असे पान २ वर

# आगामी निवडणुकीसाठी शेकापने फुंकले रणशिंग

**आत्करगांवमधील इच्छुक उमेदवारांना पक्षाचा हिरवा कंदील; शिवानी जंगम यांची माहिती**

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे बिगुल वाजले असून आरक्षण जाहीर झाल्यानंतर सर्व पक्ष उमेदवारांची चाचपणी करीत असतानाच निवडणूक लढविण्यासाठी शेकापक्षाने रणशिंग फुंकले आहे. भविष्यात युती, आघाडी काय होईल ते होईल मात्र आत्करगांव जि.प गट आणि आत्करगांव आणि खानाव पंचायत समिती गणातून निवडणूक लढविण्यासाठी उमेदवार इच्छुक असून त्यांना हिरवा कंदील दिल्याची माहिती शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची रणनिती ठरविण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक खालापूर तालुका चिटणीस किशोर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उंबरे येथील सभागृहात पार पडली. याप्रसंगी शेकापक्ष जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम, कर्जत-खालापूर विधानसभा चिटणीस संतोष जंगम, राम देशमुख, गौरू पाटील, खंडू पाटील, परशुराम पाटील, संतोष पाटील, प्रवीण लाले, भूषण कडव, प्रसाद तावडे, शांताराम पाटील, हरिश्चंद्र पाटील,निलेश घोसाळकर, चंद्रकांत घोसाळकर, हनुमंत पाटील, गणेश पालकर यांच्यासह शेकापक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षाची रायगड जिल्हा परिषदेत अनेक वर्ष सत्ता होती आणि यापुढेही राहणार आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागले पाहिजे. मनोधैर्य वाढवून पक्षाची ताकद दाखविण्यासाठी आढावा बैठकीचे आयोजन केले असल्याचे युवा मोर्चा जिल्हा चिटणीस सदस्य भूषण कडव यांनी सांगितले.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी सरकारची पावले बदलत असली तरी इतर पक्षाचे उमेदवार प्रचारत दंग असताना आपल्या पक्षाची काय भूमिका आहे, यासाठी बैठक आयोजित केल्याबद्दल राम देशमुख यांनी कौतुक केले. खोपोली नगरपालिका निवडणुकीच्या निकालातून आपली ताकद सर्वांना समजणार आहे. तशीच ताकद जि.प. आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत दाखवू यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन तालुका चिटणीस किशोर पाटील यांनी केले. तसेच आत्करगांव जिल्हा परिषद गटातून संतोष पाटील यांच्या पत्नी निता पाटील, आत्करगांव पंचायत समिती गणातून महादू लाले यांच्या स्नुषा सुषमा प्रदीप पान २ वर

**सलग चौथ्या वर्षी २ टन प्लास्टिक पुनर्निर्मितीसाठी रवाना | निसर्गमित्र शैलेश राईलकर यांची संकल्पना**

# चौलची प्लास्टिकमुक्त दत्तयात्रा

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

कोकणातील अलिबाग तालुक्यातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि जैवविविधतेचा अनमोल खजिना असलेले चौल गाव आता एका नव्या ओळखीने राज्यभरात झळकू लागले आहे. निसर्गमित्र शैलेश राईलकर यांच्या संकल्पनेतून सलग चौथ्या वर्षी २ टन प्लास्टिक पुनर्निर्मितीसाठी रवाना करण्यात आले आहे.

धकाधकीच्या जीवनाला कंटाळलेले मुंबई-पुण्याचे पर्यटक जिथे शांतता, स्वच्छ हवा आणि निसर्गसौंदर्याच्या शोधात असतात, त्या सर्व अपेक्षा चौल गाव पुरेपूर पूर्ण करतं. फणसाड अभयारण्याची हिरवी चादर, समुद्रकिनाऱ्याचा खळाळता नाद आणि गावातील मंदिरांची प्राचीन शांतता हे सगळं



### चौलचा संदेश राज्याला

स्वच्छता उपक्रम फक्त एक दिवसाचा नसतो. तो संस्कार असतो. ग्रामस्थांच्या एकतेने, निसर्गप्रेमींच्या धडाडीने आणि कार्यकर्त्यांच्या चिकाटीने चौल गावाला मिळालेली ही नवी ओळख पर्यावरणसंवर्धनात राज्यातील प्रत्येक गावासाठी प्रेरणादायी आहे.

एखाद्या थकलेल्या माणसाच्या कार्बन फिल्टरला जणू नवजीवन देते. पण हा निसर्ग जपला गेलाय तो स्वतः गावकऱ्यांच्या जागृतीमुळे, त्यांच्या मनातल्या पर्यावरण प्रेमामुळे. संकल्प स्वच्छ चौल, कृती प्लास्टिकमुक्त यात्रा सन २०२२ मध्ये

### संपूर्ण चौल उतरलं मैदानात!

गावातील तरुणाई, महिला बचतगट, गावातील मान्यवर, अगदी छोट्या चिमुकल्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंतसगळ्यांनी एकत्र येऊन यात्रेनंतरचा परिसर प्लास्टिकमुक्त केला. यात विशेष ठरली लहानगी स्वरा राकेश काठे. ही चिमुकली सकाळपासून मैदानात उतरली आणि स्वतः प्लास्टिक संकलन करत सहभागी झाली. स्वरासारखी मुलं जेव्हा हात मळवून कामाला लागतात, तेव्हा भविष्याचा समाज किती जबाबदार असू शकतो, याचा प्रत्यय येतो. या उपक्रमात योगदान देणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे माजी उपसरपंच अजित गुरव आणि रूपाली सुरेंद्र म्हात्रे यांनी कौतुकाने अभिनंदन केले. त्यांच्या पाठिंब्यामुळे ही मोहीम अधिक भक्कम बनत चालली आहे.

निसर्गमित्र शैलेश राईलकर यांनी एक छोटा पण पान २ वर

# खड्डे बुजविण्याचे काम निकृष्ट

**काही तासातच रस्त्यावरील खडी उखडली**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग - सुडकोली मार्गावरील पडलेल्या खड्ड्यांची डागडुजी करण्यात आली. मात्र काही तासातच रस्त्यावरील खडी उखडून निघाली आहे. त्यामुळे रस्ता दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप होत आहे. संबंधितांविरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

अलिबाग ते माणगावमधील साईपर्यंतचा रस्ता ८४ किलोमीटरचा रस्ता हॅम योजनेअंतर्गत मंजूर झाला. बांधा वापरा आणि हस्तांतरण करा या धर्तीवर रस्त्याचे काम करण्यात आले. वेळवली खानाव, खानाव पर्यंत काँक्रिटीकरण करण्यात आले. हॅममधून मंजूर होऊन अपूर्णावस्थेत असणारा अलिबाग-रोहा रस्ता आता खड्ड्यांमुळे जाम झाला आहे. खानाव ते सुडकोली हा प्रवास अपघाताला निमंत्रण देणारा ठरत आहे. खास करून नांगरवाडी ते भागवाडी मधील खिंडीची अवस्था दयनीय झाली आहे. अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे. अलिबागपासून रोहा साईपर्यंत ८४ किलो मीटरच्या रस्त्यासाठी १७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याचे ५० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा बांधकाम विभागाने केला आहे. परंतु अलिबाग रोहा मार्गावरील सुडकोलीपासून अलिबागपर्यंतच्या रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. कोट्यावधी रुपये खर्च करून रस्ता खड्डेमय आहे. आता धुळीचे कण नाका तोंडात जात आहे. मंगळवारपासून खड्डे बुजविण्याचे काम कंपनीमार्फत करण्यात आले. मात्र काही तासातच रस्त्यावरील खडी पुन्हा उखडली आहे. त्यामुळे या खडीतून पान २ वर

> खड्डे बुजविण्याचे काम जेएआर कंपनीला देण्यात आले आहे. दुरुस्तीचे काम योग्य नसल्यास संबंधितांविरोधात योग्य ती कारवाई केली जाईल. त्यांना पुन्हा खड्डे बुजविण्यास सांगितले जाईल. काम योग्य पध्दतीने करणे गरजेचे आहे.
>
> – मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

# देशभरात २०२७ मध्ये होणार जनगणना

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या निर्णयाची माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कॅबिनेटनं २०२७ च्या जनगणनेसाठी ११७१८ कोटींच्या बजेटला मंजुरी दिली. ही जनगणना दोन टप्प्यात होईल. याशिवाय कोल लिंकेज पॉलिसीतील सुधारणा आणि २०२६ च्या कोपरा हंगामासाठी एम एसपीबाबत निर्णय घेण्यात आला.



अश्विनी वैष्णव यांनी मागील जनगणना २०११ मध्ये झाल्याची माहिती दिली. २०२१ मध्ये करोना संसर्गामुळं जनगणना झाली नव्हती. आता जनगणना २०२७ मध्ये होणार आहे. जगातील सर्वात मोठा प्रशासकीय आणि सांख्यिकी कार्यक्रम असल्याचं अश्विनी वैष्णव म्हणाले. २०२७ ची जनगणना ही १६ वी असेल आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना आहे. जनगणना हा केंद्रीय सूचीतील विषय आहे.

जनगणना कायदा १९४८ आणि जनगणना नियम १९९० नुसार जनगणनेला कायदेशीर संरक्षण प्राप्त आहे. केंद्र सरकारनं १६ जून २०२५ ला जनगणनेचं राजपत्र जाहीर करण्यात आलं होतं. या जनगणनेसाठी ११७१८ कोटींच्या खर्चाला मान्यता देण्यात आली आहे.

जनगणनेची आधारभूत तारीख १ मार्च २०२७ असेल. तर, बर्फ पडणाऱ्या ठिकाणांवर १ ऑक्टोबर २०२६ तारीख असेल. ही जनगणना दोन टप्प्यात पार पडेल. पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि घरांची गणना केली जाईल. ही प्रक्रिया एप्रिल २०२६ ते सप्टेंबर २०२६ दरम्यान होईल. दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची नोंदणी फेब्रुवारी २०२७ मध्ये केली जाईल. बर्फ जिथं पडतो त्या ठिकाणी ही प्रक्रिया सप्टेंबर २०२६ मध्ये राबवली जाईल. ही माहिती नोंदवून घेताना सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक निकषांची माहिती, वय, लिंग, शैक्षणिक स्थिती, धर्म, मातृभाषा, भाषा, दिव्यांगत्व, सामाजिक स्थिती, जात, व्यवसाय, स्थलांतर इतर गोष्टींची नोंद घेतली जाईल.

२०२७ च्या जनगणनेत जात नोंदवून घेतली जाईल. स्वत: माहिती नोंदवता येणार. २०२७ ची जनगणना पार पडल्यानंतर जनगणनेची माहिती मंत्रालयं, राज्य सरकार यांना मागणीवरुन दिली जाईल, ती यूजर फ्रेंडली, मशीन रिडेबल फॉरमॅटमध्ये दिली जाईल. जनगणनेसाठी देशभर प्रचार प्रसार केला जाईल. ३० लाख लोक जनगणनेसाठी कार्यरत असतील, त्यातून १.०२ कोटी दिवसांचा रोजगार निर्माण होईल.

### डिजिटल जनगणना

२०२७ ची जनगणना ही डिजिटल पद्धतीनं केली जाईल. मोबाईल ॲप्स द्वारे भरुन घेतली जाईल. हिंदी, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषांमध्ये माहिती भरुन घेतली जाईल. जनगणना नियंत्रण आणि व्यवस्थापन यंत्रणा पोर्टल तयार केलं जाईल. हाऊस लिस्टींग ब्लॉक क्रिएटर वेब मॅप ॲप्लिकेशन तयार केलं जाईल. त्याद्वारे जिओ टॅगिंग केंल जाणार आहे. डिजिटल ऑपरेशनमध्ये सायबर सुरक्षेची काळजी घेतली जाईल.

### जनगणनेचं महत्त्व

जनगणनेतून जी माहिती उपलब्ध होईल ती धोरण ठरवण्यासाठी आणि सार्वजनिक प्रशासनासाठी फायदेशीर होईल. लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज संस्थांच्या मतदारसंघांच्या फेररचनेसाठी आणि आरक्षण निश्चितीसाठी जनगणनेच्या डेटाचा वापर होईल. संशोधकांना देखील या माहितीचा फायदा होईल.

## कर्मचाऱ्यांच्या एकदिलाने सरकार दबले!

**उरण :** हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर सुरु झालेल्या सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या बेमुदत साखळी उपोषणाला अखेर राज्य शासनाने नमते घेत प्रतिसाद दिला. यशवंत स्टेडियम, धंतोली येथे ९ डिसेंबरपासून धगधगणारे हे आंदोलन तिसऱ्याच दिवशी निर्णायक ठरले.कर्मचाऱ्यांच्या १७ लाखांच्या एकसंध शक्तीसमोर सरकारला चर्चा टेबलावर यावेच लागले. मा. मुख्यमंत्री यांनी परिस्थितीची गंभीर दखल घेऊन मा. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना तातडीची बैठक घेण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने आज झालेल्या चर्चेत सुधारित पेन्शनबाबतची अधिसूचना त्वरीत काढण्याचे आश्वासन शासनाने समन्वय समितीला दिले. कर्मचारी-शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत इतर प्रलंबित प्रश्नांसाठी स्वतंत्र चर्चासत्राचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येईल, तर उर्वरित १६ मागण्यांवर पंधरा दिवसांत सविस्तर चर्चा घेण्यात येईल, असेही मुख्य सचिवांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर बेमुदत साखळी उपोषणाचा पुनर्विचार करण्याची विनंतीही त्यांनी केली. शासनाच्या भूमिकेत सकारात्मक बदल होत असल्याचे सुकाणू समितीने नोंदवून उपोषण संस्थगित करण्याचा एकमुखी निर्णय घेतला.

# आमटेम-निगडे खाडीत उत्खनन

## खाकीचा आशीर्वाद असल्याची चर्चा

। पेण । प्रतिनिधी ।

शासन पर्यावरणाचा ऱ्हास होतोय म्हणून करोडोंचा महसूल बुडवून वाळू उत्खननावर बंधने लादत आहे. परंतु, या शासनाच्या वाळू उत्खननाच्या बंधनामुळे सद्यःस्थितीला वाळू माफियांची तेजी आहे. राजरोसपणे आमटेम-निगडेच्या खाडीत वाळू उत्खनन सुरू आहे. एकीकडे वाळूबंदी करणाऱ्या शासनाचे अधिकारी तर दुसरीकडे याच शासनाचे रक्षक समजले जाणारे खाकीवाले हे आपल्या कार्यक्षेत्राच्या अखत्यारीत नसतानादेखील वाळू माफियांशी संगनमत करून राजरोसपणे सक्शन व बोटीद्वारे वाळू उत्खनन करणाऱ्यांना अभय देताना दिसत आहेत. आजच्या घडीला शासनाचे अधिकारी हे गांधारीची भूमिका निभावताना दिसत आहे. आमटेमच्या पुलावर जर आलात तर पुलाच्या दोन्ही बाजूला आमटेम निगडेच्या खाडीत कित्येक सक्शन पंप असलेल्या होडया सर्वसामान्यांना दिसतात. मात्र सरकारी बाबू व खाकीवाल्यांना हे दिसत नाही. हे खरं पाहता आठवा चमत्कारच म्हणावा लागेल.



एकीकडे जिल्हाधिकारी किशन जावळे हे उत्तम प्रशासक म्हणून सर्वसामान्यांसमोर येत आहेत. ते व त्यांचे महसूल कर्मचारी निवडणुकीच्या कार्यक्रमामध्ये व्यस्त आहेत. आमटेम-निगडेच्या खाडीमध्ये सुरू असलेले अवैध वाळू उत्खनन तलाठी का बंद करू शकत नाही? अशा प्रकारची चर्चा सध्या जोरात आमटेम, निगडे, कासू, पांडापुर, शिहू, बेणसे, शहाबाज, वडखळ परिसरात सुरू आहे. महत्वाची बाब म्हणजे आमटेम-निगडेच्या खाडीमध्ये सुरू असणाऱ्या या अवैध उत्खननामागील खरा सुत्रधार हा राजकीय पक्षाच्या बडया नेत्याच्या भाच्याचा मित्र असल्याची देखील चर्चा सुरू आहे. एकीकडे दादर-रावे परिसरात परंपरागत उदरनिर्वाहासाठी हातपाटी व्यवसाय करणाऱ्या सर्वसामान्य गावकऱ्यांना बुडी मारून नियमबाहय जास्त वाळू काढल्यास कारवाई केली जाते. मात्र हजारो ब्रास वाळूचे उत्खनन रोजच्या रोज होत असताना हे महसूल प्रशासनाला दिसू नये अथवा दिसून त्याकडे पाहू नये असे का घडते? हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता महसूल प्रशासनापेक्षा खाकीचे शिलेदारच या वाळूमाफियांना मदत करत असल्याचे समोर येत आहे. एका गाडीमागे रूपये एक हजार मोजले जात असल्याची चर्चादेखील जोरदार होत आहे. दर दिवसाला कमीत-कमी ८ ते १० डंम्पर वाळू आमटेम-निगडेच्या खाडीवरून जात आहे. यामुळे खाकीच्या शिलेदारांचा धंदादेखील वाळू माफियांबरोबर तेजीत असल्याचे बोलले जात आहे. त्यातच महसूल खात्याची सर्वांत मोठी अडचण अशी झाली आहे कि, येथील तलाठी संजय तवर हे नव्याने तेथे रुजु झाले आहेत. त्यामुळे त्यांना या वाळु उत्खननाबाबत फारशी कल्पना नसावी.

मंडळ अधिकारी हे सतत गैरहजर असल्याने या वाळूमाफियांचे फावले आहे. मात्र खाकीवाले उघड-उघड धनलक्ष्मीचे दर्शन घेउन या वाळू माफियांची पाठराखण करताना दिसत आहेत. तरी या वाळू माफियांवर वेळेस महसूल खात्याने लगाम घालणे गरजेचे आहे. या वाळू उत्खननाविषयी देखील उलट-सुलट चर्चा होत आहेत.


## पान १ वरून


## १६५ कोटी अपात्र लाभार्थ्यांनी लाटले

दिली आहे. योजना सुरू करण्यात आली तेव्हा सरसकट महिलांनी अर्ज केले होते. सुरूवातील या योजनेसाठी अर्ज करताना आधार क्रमांक, बँक खाते आणि पात्रतेची माहिती तपासण्यासाठी तांत्रिक पडताळणी होती. मात्र काही जिल्ह्यात डेटा व्हेरिफिकेशनमध्ये गंभीर त्रुटी निर्माण झाल्याचं निदर्शनास आलं होतं. त्यामुळे अपात्र महिलांनीही अर्ज करून लाभ घेतला अशी माहिती समोर आली आहे. सिस्टममध्ये झालेल्या चुकांमुळे पुरुषांचे अर्जही मंजूर झाले. लाभार्थ्यांची पात्रता तपासण्यासाठी असलेली तपासणी यंत्रणा तांत्रिक दृष्टीने चुकीची असल्याचे निकष समोर आले आहे. सरकारने हा सर्व प्रकार डिजिटल सिस्टममधील त्रुटी आणि स्थानिक प्रशासनाकडून झालेल्या दुर्लक्षामुळे घडल्याचे नमूद केले आहे. त्यानंतर या योजनेत फक्त पात्र महिलांना लाभ मिळावा यासाठी घालून दिलेल्या अटींची पुढे पूर्तता करत असतानाच यामध्ये शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी देखील अर्ज केल्याचं समोर आलं आहे. शासकीय अधिकारी कर्मचारी यांच्याकडून या पैशांची वसुली करून त्यांच्यावरती रितसर कारवाई केली जाणार असल्याचंही अदिती तटकरे यांनी उत्तर देताना म्हटलं आहे.

## स्कूटीच्या धडकेने वयोवृध्दाचा मृत्यू

मात्र त्यांचा मृत्यू झाला. याबाबत रविंद्र मोरे यांचा मुलगा तेजस मोरे (रा. दहीवली, दहीवलीतर्फे बोरेती, खोपोली) याने आपल्या वडिलांच्या अपघाताची फिर्याद दाखल केली असून अज्ञात स्कूटी चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कल्याण-तळोजा फक्त ४५ मिनिटांत

स्थानके असणार आहेत. या मार्गिकेमुळं कल्याण, डोंबिवली, तळोजा आणि पुढे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणार आहे. या मार्गिकेमुळं ठाणे ते नवी मुंबई दरम्यानचा प्रवास अधिक सुलभ व जलद पद्धतीने होणार आहे. तसंच, कळवा ते तळोजा परिसरातील ट्रान्झिस्ट-ओरिएंडेट विकासालाही चालना मिळणार आहे.

कळवा-शिळफाटा तळोजा मार्गाला समांतर असणारा हा कॉरिडॉर तब्बल ७ किमी फ्लायओव्हरच्या एकत्रित रचनेसह उभा राहतोय. यात कोळेगावजवळील १०० मीटर मोकळा स्पॅन, महत्त्वाच्या रेल्वे आणि क्रॉसिंग्ज तसंच २१-२३ मीटर उंचीवरील उन्नत स्थानक अशा अभियांत्रिकी कौशल्याच्या अनेक विशेष स्पॅनचा या प्रकल्पात समावेश असेल. ही मेट्रो मार्गिकेच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण इंटरजेंचमुळं खालील मार्गाशी सहज जोडले जातील. कळवा मेट्रो लाइन ५, मेट्रो लाइन १४, अमनदूत येथे नवी मुंबई मेट्रो लाइन १ तसंच कळवा जंक्शनला सेंट्रल रेल्वेशी थेट एका पुलाद्वारे जोडले जाणार आहेत. हा प्रकल्प २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.

## मिनीडोअर चालकांचा धडक मोर्चा

मान्यता मिळावी, कोराना काळात लागू झालेले सानुग्रह अनुदान विक्रम, मिनीडोअर मॅजिक इको या मीटर टॅक्सी परवानाधारकांना मिळावे, व्यवसाय कराचा भरणा करण्यासाठी दंड व व्याज न आकारता सुट मिळावी. इको टॅक्सीला नवीन डिव्हाईस बसविण्यासाठी अतिरिक्त खर्च होत आहे. ही तांत्रिक लुट थांबविण्यात यावी. ऑनलाईन टॅक्सी परमीट बंद करावे. १५ वर्षावरील मिनीडोअर पासिंग साडेचार हजार रुपयांवरून नऊ हजार रुपये इतकी करण्यात आली आहे, ती रद्द करण्यात यावी अशा अनेक मागण्यांसाठी गेल्या अनेक वर्षापासून मिनीडोअर चालक मालक लढा देत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली होती. मागण्यांची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून त्याची कार्यवाही झाली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या चालक व मालकांनी शुक्रवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून मोर्चाला सुरुवात झाली. त्यानंतर भगवान महावीर चौक, बालाजी नाका, मारुती नाका ते हिराकोट तलाव असा मोर्चा काढण्यात आला.जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आल्यावर मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. यावेळी विजयभाऊ पाटील यांच्यासह प्रमोद पाटील आदी पदाधिकारी यांनी चालक, मालकांना मार्गदर्शन केले. त्यानंतर जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक लवकरात लवकर करण्यात यावी अशी मागणी केली.

**हजारोच्या संख्येने चालक एकवटले**

आपल्या न्याय हक्कासाठी अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मिनीडोअर चालक व मालक यांनी मोर्चा काढला. रायगड जिल्ह्यातील हजारो चालक मागण्यांसाठी एकवटले होते. हातात झेंडा घेऊन प्रशासनाविरोधात घोषणा देत प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. दप्तर दिरंगाईचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली.

## आठ शाळांचे होणार विलीनीकरण

व मुली स्वतंत्र शिक्षण घेत आहेत. या शाळा एकत्र केल्या जाणार आहेत. शाळा समितीचा ठराव घेऊन ही प्रक्रिया केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दिली आहे. शासनाने निर्णय घेतला असला, तरी शाळा समिती आणि पालकांची काय भूमिका असणार याकडे आता लक्ष लागून राहिले आहे.

## आगामी निवडणुकीसाठी शेकापने फुंकले रणशिंग

लाले तर खानाव पंचायत समिती गणातून शांताराम पाटील यांनी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुकता दर्शविल्यावर प्रमुख पदाधिकाऱ्यांनी हिरवा कंदील दाखविला. पक्ष संपूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा असेल, असा शब्द किशोर पाटील यांनी बोलताना दिला आहे.

## खड्डे बुजविण्याचे काम निकृष्ट

मार्ग काढताना चालकांना प्रचंड त्रास होत आहे. खड्डे बूजविण्यासाठी करण्यात आलेला खर्च मातीमोल झाल्याचे दिसून आले आहे. निकृष्ट दर्जाच्या या कामामुळे प्रवासी वर्गात तीव्र संताप निर्माण झाला आहे. या मार्गावरील खड्ड्यांचा प्रश्न कधी सुटणार असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## बिबट्या मोकाट

लोकेश नावाच्या एका केरळमधील कामगारावर हल्ला केला. या हल्ल्यात दोघेजण जखमी झाले. बिबट्याचा संचार असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच येथील स्थानिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलली. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी स्थानिकांनीदेखील पुढाकार घेतला. वन विभागाच्या सोबत राहून नागरिक मेहनत घेत होते. कांदळवन परिसरात जाळे लावण्यात आले. रेस्क्यू टीमच्या मदतीने ड्रोन कॅमेराच्या सहाय्याने बिबट्याचा शोध करण्यात आला. कित्येक तास उलटूनही बिबट्याचा शोध लागला नाही. त्यामुळे वन विभागासह स्थानिक बिबट्याच्या शोधात लागल्याचे दिसून आले.

तीन ते चार दिवसांपूर्वी नागावमध्ये बिबट्या आढळून आला होता. कदाचित तोच बिबट्या असावा अशी शक्यता वर्तविली जात आहे. हा बिबट्या या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन स्थलांतर करून पुढे जंगलात जाऊ शकतो. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. काम करताना गाणी लावण्यात यावी. लहान मुलांना संध्याकाळी बाहेर पाठवू नये, देऊ नका, असे आवाहन केले जात आहे. रिक्यू चॅरिटेबल ट्रस्ट आणि सह्याद्री वनजीव सामाजिक संस्था या दोन्ही टीम दाखल झाली असून बिबट्याचा वेगवेगळ्या मार्गाने शोध सुरू आहे. थर्मल ड्रोनद्वारे शोध घेण्यात आला आहे. वन विभाग, स्थानिक प्रशासन, पोलीस प्रशासन व रिस्क्यू टीम यांच्या माध्यमातून शोध सुरू आहे. चार पिंजरे लावण्यात आले आहेत, असे रिस्क्यू टीमचे प्रमुख सागर दहींबेकर यांनी सांगितले.

## पोलिसांनी बालविवाह रोखला

चेरवली वाडी याठिकाणी गेले. बालविवाह होणाऱ्या मुलीच्या वयाबाबत जिल्हा परिषद शाळा चेरवली वाडी येथून जन्मतारखेबाबत खात्री केली असता मुलीचे वय १४ वर्ष सहा महिने असल्याचे निदर्शनास आले. वाजे ग्रामपंचायतचे ग्राम पंचायत अधिकारी हेमंत शिवराम राठोड, पोलीस पाटील सुमित रघुनाथ पाटील, ग्रामपंचायत महिला सरपंच भारती भालेकर, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पथक व समन्वयक अधिकारी असे चे रवली वाडी या ठिकाणी जाऊन कातकरी कुटुंबीयात होणारा बाल विवाह रोखण्याबाबत त्यांना बालविवाह बाबत माहिती देऊन त्यांचे समुपदेशन केले असून अल्पवयीन मुलामुलीच्या पुढील भविषाच्या वाटचाली करता त्यांना बालकल्याण समिती कर्जत जिल्हा रायगड यांच्या समक्ष हजर ठेवले. तसेच कातकरी कुटुंबियांना व गावातील प्रतिष्ठित लोकांना पोलीस ठाण्यास आणून वपोनि गजानन घाडगे व इतर अधिकारी यांच्या समवेत त्यांची बैठक घेवून बालविवाह रोखण्याबाबत समुपदेशन करण्यात आले.

## चौलची प्लास्टिकमुक्त दत्तयात्रा

दूरदृष्टी असलेला संकल्प मांडला. चौलच्या दत्तयात्रेनंतर उरलेल्या टाकाऊ प्लास्टिकचा पुनर्निर्मितीसाठी उपयोग करायचा.हा संकल्प गावकऱ्यांनी अगदी हृदयाशी धरला आणि पुढे तो एक जनआंदोलन बनला. चार वर्षांपूर्वी सुरू झालेली ही मोहीम २०२५ मध्ये चौथ्या वर्षीही तुफान यशस्वी झाली आहे.

यावर्षी गावकऱ्यांनी मिळून अभूतपूर्व २ टन प्लास्टिक कचरा संकलित करून पुनर्निर्मितीसाठी रवाना केला.

**उपक्रम नाही, हवा बचाव अभियान**

आज शहरांमध्ये हवा गढूळ, प्रदूषण वाढलेले आहे, पण चौलची हवा अजूनही शुद्ध आहे. हे निसर्गदेवतेने दिलेलं वरदान असलं तरी ते संकल्प, स्वच्छता आणि सातत्य यांनी टिकवलं जात आहे. गावकऱ्यांना हे चांगलं कळलंय की हवा, जंगल, समुद्र आणि निसर्गाची देणगी टिकवली तरच पुढची पिढी निरोगी वाढेल.

**प्लास्टिकमुक्त यात्रेचा संदेश**

पर्यटनाने गाव फक्त नावारुपाला येत नाही तर गावाला स्वच्छही ठेवायला लागतं. पर्यटक चौलला भेट देतात कारण हे गाव त्यांना शांतता, स्वच्छता आणि निरामय हवा देतं. ही हवा शुद्ध ठेवण्याची तगमगच चौलच्या या उपक्रमातून दिसून येते.

## सायबर गुन्ह्यातील आरोपी अटक

उत्तर प्रदेश येथे होते. त्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्यातील वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदशनाखाली पोलीस उपनिरीक्षक अभय कदम, पोहवा थवई, पो.शि. गायकवाड, मेरया, पालवे, पो.ना. प्रवीण पाटील हे सायबर पथक सुलतानपूर, उत्तर प्रदेश येथे रवाना झाले. त्याठिकाणी पोहोचल्यावर आरोपी हा नैनीताल, उत्तराखंड येथे जात असल्याचे लोकेशनद्वारे समजले. सायबर पथक तात्काळ रात्रीचा प्रवास करून सुलतानपूर ते नैनीताल असे ५०० कि.मी. प्रवास करून भीमताल पोलीस ठाणे, नैनिताल येथे पोहोचले. नैनिताल येथील पोलीस अंमलदार जितू ठाकूर यांच्या मदतीने आरोपी सूर्यांश सहज सिंह भिमताल पोलीस ठाणे हद्दीत सापडला. पनवेल पोलिसांनी त्याचा ताबा घेतला. त्याच्या ताब्यात मोबाईल डिव्हाईस व लॅपटॉप मिळून आला. आरोपीने गुगल ॲड्स व वेबसाईट तयार केल्याचे त्याच्या लॅपटॉप व मोबाईलमध्ये आढळले. तसेच मुख्य आरोपीसोबत चॅट मिळून आले आहेत. आरोप विरोधात पुरेसे तांत्रिक पुरावे प्राप्त झाले असून त्यास अटक करून न्यायालय, नैनीताल, उत्तराखंड यांच्या समक्ष हजर करून ट्रान्झिट रिमांड घेण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अभय कदम करीत आहेत.

## २ कोटीचा गुटखा नष्ट

आढळून आला. पोलिसांनी हा सर्व गुटखा, टेम्पो आणि चार कंटेनर ताब्यात घेतले आणि या प्रकरणी पाच संशयितांना अटक केली होती. न्यायालयाच्या निर्देशानुसार, हा जप्त केलेला मोठा साठा खारघर ओवे कॅम्प येथील तलावाशेजारी मोठा खड्डा खोदून जाळून नष्ट करण्यात आला. यावेळी कोणतीही पर्यावरणीय हानी होऊ नये, यासाठी आवश्यक खबरदारी घेण्यात आली होती. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक सूरज गोरे यांच्यासह पोलिस कर्मचारी अंकुश म्हात्रे, कृष्णा धोंडे, रमेश तायडे, परमेश्वर भाबड, तुकाराम सोनवलकर हे उपस्थित होते.

## शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन

संरक्षण राज्यमंत्री, वाणिज्य, विज्ञान-तंत्रज्ञान, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स व अवकाश अशा महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी त्यांनी सांभाळली. १९९१ ते १९९६ या काळात ते देशाचे १० वे लोकसभा अध्यक्ष होते. लोकसभेचे आधुनिकीकरण, संगणकीकरण, संसदेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण, नवे ग्रंथालय इमारत यांसारख्या उपक्रमांना त्यांनी गती दिली. देश-विदेशातील अनेक संसदीय परिषदांमध्ये त्यांनी भारताचे नेतृत्व केले. सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षातही त्यांनी जाहीरनामा समितीचे अध्यक्षपदासह अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. २००४ मध्ये निवडणूक हरूनही त्यांच्यावर विश्वास ठेवत केंद्रातील गृहमंत्रीपद देण्यात आले. मात्र २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षेतील त्रुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी ३० नोव्हेंबर २००८ रोजी राजीनामा दिला. २०१० ते २०१५ या काळात ते पंजाबचे राज्यपाल आणि चंदीगड केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक म्हणून कार्यरत होते.


**पनवेल महानगरपालिका**
**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय :०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.:०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय :०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

**जाहिर सुचना**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुत्रपिंड आजाराने ग्रस्त असलेल्या नागरिकांना पालिकेमार्फत मोफत डायलॅसीस सेवा उपलब्ध करुन देणेकामी पालिकेने खारघर व नवीन पनवेल येथे ०२ डायलॅसीस युनिट (प्रत्येकी २५ खाटांचे) सेंटर कार्यान्वित करण्यात येणार आहे. या डायलॅसिस युनिटमध्ये उपचार घेण्याऱ्या रुग्णांना Liquid Oxygen, Medical Oxygen, Medical Nitrous oxide इत्यादी मेडिकल गॅसची आवश्यकता भासणार आहे. याकरिता गॅस पुरवठा करणेकामी कंत्राटी तत्वावर एजन्सीची नेमणुक करण्यात येणार आहे. याकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी खालील नमुद केलेल्या बाबींकरिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | Supply of Refilled Medical Gas Cylinders for PMC Dialysis Center on Contract basis. | १२.१२.२०२५ ते १९.१२.२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |

सविस्तर जाहिर सुचना पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईट www.panvelmunicipalcorporation.com या वेबसाईट वरती प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सही /-
**(प्रसेनजीत कारलेकर)**
**उपायुक्त (वैद्यकीय)**
**पनवेल महानगरपालिका**



**पनवेल महानगरपालिका**
**पर्यावरण विभाग**

पनवेल महानगरपालिकेमार्फत Regarding the appointment of a third party organization for 3 years to carry out natural treatment (Bio- Remedation & Mechanical) in various lakes within the jurisdiction of Panvel Municipal Corporation to maintain good water quality. या कामाकरिता जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

सदरची ई- निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १३/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध होईल. सदर ई-निविदा संकेतस्थळावर दि.२२/१२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. इच्छुक निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र/पमपा/पर्यावरण/२८२५/प्र.क्र.२६/३४३/२०२५
दिनांक : १२/१२/२०२५

**(सही/-)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**



**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/४३२५/प्र.क्र.०५/ ४७६७/२०२५ दिनांक: १२/१२/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/ २७०/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क, प्रभाग क्र.१३ मधील प्लॉट क्र.०८ सेक्टर क्र-३२, कामोठे ख्रिश्चन समाजाकरीता दफनभूमी विकसित करणे. | २,४८,६४,३२०/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि १२/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त-।**
**पनवेल महानगरपालिका**



**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/४३२५/प्र.क्र.१०/ ४७८३/२०२५ दिनांक: १२/१२/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/ २७१/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ, प्रभाग क्र.०४ मधील सेक्टर-१४, भुखंड क्र.१३ बी येथे प्राण्यांच्या अंत्यविधी करीता स्मशानभूमी विकसीत करणे. | ४,०६,९५,१६९/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि १२/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त-।**
**पनवेल महानगरपालिका**

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# निवडक

## मुख्याधिकाऱ्यांच्या घरी चोरी

**नवीन पनवेल :** माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल महादेव इंगळे यांच्या सेक्टर १४, सिडको वसाहत, नवीन पनवेल येथील घरात चोरांनी २५ ग्राम वजनाची सोन्याची गंठण चोरून नेली. या प्रकरणी शनिवार (दि.६) डिसेंबर रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंगळे हे माथेरान नगर परिषदेचे मुख्याधिकारी असून ते सेक्टर १६, पिल्लाई कॉलेज जवळ, नवीन पनवेल येथे राहतात. त्यांच्या मालकीची सदनिका, सेक्टर १४, नवीन पनवेल येथे आहे. त्या घरात त्यांनी २५ ग्रॅम वजनाचे आईचे सोन्याचे गंठण ठेवले होते. (दि.६) डिसेंबर रोजी सेक्टर १४ येथील घराचे कडी कोयंडा तुटलेले दिसले. आतमध्ये जाऊन पाहणी केली असता कपाटातील सोन्याची गंठण सापडले नाही.

## पोलिसांची जुगार अड्ड्यावर कारवाई

**नवीन पनवेल :** खांदेश्वर पोलिसांनी जुगारावर कारवाई करत रविवारी तिघां विरोधात गुन्हा दाखल केला. बालभारती इमारतीच्या मागे संरक्षण भिंती लगत रेल्वे पटरीला लागून असलेल्या सार्वजनिक मोकळ्या जागेत काही इसम जूगार खेळत असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी रुपेश निवृत्ती म्हात्रे वळवली, सागर प्रकाश जाधव सुभेदार वाडा, लाईन आळी, संतोष आनंद शेंडे गावदेवी पाडा पनवेल या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून सतराशे रुपये जप्त केले. यापूर्वी देखील या ठिकाणी जुगाराचा अड्डा सुरू होता. पोलिसांनी कारवाई केली तरी येथील हा जुगाराचा अड्डा बंद होत नाही. त्यामुळे जुगार चालवणाऱ्यांना पोलिसांचा धाक उरलेला नसल्याचे दिसून येत आहे.

## मोहोपाडा येथून तरूणी बेपत्ता

**रसायनी :** मोहोपाडा येथून १८ वर्षीय तरूणी बेपत्ता झाल्याची घटना घडली असून अन्नू राजेश शर्मा ही घरातून कुठेतरी निघून गेली असल्याची फिर्याद मिथिलेश राजेश शर्मा यांनी दिली आहे. रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अन्नू राजेश शर्मा वय १८, रा.भूषण पाटील यांची चाळ, मोहोपाडा, मुळ राहणार-हनुमान गढीया, महाराज गंज, उत्तरप्रदेश येथील



असून राहत्या घराला कडी लावून सायंकाळच्या सुमारास कुठेतरी निघून गेली आहे. तिचा आजूबाजूच्या परिसरात व नातेवाईकांकडे शोध घेतला असता तिचा काही ठावठिकाणा लागला नाही. तिचे वर्णन रंग गोरा, उंची ५ फूट, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, केस काळे, अंगात नेसून लाल व काळ्या रंगाचा कुडता व काळ्या रंगाची सलवार, डोळ्यावर सोनेरी रंगाचा चष्मा असे वर्णन असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा म्हात्रे अधिक तपास करीत असून सदर बेपत्ता तरूणी कोणास आढळल्यास रसायनी पोलीस ठाण्यात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## कोळखेत रूम देण्याचे नावे फसवणूक

**नवीन पनवेल :** ओम साई होम, कोळखे येथे रूम न देता तेरा लाख रुपये घेऊन फसवणूक केल्या प्रकरणी हनुमंत पांडुरंग चव्हाण राहणार पाम बीच रोड, सिवूड गार्डन सोसायटी, नवी मुंबई यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात (दि.९) डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गणेश डोईफोडे हे घाटकोपर येथे राहत असून त्यांना हनुमंत चव्हाण यांनी कोळखे येथे इमारत बांधकाम केलेले असून पाच रूम विक्री करण्याच्या बाकी असल्याचे सांगितले. यावेळी गणेश यांनी त्यांना व त्यांच्या मित्रांना रूम खरेदी करावयाच्या आहेत असे सांगितले. त्यानुसार त्यांनी रूम पाहिल्या आणि रूमसाठी प्रत्येकी साडेतीन लाख रुपये रजिस्ट्रेशन सह देण्याचे ठरले. त्यानुसार तिघांनी पाच रूमचे एकूण १३ लाख रुपये हनुमंत चव्हाण यांना दिले. त्याची पावती त्यांना मिळाली. रूम खरेदी खत तयार करून उर्वरित पैसे घेऊन रूम ताब्यात घेण्यासाठी फोन लावला असता ते टाळाटाळ करत होते. रजिस्ट्रेशन ऑफिसमध्ये त्यांना बोलवत असत मात्र चव्हाण येत नव्हते. त्यांच्या घरी जाऊन चर्चा केली मात्र पैसे परत दिले नाहीत आणि रूम देखील दिले नाही आणि फसवणूक केली.

## श्रमदानातुन बांधला वनराई बंधारा

**तळा :** तळा तालुक्यातील महागाव ग्रामपंचायत हद्दीतील बारपे येथील ग्रामस्थांनी श्रमदानातून वनराई बंधारा बांधला आहे. भात कापणीचा हंगाम संपला की ग्रामीण भागातील नागरिक ग्रामपंचायत हद्दीतील नदी नाल्यांवर वनराई बंधारे बांधून वाहून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह थांबवतात. श्रमदानातून हे बंधारे बांधून पाणी अडवले जाते. या बंधाऱ्याचा उपयोग बारपे परिसरात पाणी अडविण्यासाठी होणार असून यामुळे येथील भूजल साठ्यात वाढ होऊन पाण्याचे शाश्वत स्त्रोत निर्माण होणार आहे. जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापनासाठी ग्रामस्थांनी दगड, माती, रिकाम्या सिमेंट पिशव्यांच्या साहाय्याने कमीतकमी खर्चात वनराई बंधारा उभारून जलव्यवस्थापनाचे महत्व टिकवून ठेवले आहे.या वन बंधाऱ्यातून पाणी टंचाईवर मात होऊन हजारो लिटर पाणी साठा शिल्लक राहील असे काम ग्रामस्थांनी केले आहे. या वनराई बंधाऱ्यामुळे बरेच दिवस पाणी अडवून ठेवता येणार असल्याने गाई, गुरे, पशू-पक्षी यांची तहान भागणार आहे. याशिवाय शेतकरी वर्गालाही भाजीपाला लागवडीला मदत होणार आहे.



## लोहप प्राथमिक आरोग्य केंद्रात समुपदेशन

**पाताळगंगा :** प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सातत्याने विविध उपक्रम असताना एक पाऊल पुढ टाकत महिला वर्गाची शारीरिक सुरक्षा महत्वाची त्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी या उदात विचारातून तज्ञ-परिचर्या प्रशिक्षण केंद्र जिल्हा रुग्णालय, रायगड अलिबाग येथे यांच्या माध्यमातून ए. एन. एम प्रथम वर्ष विद्यार्थी परिचारिकांनी प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथे स्तनपान समुपदेशन सादर केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा रुग्णालय रायगड अलिबागच्या गायत्री म्हात्रे, सारिका पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य-अधिकारी डॉ. मंगेश देशमुख, बालरोग तज्ञ डॉ मंगेस कौशल, डॉ. ईशा विठलानी तसेच अनेक महिला उपस्थित होत्या.

# रोजगारासाठी तरुणांची शहरांकडे धाव

## ।। माणगावात वाडी-वस्त्या पडल्या ओस ।। स्थलांतर थांबवण्यासाठी नियोजनाची गरज

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील चाळीस-पन्नास घरे असलेल्या अनेक वाडी-वस्त्या आज ओसाड झाल्या आहेत. एकेकाळी सकाळ-संध्याकाळ धुरकट चुलीचा सुगंध दरवळणारी ही खेडी आता बेरोजगारीमुळे शांत, निर्मनुष्य आणि कुलूपबंद अवस्थेत दिसतात. रोजगार नसल्याने तरुणांना शहराचा रस्ता धरावा लागला आहे. त्यामुळे बहुतेक सर्व गावे ओस पडली आहेत.



गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई, पुणे, सुरत, ठाणे अशा शहरांकडे रोजगारासाठी तरुणांची मोठ्या प्रमाणात धाव सुरू आहे. घरी शेती कमी, उद्योगधंद्यांची संधी नाही, तर जगण्यासाठी शहर गाठण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. म्हणूनच माणगाव तालुक्यातील अनेक खेडी आज ७० टक्क्यांपर्यंत रिकामी झाली आहेत. घरात आज आई-वडील, शेतावर पाण्याची वाट पाहणारी एखादी गुरं आणि दिवसेंदिवस घटणाऱ्या लोकसंख्येची तगमग हेच चित्र सर्वत्र दिसत आहे. तालुक्यात कारखानदारी उभी राहिली, रस्ते झाले, विकासकामांचा गाजावाजा झाला. पण या सगळ्यात स्थानीक तरुणांना रोजगाराची संधी कित्येक ठिकाणी मिळालीच नाही. एमआयडीसीच्या नावाखाली प्रगतीचे स्वप्न दाखवले गेले, मात्र प्रत्यक्षात रोजगार बाहेरून आलेल्यांपर्यंतच सीमित राहिला, असा व्यापक नाराजीचा सूर येथे उमटत आहे.

प्रकल्पांसाठी अनेक शेतकऱ्यांनी जीवनभराची कमाई असलेल्या जमिनी कवडीमोलाने सरकारकडे दिल्या. परंतु, काहींना मोबदला मिळालाच नाही. मिळालेल्या मोबदल्यात घर किंवा व्यवसाय उभा राहू शकला नाही. शेती कमी होत गेली, उत्पन्न घटले, अवकाळी पावसाने वर्षानुवर्षे पिकांचे नुकसान झाले, पण नुकसानभरपाई मात्र नाहीच. या पार्श्वभूमीवर अनेक कुटुंबांनी जगण्यासाठी जमिनी विकून टाकल्या. पण शेवटी हातात राहिलं ते फक्त अनिश्चित भविष्य आणि स्थलांतराची वेळ आली आहे. बँका कर्ज देण्यास तयार नाहीत, तरुणांच्या हाताला काम नाही, उद्योगधंदे नाहीत. संपूर्ण परिस्थितीला वाहवत नेणारा प्रश्न आत खोलवर जाणवतो आहे. गावात राहणाऱ्या वृद्धांच्या डोळ्यांत दररोज मुलांची वाट पाहणारी एक चिरंतन ओल दिसते.

सणवार, उत्सव, ढोल-ताशांचा आवाज आणि सगळंच हरवून गेले आहे. स्थानिक तरुणांना रोजगाराची हमी, उद्योगांमध्ये स्थानिकांना प्राधान्य, आणि गाव पुन्हा जिवंत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. ग्रामस्थांची मागणी स्पष्ट आहे की, स्थानिकरोजगारासाठीस्वतंत्रधोरण, कारखान्यांत ७० टक्के स्थानिकांना प्राधान्य, ग्रामस्तरावर लघुउद्योगांना प्रोत्साहन शेतीसाठी ठोस योजना आणि नुकसानभरपाईचे त्वरित वितरण, स्थलांतर थांबवण्यासाठी दीर्घकालीन नियोजन गरजेचे आहे.

### आई-वडीलांची व्याकुळता

एखाद्या तरुणाची स्वप्ने, एखाद्या आईची व्याकुळ प्रतिक्षा, वडिलांनी बांधलेले ओस पडलेले अंगण, आणि गाव सोडण्याची एक न बोललेली वेदना आहे. या सर्व वेदनांच्या काळात आता राजकीय नेतृत्वाने आणि प्रशासनाने अंतर्मुख होऊन ठोस पावले उचलण्याची वेळ आली आहे. कारण गावे रिकामी होत आहेत, पण प्रश्न जीवंत आहेत.



● भारतीय बौध्द महासभा जिल्हा उत्तर शाखेच्या वतीने सुर्यपूत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांची ११३ वी जयंती रिस येथील जिल्हा कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुशील वाघमारे, सरचिटणीस प्रकाश सोनावळे, सिध्दार्थ गायकवाड व इतर पदाधिकारी.

# टोरेंट पॉवर प्रकल्प पर्यावरणाच्या मुळावर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात हजारो वन जमिनीचा वापर करून टोरंट कंपनी जलविद्युत प्रकल्प साकारत आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी वन जमिनीवर बुलडोझर फिरवला जाणार असून कर्जत तालुक्यात पर्यावरणाचा ऱ्हास करण्यास कारणीभूत ठरणार आहे. दरम्यान, तालुक्यात पाच धरणे बांधली जात असून असून कर्जत तालुका भविष्यात भूकंप प्रवण तालुका बनणार आहे.





तालुक्याच्या दक्षिण दिशेला उल्हास नदीवर कोंढाणे धरण सिडकोकडून बांधले जात आहे. तर पूर्व भागात पोटल पाली आणि कोतवाल खलाटी भागात टोरंट तर भिवपुरी भागात पेज नदीवर टाटा आणि बोरगाव येथील पोश्री नदीवर पोशीर धरण आणि चिल्हार नदीवर शिलार येथे शिलार धरण होणार आहे. पाचही धरणे तालुक्याच्या दोन दिशेला बांधली जाणार आहेत. या पाचही धरणामुळे तालुक्यातील नद्या पावसाळ्यात देखील कोरड्या राहण्याची शक्यता आहे. तालुक्यात गरज नसताना पाच धरणे बांधली जाणार असल्याने भूकंपाच्या छायेत तालुका येणार आहे.

प्रकल्पासाठी शेतकरी जमीन घेतली जाईल आणि शेती क्षेत्र कमी होणार आहे, आणि स्थानिक अन्ननिर्मितीवर परिणाम होईल. प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जातील. त्यामुळे परिसरात उष्णता वाढेल. मातीची ओलसरता कमी होईल. पावसाळ्यात भूस्खलन व मातीची धूप होईल. तसेच मानवी आरोग्यावर परिणाम होईल. त्यामुळे कर्जत तालुक्याचा ऱ्हास करणारी प्रकल्प सरकारने रद्द करावेत यासाठी मोठे आंदोलन तालुक्यात उभे राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# विविध उपक्रमातून खारपाटील यांचा वाढदिवस साजरा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील राजेंद्र खारपाटील यांचा वाढदिवस (दि.१२) डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करीत, पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलनात साजरा करण्यात आला. तर चिरनेर गावातील श्री महागणपती मित्र मंडळ व महिला मंडळाच्या वतीने देखील चिरनेर गावातील श्री महागणपतीच्या भव्य प्रांगणात खारपाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. प्रारंभी खारपाटील यांच्यासह कार्यकर्त्यांनी चिरनेरच्या श्री महागणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांसमवेत केक कापून हा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने खारपाटील यांना सकाळपासून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेटून व फोनवर संपर्क साधून, वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

खारपाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने श्री महागणपती मित्रमंडळाचे अध्यक्ष अमर ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मंडळातील अनेक जोडप्यांच्या वतीने त्यांची पंचारतीने ओवाळणी करीत पुष्पगुच्छ देत, औक्षण करण्यात आले. विद्या संकुलनात रक्तदान शिबिराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी पी.पी. खारपाटील, संतोष ठाकूर, भास्कर मोकल, सुरेश पाटील, अलंकार परदेशी, अरुण पाटील, सचिन घबाडी, संजय पाटील, वर्षा खारपाटील, सुनिता खारपाटील, सागर खारपाटील, समीर खारपाटील, अर्चना खारपाटील तसेच कुटुंबातील अन्य सदस्य यांच्यासह व्यासपीठावर अनेक मान्यवर तसेच पंचक्रोशीतील वेगवेगळ्या क्षेत्रातील पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.





# डिस्कॉव्हर रेसॉर्टला ग्रामपंचायतकडून नोटिसा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील एक मोठे वेडिंग डेस्टिनेशन म्हणून प्रसिद्ध असलेल्या नेरळ कळंब रस्त्यावरील डिस्कव्हर रिसॉर्ट प्रसिद्ध आहे. मात्र या रेसॉर्टकडे कोल्हारे ग्रामपंचायतीची तब्बल ४४ लाख मालमता कर थकीत आहे. कोल्हारे ग्रामपंचायत गेली पाच वर्षे केवळ नोटिसा देण्याचे काम करीत असून ग्रामपंचायतीने ठरवलेली जप्तीची कारवाई ग्रामपंचायत प्रशासन कधी करणार असा प्रश्न एका ग्रामपंचायत सदस्याने उपस्थित केला आहे. दरम्यान ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून थकीत घरपट्टीसाठी संबंधितांनी नोटिसा बजावण्यात आली आहेत अशी माहिती दिली आहे.



२०१४ पासून घरपट्टी वसूल करण्याचे अनेक प्रयत्न झाले तरी देखील आजच्या तारखेला या रिसॉर्ट कंपनीकडे तब्बल ४४ लाखांची घरपट्टी थकीत आहे. परंतु संबंधित हॉटेल प्रशासन आणि कंपनीकडून कोणत्याही प्रकारचे सहकार्य होतांना दिसत नाही. ग्रामविकास अधिकारी संजय राठोड यांनी थकीत घरपट्टी बद्दल नोटीस बजावली आहे. मात्र जप्तीच्या कारवाई बद्दल कोणतीही माहिती ग्रामपंचायत प्रशासन यांच्याकडून दिली जात नसल्याने थकीत घरपट्टी वसूल होणार का? हा प्रश्न कायम आहे.

# उन्हेरे गरम पाण्याच्या कुंडावर गर्दी

## ■ गुलाबी थंडीत पर्यटक लुटतात आनंद

**। राबगाव/ पाली । प्रतिनिधी ।**

पाली येथून दोन किलो मीटर अंतरावर उन्हेरे गावानजीकच गरम पाण्याचे झरे व विठ्ठल मंदिर या ठिकाणामुळे प्रसिद्ध आहे. गरम पाण्याचे कुंड श्रीरामाने बाण मारून स्नानासाठी सीतामाईना हे स्थान तयार करून दिले अशी पुराणकथा सांगितली जाते. गंधकमिश्रीत उष्णोदक पाण्याच्या कुंडात स्नान केल्यास त्वचेचे विकार, सांधे दुखी आजारावर रामबाण उपाय असल्याचे सांगितले जाते. यामुळे येथे नेहमीच पर्यटक येत असतात. मात्र, सध्या वाढलेली थंडी पहाता येथे येऊन स्नानाचा आनंद पर्यटक घेत आहेत. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर शालेय सहली देखील या ऐतिहासिक स्थळाला भेट देत आहेत.



जगभरातून अनके पर्यटक सर्व ऋतूमध्ये गरम पाण्याच्या कुंडात स्नानासाठी उन्हेरे येथे येतातच. मात्र थंडीच्या दिवसात पर्यटकांची वर्दळ असतेच मात्र पाली शहरातून व उन्हेरच्या आजूबाजूच्या गावातून लोक पहाटे स्नानासाठी येण्यास सुरवात होते. स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र कुंडे असून दुसरा कुंड बाहेरील बाजूस आहे. गरम पाण्यात स्नान केल्यास ताजेतवाने वाटते व शरिरातील क्षीणपणा नाहीसा होतो.

पाली बल्लाळेश्वराच्या दर्शनाला आलेले भाविक बाप्पाच्या दर्शनानंतर या गरम पाण्याच्या कुंडात स्नानासाठी येतात. शाळेच्या सहली मोठ्या प्रमाणात येत आहेत आणि गरम कुंडच्या पाण्याचा आनंद पर्यटक घेत आहेत.

> **बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणारे पर्यटक तसेच विद्यार्थ्यांचे येणाऱ्या सहली यामुळे सध्या उन्हेरे येथील गरम पाण्याच्या कुंडावर मोठया प्रमाणात गर्दी होत आहे. त्यामुळे येथील छोटे व्यवसायिक तसेच विठ्ठल रुक्माई मंदिरा समोर फुले हार विकणारे सुखावले आहेत. तसेच विठ्ठल रुक्माई देवस्थान ट्रस्टच्या वतीने येथे येणाऱ्या पर्यटकाची पार्किंग, स्वच्छतागृहची व्यवस्था केलेली आहे. -शिवराम पवार, अध्यक्ष, विठ्ठल रखुमाई देवस्थान ट्रस्ट, उन्हेरे**

५० दुर्मिळ प्राचीन मंकला कातळ कोरीव पटखेळ सापडले | सामाजिक जीवन व स्थानिक संस्कृतीवर पडला प्रकाश

# घोसाळगडावरील प्राचीन अमूल्य ठेवा उजेडात

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील घोसाळगडाच्या पायथ्याशी इतिहासाला उजाळा देणारा अत्यंत महत्त्वाचा पुरावा वन्यजीव अभ्यासक रोशन म्हात्रे व सह्याद्रीत गडकिल्ले भटकंती करणारे सुजल पडवळ यांनी शोधून काढला आहे. येथील खडकात कोरलेल्या गोलाकार खळग्यांच्या पद्ध-तशीर मांडणीतून हा खेळ मंकला प्रकारातील प्राचीन कातळ पटखेळ असल्याचे स्पष्ट झाले आहे. याबाबत कुतूहल म्हणून हा दुर्मिळ ऐतिहासिक ठेवा पाहण्यासाठी अनेकजण आपली पाऊले गडाच्या दिशेने टाकत आहेत.

याठिकाणी तब्बल ५० मंकला पटखेळ सापडले असून अजूनही सापडण्याची शक्यता आहे व त्या दृष्टीने संशोधन देखील सुरू आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रात एकाच ठिकाणी ५० मंकला पटखेळ कुठेच आढळून आले नसल्याचे म्हणणे काही अभ्यासकांचे आहे. रोशन म्हात्रे व सुजल पडवळ यांनी अंत्यत परिश्रमाने हा अमूल्य ठेवा उजेडात आणला आहे. विशेष म्हणजे सह्याद्री डोंगर रांगांत या खेळाचे पुरावे अत्यल्प असल्यामुळे घोसाळगड परिसरात आढळलेला हा पुरावा अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक महत्त्वाचा ठरतो. या शोधामुळे घोसाळगडाच्या परिसरात प्राचीन वसाहत आणि व्यापारी मार्गांचे संकेत मिळतात.





ऐतिहासिकदृष्ट्या असे कातळ खेळ पाण्याजवळ, वस्ती किंवा रहदारीजवळ, सामूहिक जमावाच्या ठिकाणी, पुरातन व्यापारी मार्गांवर कोरले जातात. यावरून घोसाळगडाच्या प्राचीन वसाहत, व्यापार-वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग होता, अशी ठोस शक्यता समोर येते. याचा अर्थ या परिसरातून नियमित मानववस्ती, व्यापारी हालचाल, सामाजिक-सांस्कृतिक संवाद होत होता. यातून प्राचीन काळातील खेळ, सामाजिक जीवन व स्थानिक संस्कृती यांचे एकत्रित चित्र स्पष्ट होऊन त्यावर प्रकाश पडला आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणात मंकला सापडणे ही कदाचित महाराष्ट्रातील पहिली नोंद असू शकते. या माध्यमातून येथील इतिहास, व्यापारी मार्ग कसा होता व्यापार कसा चालत होता, संस्कृती कशी होती यांसारख्या बाबी उजेडात येऊ शकतात.

> **येथील स्थानिक रहिवासी असून या ठिकाणी भटकंती करत असताना अशा प्रकारे कातळावर कोरलेली ही नक्षी दिसली. मित्र सुजल पडवळ यास याबाबत सांगितले असता त्या ठिकाणी हे प्राचीन मंकला असल्याचे समजले. आणि मग दोघांनी मिळून तो परिसर पिंजून काढला व पन्नास पेक्षा अधिक मंकला सापडले. याद्वारे इतिहासाला आणखी उजाळा मिळाला आहे. येथे शिवलिंग सारखे एक कोरलेली आकृती देखील सापडली आहे. त्याबाबत संशोधन करायचे आहे. -रोशन म्हात्रे, वन्यजीव अभ्यासक, घोसाळे,**

### जगातील जुना गणकाधारित खेळ

मंकला हा जगातील सर्वात प्राचीन रणनीती खेळांपैकी एक आहे. त्याचा उगम इ.स.पू. ६००-२०० च्या काळात आफ्रिकेत झाला. दगडात केलेल्या खड्ड्यांमध्ये बिया/दगड वापरून खेळ खेळला जात असे. आफ्रिकेतून हा खेळ मध्यपूर्वेत नंतर व्यापाऱ्यांमुळे भारतात (इ.स. ७००-९००) पोहोचला. भारतात तो अळीगुळी मणे, आदी नावांनी प्रसिद्ध झाला. महाराष्ट्रात हा खेळ दगडी ओट्यांवर आणि किल्ल्यांवर खेळला जात असे. त्यामुळे मंकला हा १००० वर्षांपेक्षा जास्त काळ भारतात खेळला जात असून, मध्यपूर्व आणि दक्षिण आशियात आढळणारा रणनीतीवर आधारित बोर्ड गेम मानला जातो.

# बेछूट पर्यटन आवरा

पर्यटन हा रोजगार व पैसा मिळवून देणारा उद्योग आहे हे खरे आहे. पण कोणतीही गोष्ट बेछूट वाढली वा करू दिली गेली की त्याचे दुष्परिणाम होतातच. तसे पर्यटन व्यवसायाबाबत होऊ लागले आहे. गोव्यातील समुद्राकाठचे पर्यटन असो की उत्तराखंडमधील हिमालयाच्या परिसरातील देवदर्शन, याचे विपरीत परिणाम होऊ लागले आहेत. झपाट्याने पर्यटन वाढत असलेल्या रायगड जिल्ह्याने यापासून काही बोध घ्यायला हवा व वेळीच उपाय योजायला हवेत. यासाठी इतरत्र काय झाले याकडे लक्ष द्यायला हवे. उत्तर गोव्यातील हडफडे गावातील एका नाईट क्लबला लागलेल्या आगीत २५ निरपराध व्यक्तींचा बळी गेला. हा क्लब बेकायदा होता. नदीच्या उथळ पाण्यातील मिठागरामध्ये मध्यभागी हा क्लब उभारण्यात आला होता. त्याच्या बांधकामात बहुतांश लाकडाचा वापर करण्यात आला होता. पाण्यातून क्लबपर्यंत येण्यासाठीही एकच अरुंद लाकडी वाट ठेवण्यात आली होती. त्यामुळे अग्निशामक दलही तेथे पोचू शकले नाही. सरकारची कोणतीही परवानगी न घेता हे बांधकाम केले होते. पण हे वाक्यही फसवे आहे. कारण क्लबचे बांधकाम बेकायदा असले तरी तिथे हॉटेल चालवण्याचा, दारु विकण्याचा असे सर्व परवाने मालकाकडे होते. गेली वीस वर्षे तो चालू आहे. ग्रामपंचायतीने नावापुरती त्याला बेकायदा बांधकाम ाबद्दलची नोटीस दिली होती. पण तिनेही पुढे काही कारवाई केली नव्हती. मायकेल लोबो नावाचे एक धटिंगण आमदार या भागाचे नेते आहेत. त्यांना किंवा सरकारी अधिकाऱ्यांना या क्लबचे बेकायदेशीर असणे कधीच खटकले नाही. उलट त्यांनी त्याचा पाहुणचारही घेतला असण्याची शक्यता आहे. याच लोबो यांचे एका हॉटेल बेकायदा ठरवून पाडण्याचे आदेश दिले गेले आहेत. पण गेल्या सात वर्षांनंतरही ते खुलेआम चालू आहे. जोवर अशी काही दुर्घटना घडत नाही तोवर अशा धंद्यांकडे दुर्लक्ष केले जाते. येथील धंद्यांमधून सामान्य गरीब लोकांना रोजगार किंवा चार पैसे मिळत असल्याने ते काही बोलण्याची शक्यता नसतेच. अनेकदा ही बांधकामे बेकायदा आहेत हेही त्यांना ठाऊक नसते.

### बेकायदा बांधकामे

त्यामुळे या प्रकारांची खरी जबाबदारी येते ती सरकारी अधिकारी व राजकीय नेत्यांची. अलिबाग, मुरुड किंवा सह्याद्रीकडच्या माथेरान, कर्जत, खोपोली अशा भागांमध्ये सध्या प्रचंड प्रमाणात पर्यटन वाढले आहे. मुंबई व पुण्यातून एक दिवसात येऊन जाण्यासाठी अत्यंत सोईचे म्हणून रायगडला पसंती मिळत असते. यातून स्थानिकांचा विकास झाला हे खरे आहे. पर्यटनाला पूर्णपणे कोणाचा विरोध असण्याचे कारणही नाही. मात्र एकदा धंदा वाढला की, बेकायदेशीर कृत्येही वाढतात. आपल्याकडे तसेच होऊ लागले आहे. परवानगी न घेता, सागरी हद्दीबाबतचे नियम तोडून वाटेल तशी बांधकामे सर्वत्र चालू आहेत. यामध्ये सुरक्षा नियमांचे पालन होतेच असे नाही. गोवा हे पूर्वापार पर्यटनासाठी ओळखले जाणारे राज्य आहे. परदेशी पर्यटक येण्यासाठी इथे चांगल्या सुविधा, स्वच्छता इत्यादी असणे आवश्यक आहे हे सर्वांना कळते. पण धंद्यापुढे ते वळत नाही. त्यामुळेच कळंगुट, बागा, अंजुना इत्यादी किनाऱ्यांच्या परिसरात अंदाधुंद हॉटेल्स, क्लब्स, लॉजेस इत्यादी उभी राहिली आहेत. यात सर्वपक्षीय सामील आहेत. त्यामुळे कोण कोणाला बोलणार किंवा आक्षेप घेणार असा प्रश्न आहे. हडफडेच्या क्लबला आग लागल्यानंतर काही जण पळून जाऊ शकले. पण किचनमधले कर्मचारी अडकले व जळून खाक झाले. अशी एखादी आगीची घटना घडली की, अग्निशाम क दलाची कशी व्यवस्था करता येईल असे पाहिले जाते. पण याचे मूळ बेकायदा बांधकामे व अनिर्बंध विकासामध्ये आहे हे लक्षात घेतले जात नाही. आपल्याकडच्या छोट्या रस्त्यांवर एखादा अपघात झाला की, स्पीड ब्रेकर करा किंवा वाहतुकीचे पोलिस ठेवा असे उपाय होतात. पण हाही प्रश्न मुळात अनिर्बंध विकास, वाहनांची बेफाट वाढलेली संख्या यांच्याशी जोडलेला असतो हे लक्षात घेतले जात नाही. माळीण किंवा इरशाळगड अशा दुर्घटना म्हणजे सह्याद्री पोखरण्याचे परिणाम आहेत हे विसरले जाते. आजाराच्या लक्षणांपेक्षा मूळ कारणांवर उपाय करणे हे अधिक गरजेचे आहे.


### बिबटे –आजाराचे लक्षण

सध्या नागाव परिसरात बिबट्याचा वावर आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. दोन-तीन दिवस झाले तरीही त्याला पकडण्यात यश आले नव्हते. किनारपट्टीच्या या भागात सहसा बिबट्या कधी आढळला नव्हता. पण आता इथपर्यंत पोचला आहे हे चिंताजनक आहे. रायगडच नव्हे तर पूर्ण राज्यभरात सध्या बिबट्या मंडळींनी थैमान घातले आहे. नागपूर, नाशिक, पुणे, नगर अशा अनेक ठिकाणी एखादा साथरोग पसरावा तसे बिबटे नागरी वस्तीत येण्याची साथ आली आहे. या सर्व परिसरांचा अमानुष विकास हाच यामागचे कारण आहे. जंगले तुटू लागली, माणसे जंगलात घुसून घरे बांधू लागली. जंगलातील बिबट्यांचे खाद्य संपले. हरिणे इत्यादींची पैदासच कमी झाली. साहजिकच खाण्याच्या शोधात बिबटे मानवी वस्तीत येऊ लागले. कुत्री, गुरे, कोंबड्या पळवू लागले. हे पूर्वीही होत असे. पण अपवादाने. आता ते सर्रास सर्वत्र होऊ लागले आहे. हेदेखील आजाराचे लक्षण आहे. खरा आजार आहे तो कायदे धाब्यावर बसवून सगळे ओरबाडण्याची माणसांची वृत्ती. इलाज तिच्यावर केला जाण्याची गरज आहे. सध्या उत्तराखंडमध्ये हिवाळी पर्यटनाची चर्चा सुरू आहे. मार्च ते जून या उन्हाळी काळात तेथे चारधाम पर्यटन होते. गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ यांची यात्रा करणे हे हिंदू धर्मीयांसाठी पवित्र मानले जाते. मात्र ही यात्रा शक्यतो पूर्वी पायी व शरीराला कष्ट देऊन केली जात असे. आता ते चित्र बदलले आहे. नितीन गडकरी यांनी गेल्या काही वर्षांमध्ये हिमालय पोखरून प्रचंड प्रमाणात रस्ते बांधले आहेत. त्यामुळे लोक वाटेल तसे गाड्या उडवत इथे फिरू लागले आहेत. दरवर्षी उन्हाळ्यात इथे सुमारे ५० लाख भाविक किंवा पर्यटक येतात. जेमतेम एखादा हजार वस्तीची गावे वा वाड्यांमध्ये हे लाखो पर्यटक घुसतात. त्यांच्यासाठी आलिशान हॉटेले बांधली जातात. गाड्यांची वाहतूक तर इतकी वाढली आहे की या भागांमध्ये अनेक मुंबईसारखे ट्रॅफिक जाम होत असतात. हिवाळ्यात या भागात बर्फवृष्टी होते. त्यामुळे पूर्वी निदान हिवाळ्यात हा भाग बंद असे. देवालयेही बंद ठेवली जात. आता चार धामांना पर्यायी अशी खरसाली, मुकिबा, उखिमठ अशी नवीन स्थाने निर्माण करण्यात आली आहेत. त्यांना भेट देणाऱ्यांची संख्या आता लाखांमध्ये जाईल. इथल्या जोशीमठासारख्या प्रसिद्ध ठिकाणांच्या जमिनी खचल्या आहेत. तेथील वस्त्या खाली करण्याची वेळ आली आहे. बांधकामे, विकास, पर्यटन इत्यादींचा अतिरेक हा अखेर आपल्याच जिवावर उठणारा आहे. रायगडवासियांनी या हाका ऐकून सावध व्हायला हवे.

**विचार**

# एआय डेटा सेंटर्सचे विस्तारते विश्व

***डिजिटल डेटा साठवणारी, त्यावर प्रक्रिया करणारी प्रचंड संगणकीय यंत्रणा म्हणजे डेटा सेंटर्स. ती आधुनिक जगाची मेंदू-प्रणाली मानली जाते. तिथे हजारो शक्तिशाली सर्व्हर्स, सुपरकॉम्प्युटर्स, नेटवर्क डिव्हाइसेस आणि स्टोरेज सिस्टिम्स एकत्र काम करतात. प्रचंड डेटा साठवण, मशीन लर्निंग मॉडेल्सचे प्रशिक्षण, डीप लर्निंग प्रक्रिया, क्लाऊड कॉंप्युटिंग सेवा, रिअल-टाईम डेटा प्रोसेसिंग त्यांची ठळक वैशिष्ट्ये मानता येतात.***



**डॉ. दीपक शिकारपूर**

एकविसाव्या शतकात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' ही मानवजातीच्या विकासाची एक नवी दिशा ठरली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. या तंत्रज्ञानाचा पाया म्हणजे डिजिटल डेटा आणि तो साठवण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेली प्रचंड संगणकीय यंत्रणा डेटा सेंटर्स म्हणून ओळखली जाते. विशेषतः एआय डेटा सेंटर्स ही आधुनिक जगाची मेंदू-प्रणाली मानली जाते. ही केंद्रे केवळ माहिती साठवत नाहीत, तर ती विश्लेषित करून भविष्याचे निर्णय घेण्यास मदत करतात. एआय डेटा सेंटर्स म्हणजे अशी अत्याधुनिक केंद्रे, जिथे हजारो शक्तिशाली सर्व्हर्स, सुपरकॉम्प्युटर्स, नेटवर्क डिव्हाइसेस आणि स्टोरेज सिस्टिम्स एकत्र काम करतात. प्रचंड प्रमाणातील डेटा साठवण, मशीन लर्निंग मॉडेल्सचे प्रशिक्षण, डीप लर्निंग प्रक्रिया, क्लाऊड कम्प्युटिंग सेवा, रिअल-टाईम डेटा प्रोसेसिंग ही अशा डाटा सेंटर्सची ठळक वैशिष्ट्ये मानता येतात. हाय-परफॉर्मन्स संगणकप्रणाली, २४७ अखंड कार्यप्रणालीने सज्ज अशी ही डेटा सेंटर्स कधीही बंद होत नाहीत. दिवस-रात्र सतत सुरू राहतात. उच्च दर्जाची सुरक्षा प्रणाली, सायबर सिक्युरिटी, बायोमेट्रिक लॉक, फायरवॉल्सचा वापर. प्रगत कूलिंग सिस्टीम्स, सर्व्हर्स गरम होऊ नयेत म्हणून विशेष एअर कंडिशनिंग आणि लिक्विड कूलिंग, ऑटोमेशन आणि रोबोटिक देखभाल, अनेक ठिकाणी रोबोटिक सिस्टीम्स वापरून देखभाल ही या यंत्रणेची आणखी काही वैशिष्ट्ये.

एआय डेटा सेंटर्स जितकी फायदेशीर आहेत, तितकेच पर्यावरणावर त्यांचे गंभीर परिणामही आहेत. प्रचंड वीज वापर ही त्यांची एक महत्वाची मर्यादा ठरते. डेटा सेंटर्स खूप मोठ्या प्रमाणात वीज वापरतात. ही वीज प्रामुख्याने कोळशावर आधारित असते, त्यामुळे कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन वाढते. ग्लोबल वॉर्मिंगला चालना मिळते. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे कूलिंग सिस्टीमसाठी प्रचंड प्रमाणात पाणी लागते. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होते. या सेंटर्सचा दुष्काळग्रस्त भागांवर गंभीर परिणाम होतो. डेटा सेंटर्स मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण करतात, आजूबाजूच्या वातावरणाचे तापमान वाढवते. जुने सर्व्हर्स, केबल्स, इलेक्ट्रॉनिक उपकरणे यामुळे विषारी घटक जमिनीत मिसळतात. भारतामध्ये डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया या योजनांमुळे डेटा सेंटर्सची संख्या वाढत आहे. मुंबई, पुणे, हैदराबाद, बंगळुरू, चेन्नई येथे मोठी डेटा सेंटर्स उभी राहत आहेत. भविष्यात ग्रीन डेटा सेंटर्सचा वापर वाढेल. सौर, पवन ऊर्जेचा वापर होईल. पर्यावरणपूरक धोरणे लागू होतील. एआय डेटा सेंटर्समुळे होणारे धोके कमी करण्यासाठी काही उपाय आवश्यक आहेत. सौर, पवन, जलविद्युत नवीकरणीय ऊर्जेचा वापर ग्रीन कूलिंग टेक्नॉलॉजी पाणी बचत करणारी प्रणाली याबाबत यापुढे आग्रही रहावे लागणार आहे. ई-वेस्ट रिसायकलिंग, कार्बन फूटप्रिंट कमी करणे, स्थानिक लोकांना कौशल्य प्रशिक्षण हे ही काही दखलपात्र मुद्दे आहेत.

भविष्यात एआय डेटा सेंटर्स ही केवळ सर्व्हर ठेवण्याची ठिकाणे न राहता 'डिजिटल फॅक्टरीज' आणि 'इंटेलिजंट ब्रेन्स' म्हणून काम करतील. येत्या दहा ते वीस वर्षांमध्ये खालील महत्त्वाचे बदल दिसतील. ग्रीन डेटा सेंटर्सचा उदय होणार आहे. भविष्यात बहुतेक डेटा सेंटर्स सौर, पवन व जलविद्युत ऊर्जेवर चालतील. 'कार्बन-न्यूट्रल' आणि 'नेट-झिरो' डेटा सेंटर्स ही संकल्पना प्रत्यक्षात येईल. भारतासारखा सूर्यप्रकाश विपुल असलेला देश या क्षेत्रात आघाडी घेऊ शकतो. मोठ्या, केंद्रीकृत डेटा सेंटर्ससोबतच लहान, स्थानिक 'मायक्रो डेटा सेंटर्स' वाढतील. त्यामुळे डेटा प्रोसेसिंग वापरकर्त्याजवळ होईल, वेग वाढेल आणि इंटरनेटवरील भार कमी होईल. येथे क्वांटम आणि न्यूरोमॉर्फिक कॉंप्युटिंगची महत्वाची भूमिक असू शकते. भविष्यात क्वांटम कॉंप्युटर्स आणि मानव मेंदूसारखे काम करणाऱ्या 'न्यूरोमॉर्फिक चिप्स' वापरात येतील. यामुळे कॉंप्युटींगची गती आणि क्षम तांमध्ये अभूतपूर्व वाढ होईल. याच सुमारास ऑटोमेटेड, सेल्फ-हिलिंग डेटा सेंटर्सही आकाराला येतील. उपलब्ध यंत्रणा स्वतःच आपल्या डेटा सेंटर्सचे मॉनिटरिंग, देखभाल आणि दुरुस्ती करतील. त्यामुळे 'सेल्फ रिपेअरिंग' सिस्टीम्स सामान्य होतील. यथावकाश केवळ शहरांमध्येच नव्हे तर ग्रामीण आणि अर्ध-ग्रामीण भागातही डेटा सेंटर्स उभारली जातील. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था डिजिटल युगात सामील होईल. डेटा सेंटर्समुळे अनेक नवीन व्यवसाय संधी निर्माण होत आहेत. या संधी फक्त मोठ्या कंपन्यांसाठी नसून लघु आणि मध्यम उद्योजकांसाठीही खुल्या आहेत.

डेटा सेंटर्सच्या वाढीने अनेक प्रकारचा रोजगारही निर्माण करुन दिला आहे. यामुळे काही प्रकारचे स्टार्ट अप्स उभे राहू शकतात. यातून एआयची सेवा प्रदान करणारे प्लेटफॉर्म सुरु करता येऊ शकतात. डेटा ॲनॅलिटिक्स कंपन्या सुरु करुन क्लाऊड-आधारित सॉफ्टवेअर सेवा देता येऊ शकतात. उद्योगानुरुप सोल्यूशन्स (उदा. आरोग्य, शेती, फायनान्स) देता येतील. डेटा सेंटर्ससाठी सहाय्यक व्यवसायही उभे राहू शकतात. डेटा सेंटर्सच्या भोवती 'इको-सिस्टिम' तयार होते. उदा. कूलिंग सिस्टीम मॅन्युफॅक्चरिंग, पॉवर बॅकअप सोल्यूशन्स (युपीएस, जनरेटर), फायर सेफ्टी आणि सिक्युरिटी सिस्टीम्स, केबलिंग आणि नेटवर्किंग सेवा. हे व्यवसाय (लघु-मध्यम उद्योगांसाठी) खूप महत्त्वाचे ठरत आहेत. याखेरीज ग्रीन टेक आणि सस्टेनेबिलिटी स्टार्ट अप्स तसेच पर्यावरणीय समस्यांवर उपाय देणाऱ्या कंपन्यांसाठी मोठी संधी आहे. त्याचप्रमाणे ऊर्जा कार्यक्षम कूलिंग टेक्नॉलॉजी, वॉटर रिसायकलिंग सिस्टीम्स, ई-वेस्ट रीसायकलिंग युनिट्स, सौरऊर्जा आधारित डेटा सोल्यूशन्स, प्रशिक्षण आणि स्किल डेव्हलपमेंट सेंटर यांच्यासाठीही उत्तम संधी उपलब्ध होऊ शकतात. डेटा सेंटर्ससाठी कुशल मनुष्यबळाची गरज वाढत असल्यामुळे प्रशिक्षण संस्था, डेटा सायन्स अकॅडमी, सायबर सेक्युरिटी ट्रेनिंग सेंटर, नेटवर्किंग आणि हार्डवेअर ट्रेनिंग स्कूल हे नवे उद्योजकीय क्षेत्र बनत आहे. ग्रामीण आणि टियर-२/टियर-३ शहरांमध्येही मोठ्या संधी उभ्या रहात आहेत. लहान शहरांमध्ये आता नवी डेटा सेंटर्स उभी राहत आहेत. त्यामुळे स्थानिक सर्विस प्रोव्हायडर, लोकल क्लाऊड होस्टिंग, ग्रामीण डिजिटल सेवा केंद्रे यामधून स्थानिक उद्योजक पुढे येऊ शकतात.

भारतासाठी डेटा सेंटर्स हे केवळ तंत्रज्ञानाचे क्षेत्र नसून राष्ट्रीय विकासाचे सामरिक साधन बनत आहेत. सरकारने डिजिटल इंडिया अभियान, मेक इन इंडिया, डेटा लोकलायझेशन पॉलिसी, नॅशनल स्ट्रॅटेजी अशा अनेक महत्त्वाच्या योजना सुरू केल्या आहेत. यामुळे भारतात डेटा सेंटर्समधील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. 'एआय २०३० इंडिया' उपक्रम ही सरकार-समर्थित योजना आहे. भारताला २०३० पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये जागतिक नेता म्हणून स्थान देण्याचा तिचा उद्देश आहे. नैतिक अंमलबजावणी आणि सामाजिक प्रभावावर जोरदार भर देऊन भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक आणि जबाबदार एआय अवलंब करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे एकविसाव्या शतकातील सर्वात प्रभावी तंत्रज्ञान आहे आणि भारताने त्याचा उपयोग करून सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्याचा निर्धार केला आहे. 'एआय फॉर इंडिया २०३०' हे धोरण भारताच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताकडे काही नैसर्गिक फायदे आहेत. विपुल सूर्यप्रकाश सौर ऊर्जे साठी भरपूर प्रशिक्षित मनुष्यबळ, तुलनेने कमी कामगार खर्च, मोठा डिजिटल युजर बेस यांचा या दृष्टिकोनातून फायदा घेता येईल. असे असले तरी भारतासमोरील डाटा सेंटर संस्कृतीच्या विस्तारापुढे काही मोठी आव्हाने आहेत. वीज पुरवठ्यातील अस्थिरता (ग्रामीण भागात), पाण्याची वाढती टंचाई, सायबर सिक्युरिटी धोके, कुशल मनुष्यबळ आणि सामान्य लोकांमध्ये आढळणारी डिजिटल दरी या आव्हानांचा या दृष्टीकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतात स्टार्टअप संस्कृती वेगाने वाढत आहे. बंगळुरू, हैदराबाद, पुणे, गुरुग्राम हे स्टार्टअप हब्ज होत आहेत. सरकारी आणि खाजगी इनक्युबेशन सेंटर्स तयार होत आहेत. व्हेंचर कॅपिटल आणि एंजल गुंतवणूक वाढत आहे. यामुळे आधारित उद्योजकतेला पोषक वातावरण तयार झाले आहे.

deepak@deepakshikarpur.com
(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

# सामाजिक बांधिलकीतून नाविन्य उपक्रम

**अंतरा पारंगे**

रायगड जिल्ह्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे रोजगाराचे दालनही खुले होत आहे. जिल्ह्यातील वेगवेगळ्या कंपन्यांमार्फत सीएसआर फंडातून कंपनीच्या परिसरातील गावांचा विकास साधम्याचा प्रयत्न केला जातो. त्यामध्ये आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक विकास कामे सामाजिक बांधिलकीतून केली जातात. त्याचाच एक भाग म्हणजे उसर येथील गेल कंपनीच्या माध्यमातून परिसरातील गावांमध्ये विकास करण्याबरोबरच मुलींसाठी स्वरक्षणाचे धडे देण्याचे काम केले जात आहे. उसर येथील गेल (इंडिया) कंपनीने सामाजिक बांधिलकी जपत फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून परिसरातील असंख्य गावे, वाड्यांमधील नागरिकांना आरोग्य सेवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तर उसर येथील प्राथमिक शाळा सुशोभीकरण, पेव्हर ब्लॉकचे रस्ते, उसर, मुळखानाव, कुणे, वेलवली, भेरसे, वेलतवाडी, भादाणे व वनवली या गावांमध्ये सौर उर्जेवर आधारित पाणीपुरवठा करण्यासाठी सोलार पॅनलदेखील बसविण्यात आले आहे. अशाप्रकारे गेल (इंडिया) लिमिटेड कंपनी आपल्या कॉर्पोरेट पर्यावरण दायित्वाच्या (सीईआर) अंतर्गत विविध उपक्रमांद्वारे नेहमी शाश्वत विकासाला चालना देत आहे.

गेल कंपनीमार्फत परिसरात वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. जिल्ह्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचाराच्या घटना वाढू लागल्या आहेत. संकटकाळी स्वतःचे रक्षण करण्याचे बळ मुलींना मिळाले पाहिजे, हा उद्देश समोर ठेवून गेल कंपनीमार्फत बेलोशी येथील को.ए.सो. लोकनेते ॲड. दत्ता पाटील हायस्कूलमधील शाळकरी मुलींसाठी मोफत स्वरक्षणाचे धडे देण्याचा उपक्रम सुरु केले होते. या कालावधीत मुलींना कराटेचे धडे देऊन



त्यांना सक्षम बनविण्याचा प्रयत्न कंपनीकडून करण्यात आला. या शिबिरात असंख्य विद्यार्थिनींनी यात सहभाग घेऊन स्वरक्षणाचे धडे घेतले.

खानाव ते बेलोशी हा ग्रामीण भाग आहे. या परिसरात डोंगर माथ्यावर राहणारा आदिवासी, ठाकूर समाजही मोठ्या संख्येने आहे. या भागातील नागरिकांना उपचारासाठी तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे, यासाठी उसर येथील गेल इंडिया कंपनीमार्फत नोव्हेंबरपासून कंपनीने फिरता दवाखाना गावागावात सुरु केला आहे. दर दिवशी वेगवेगळ्या गावांमध्ये जाऊन गावांतील नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करून त्यांच्यावर उपचार केले जात आहे.

सीईआर, सीएसआर कार्यक्रमांतर्गत मोफत मूलभूत आरोग्य सेवांसह वोक्हार्ट फाऊंडेशनची मोबाईल क्लिनिक रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. एमबीबीएस दर्जाचे डॉक्टर, परिचारिका, फार्मासिस्ट, औषधे या सुविधा रुग्णवाहिकेमध्ये उपलब्ध करण्यात आल्या आहेत. खानावसह वेलवली खानाव, उसर, घोटवडे, मल्याण, महाजने, बेलोशी आदी परिसरातील असंख्य गावे, वाड्यांमधील नागरिकांना आरोग्य सेवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या फिरत्या दवाखान्याला गावे, वाड्यांमधील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून या फिरत्या दवाखान्याचा गावांतील रुग्णांना आधार मिळाला आहे. हजारो रुग्णांनी या फिरत्या दवाखान्यातून उपचार घेतल्याचे चित्र आहे.

अल्पवयीन मुलीवर अत्याचाराच्या घटना वाढू लागल्या आहेत. मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होऊ लागला आहे. संकटकाळी स्वतःचे रक्षण करण्याचे बळ मुलींना मिळाले पाहिजे हा उद्देश समोर ठेवून उसर येथील गेल कंपनीमार्फत बेलोशी येथील हायस्कूलमधील विद्यार्थीनींसाठी पाच दिवस स्वरक्षणाचे धडे देण्याचे शिबीर सुरु केले आहे. या कालावधीत मुलींना कराटेचे धडे देऊन त्यांना सक्षम बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या शिबीराला विद्यार्थीनींकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सर्व मुलींनी हिरहीरीने सहभाग घेऊन कराटेचे धडे घेण्याचा प्रयत्न केला.

अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल कंपनीमार्फत परिसरात वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये बेलोशी येथील को.ए.सो. लोकनेते ॲड.दत्ता पाटील हायस्कूलमधील शाळकरी मुलींसाठी मोफत स्वरक्षणाचे धडे देण्याचा उपक्रम सुरु केला आहे. स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिरातून मुलींना कराटे प्रशिक्षण देण्यात आले. आंतरराष्ट्रीय खेळाडू तपस्वी गोंधळी यांच्या मार्फत पाच दिवस धडे देण्यात आले आहेत.

गेल कंपनीतील मुख्य महाप्रबंधक अनुप गुप्ता, महाप्रबंधक जितीन सक्सेना व शितल लाकरा यांच्या मार्गदर्शनातून या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी यांच्या मार्फत स्वरक्षणाचे धडे देऊन मुलींना खंबीर बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**लोकसंसद**

## चॅटजीपीटी वापरकर्त्यांमध्ये पुरुषांपेक्षाही महिला अधिक!




यूएसएच्या न्यूयॉर्क येथे मुख्यालय असलेल्या 'सिमिलरवेब' या जागतिक सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि डेटा एकत्रीकरण करणाऱ्या कंपनीच्या सर्व्हेनुसार जगभरात आताच्या घडीला 'एआय'च्या मदतीने चालणाऱ्या चॅटजीपीटीचा वापर प्रचंड वाढला असून ऑगस्ट २०२५ च्या आकडेवारीनुसार जगभरात चॅटजीपीटीचा वापर तब्बल ५८० कोटी वेळा करण्यात आला. चॅटजीपीटीचा सर्वाधिक वापर अमेरिकन लोकांनी केला असून अमेरिकन लोक ८८.३ कोटी वेळा या वेबसाइटवर गेले. त्यांचा एकूण वापर होता १५ टक्के होता. तर दुसऱ्या क्रमांकावर आपला भारत होता. दरमहा अंदाजे ७.२ कोटी सक्रिय भारतीय लोकांनी ५४.४ कोटी वेळा चॅटजीपीटीचा वापर केला. ते प्रमाण नऊ टक्के होते. त्यानंतर चॅटजीपीटीचा वापर मोठ्या प्रमाणात करणाऱ्या देशामध्ये ब्राझील ३१ कोटी वेळा (५ टक्के), ब्रिटन २५.१ कोटी वेळा (४ टक्के), इंडोनेशिया २१.६ कोटी वेळा (४ टक्के), जपान २०.५ कोटी वेळा (४ टक्के), जर्मनी १९.९ कोटी वेळा (३ टक्के), फ्रान्स १८.७ कोटी वेळा (३ टक्के), फिलिपाईन्स १७.५ कोटी वेळा (३ टक्के) आणि कॅनडा १५.२ कोटी वेळा (३ टक्के) या देशांचा क्रमांक लागतो. विशेष म्हणजे सुरुवातीला चॅटजीपीटीचे ८० टक्के पुरुष वापरकर्ते होते. परंतु जुलै २०२५ पर्यंत चॅटजीपीटी वापरकर्त्या महिलांचा सहभाग पुरुषांपेक्षाही वाढून ५२ टक्क्यांवर गेला आहे. चॅटजीपीटीमुळे जगभरातील कामाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाले असून व्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य, बँकिंग, संशोधन अशा सर्वच क्षेत्रात पूर्वपिक्षा कामे खूप सोपी जलद आणि पारदर्शक झाली आहेत.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधेरी

**दिनविशेष**

# सौंदर्याची परिभाषा बदलणाऱ्या स्मिता

मनोरंजन विश्वातील एक सोनेरी पर्व, आपल्या निखळ सौंदर्याने व दर्जेदार अभिनयाने हिंदी व मराठी चित्रपटात एक काळ गाजवलेल्या स्मिता पाटील यांचा १७ ऑक्टोबर हा जन्मदिवस. वयाच्या अवघ्या ३१ व्या वर्षी त्यांनी जगाला निरोप दिला. त्यांना जाऊन ३९ वर्षे झाले तरीही आपल्या दर्जेदार अभिनयाने अजूनही लोकांच्या मनात आपलं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. स्मिता पाटील यांनी पदवीच्या शिक्षणानंतर पुण्यातील एका नाट्य संस्थेत थिएटर कलाकार म्हणून काम केले. १९७० च्या दरम्यान त्यांनी मुंबई दूरदर्शनवर वृत्तनिवेदिका म्हणून काम करायला सुरूवात केली. वृत्तनिवेदिका म्हणून काम करण्यापूर्वीच त्यांची रंगभूमीशी नाळ जुळली होती. दूरदर्शनमध्ये स्मिता ज्यावेळी बातम्या सांगायची त्यावेळी टीव्हीसमोर गर्दी व्हायची. स्मिताचा आकर्षक लूक पाहण्यासाठी लोकांची रस्त्यावर गर्दी व्हायची असं सांगितलं जातं. त्याचवेळी शाम बेनेगल कोणत्यातरी कामानिमित्ताने दूरदर्शनमध्ये आल्यानतंर त्यांनी स्मिताला पाहिलं आणि तिला चित्रपटाची ऑफर दिली. स्मिताचा चेहरा अत्यंत भावुक असल्याने 'चरणदास चोर' या चित्रपटात काम करण्याची संधी दिली. त्यानंतर त्यांनी 'निशांत' या चित्रपटामध्ये पुन्हा एकदा संधी दिली. यादरम्यान त्यांना दिग्दर्शक श्याम बेनेगल यांनी चित्रपटाची ऑफर दिली. श्याम बेनेगल यांनी १९७५ साली दिग्दर्शित केलेल्या 'चरणदास चोर' या हिंदी चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. अवघ्या १० वर्षाच्या चित्रपट क्षेत्रातील कारकिर्दीत त्यांनी ८० हून अधिक हिंदी व मराठी चित्रपट केले. नमक हलाल, भूमिका, चक्र, मंथन, आक्रोश, बाजार, जैत रे जैत, उंबरठा, सामना असे अनेक त्यांचे दर्जेदार चित्रपट त्यातील भूमिका आजही लोकांच्या मनाला भूरळ घालते. मराठी व हिंदी चित्रपटात आपल्या दमदार अभिनयामुळे ओळखले जाणारे नाना पाटेकर यांना स्मिता पाटील यांनी चित्रपट क्षेत्रात नेले. याबाबत त्यांनी अनेकवेळा मुलाखतीतून खुलासा केला आहे. चित्रपटात काम करत असताना मराठी रंगभूमीशी स्मिता यांनी नातं टिकवून ठेवलं होतं. मराठी रंगभूमीवर काम करत असताना नाना पाटेकर यांच्याशी त्यांची ओळख झाली. नाना पाटेकर यांनी चित्रपटात काम करावं, अशी स्मिता यांची इच्छा होती. मात्र, नाना मराठी रंगभूमीवरच समाधानी होते. अखेर नाना यांना स्मिता यांनी चित्रपटात काम करण्यास राजी केले व दिग्दर्शक रवी चोप्रा यांच्याकडे त्यांची शिफारस केली. त्याच्या शिफारसीमुळे नाना यांना १९८४ साली आलेल्या 'आज की आवाज' या चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. स्मिता यांच्या मैत्रीखातरच आपण रुपेरी पडद्यावर पदार्पण केले असल्याचे नाना पाटेकर यांनी मुलाखतीतून खुलासा केला आहे. त्यानंतर नाना पाटेकर यांनी अंकुश, परिंदा, प्रहार, क्रांतिवीर, तिरंगा, सिंहासन, भालू, पक पक पकाक, देऊळ, डॉ. प्रकाश बाबा आमटे, नटसम्राट अशा दर्जेदार चित्रपटांसह अनेक चित्रपटात काम केले. स्मिता पाटील यांच्यामुळे चित्रपटसृष्टीला एक दमदार अभिनेता मिळाला आणि नाना पाटेकर यांचे आयुष्यच बदलून गेले. चित्रपट सृष्टीमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल स्मिताला १९८५ साली पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. मंथन, भूमिका, आक्रोश, चक्र, निशांत, वारीस, अर्थ, मिर्च मसाला, आज, नजराणा या चित्रपटातील भूमिकांनी तिने रसिकांच्या मनावर वेगळीच छाप उमटवली. तसेच सामना, जैत रे जैत, राजा शिव छत्रपती, उंबरठा या सारख्या मराठी चित्रपटांमध्ये तिने आपल्या अभिनयाची उंची दाखवली.

काही लोक असे असतात की ते अत्यंत कमी काळात आपल्या कामाची छाप उमटवतात आणि या जगाचा निरोप घेतात. स्मितानेही वयाच्या अवघ्या ३१ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१३ डिसेंबर**

१) श्री. शरद दत्तात्रेय माळी गोंधळपाडा, १३-१२-१९४७
२) श्रीम. जयश्री दत्तात्रय क्षीरसागर चेंढरे, अलिबाग, १३-१२-१९४७
३) श्री. प्रकाश काशिनाथ सारंग कोळीवाडा, अलिबाग १३-१२-१९६०

## 'अद्ययावत मतदार याद्या प्रसिद्ध करा'

**मुंबई :** मुंबई मनपाच्या निवडणुका लवकरच होत आहेत; परंतु मतदारयाद्यांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात घोळ आहेत. या मतदार याद्यांमध्ये दुबार मतदारांची संख्या तब्बल ११ लाख असून दुबार नावे असलेल्या मतदारांना शपथपत्र द्यावे लागणार आहे. हा मतदारांना नाहक त्रास असून यामुळे मतदानासाठी मोठ्या रांगा लागतील. मतदान सुरळीत पार पाडण्यासाठी मतदार याद्यातील त्रुटी दूर करून अद्ययावत मतदार याद्या लवकर प्रसिद्ध करा, अशी मागणी खा. वर्षा गायकवाड यांनी केली आहे. लोकसभेत मतदार याद्यांच्या प्रश्न उपस्थित करुन खा. गायकवाड म्हणाल्या की, मुंबई महानगरपालिका निवडणूक ९ वर्षानंतर होत आहे. पण मतदार याद्यांमध्ये मात्र प्रचंड घोटाळे आहेत. ही मतदार यादी ३० ऑक्टोबर २०२४ रोजी प्रकाशित केलेली. निवडणूक आयोगाच्याच नियमाप्रमाणे दर वर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात नवीन यादी प्रसिद्ध होते आणि नंतर दर तीन महिन्याला सुधारित यादी प्रसिद्ध होते. पण या वर्षी तसे झाले नाही. निवडणूक आयोगाने प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यासही विलंब लावला. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी ही मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार होती, ती २० नोव्हेंबरला प्रसिद्ध केली. आता या प्रारुप मतदार यादीवर आक्षेप नोंदवले जात आहेत. परंतु ११ लाख १५०५ मतदारांची दुबार नावे कशी आली, हा गंभीर प्रश्न आहे.

# पंचेचाळीस लाखांचा निधी नको!

## ●खांडपे ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत अजब ठराव; घारे-थोरवे वादाला आणखी एक फोडणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील खांडपे या ग्रामपंचायतीमधील मुळगाव या गावातील विकासकामे करण्यासाठी कर्जतचे आ. महेंद्र थोरवे यांनी ४५ लाखांचा निधी दिला होता. मात्र, सदर कामांचे ठराव देण्याचा विषय ग्रामसभेत आल्यानंतर असंख्य ग्रामस्थांनी ठराव देऊ नये, अशी भूमिका घेतली. हा विषय राजकारण म्हणून पुढे आला असून, सुधाकर घारे आणि महेंद्र थोरवे वादाला या ठरावाच्या निमित्ताने फोडणी मिळाली आहे. दरम्यान, ४५ लाखांचा निधी नको, असा ठराव ग्रामसभेत मंजूर झाला. या ठरावामुळे तालुक्यात वेगळी प्रथा पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांची खांडपे ग्रामपंचायत वेगळ्या कारणाने चर्चेतआलीआहे.याग्रामपंचायतीची ग्रामसभा प्रशासक सुशांत गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या ग्रामसभेत मुळगाव येथील ग्रामस्थ शिवाजी देशमुख यांनी चार विकासकामांसाठी देखभाल दुरुस्ती ठराव मागितला होता. त्यांचे पत्र ग्रामसभेत ग्रामपंचायत अधिकारी शरद ठाकूर यांनी वाचन केले. त्या पत्रात मुळगावमधील अंतर्गत रस्ता आणि गटार बांधकाम करणे, जिल्हा परिषद शाळेसाठी संरक्षण भिंत बांधणे, माणगाव येथील अंतर्गत रस्ता तयार करणे आणि तिवणे गावातील अंतर्गत रस्ता तयार करण्याचे काम कर्जत आ. महेंद्र थोरवे यांनी मंजूर केले आहे. त्या सर्व विकासकामांसाठी ४५ लाखांचा निधी मंजूर आहे. मात्र, त्या कामांसाठी ग्रामपंचायतीकडून ठराव मिळणे आवश्यक असतात. परंतु, त्या चारही विकासकामांचे ठराव शिवाजी देशमुख यांनी मागितल्यानंतर मोठा गोंधळ निर्माण झाला.

विकासकामांचा आराखडा बनवण्यासाठी आयोजित ग्रामसभेत मोठा गोंधळ झाल्यानंतर ग्रामस्थ महेंद्र घारे यांनी ठराव घेत ही सर्व विकासकामे करण्यासाठी आम्हाला कोणाचाही निधी नको, माझी ग्रामपंचायत माझा अभिमान याप्रमाणे आम्ही ती सर्व विकासकामे करण्यासाठी निधी आणू. परंतु कोणत्याही कामांसाठी ग्रामपंचायतीने ठराव देऊ नये, असा ठराव मांडला.

हा ठराव मांडण्यात आल्याने पुन्हा गोंधळ झाला आणि शेवटी महेंद्र घारे यांच्या ठरावावर मतदान घेण्यात आले. शेवटी मतदानाने त्या चार विकासकामे करण्यासाठी ठराव देण्यात येऊ नये, हा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला. त्या ठरावाला रवींद्र घारे यांनी अनुमोदन दिले असून, हा ठराव विकासकामे करण्यापासून रोखणारा असल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. आ. महेंद्र थोरवे यांच्याकडे माणगाव, मुळगाव, तिवणे गावातील ग्रामस्थांनी विकासकामांची मागणी केली होती. मात्र, आता त्या विकासकामांना ठराव देण्यात आले नाही आणि मोठा राजकीय कल्लोळ होण्याची शक्यता आहे. कदाचित हा विषय नागपूर विधिमंडळ अधिवेशनात चर्चेला येऊ शकतो.

# उरणमध्ये मनसे पदाधिकाऱ्यावर हल्ला

## भाजप समर्थकांवर गुन्हा दाखल

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणमध्ये मनसे पदाधिकारी सतीश बिपीन पाटील आणि त्यांच्या आईवर करण्यात आलेला हल्ला हा राजकीय सूडबुद्धीचा स्पष्ट नमुना असून, भाजप समर्थकांच्या दहशतवादी राजकारणाचा आणखी एक पराकाष्ठा आहे. नगरपरिषद निवडणुकीत भाजपविरोधात प्रचार करण्याचे 'धाडस' दाखवल्याचा बदला म्हणून पाटील आणि त्यांच्या आईला दत्तजयंतीच्या दिवशी रस्त्यात अडवून शिवीगाळ, मारहाण आणि सरळ जिवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या.



या प्रकारामुळे उरणमध्ये संतापाचे वादळ उसळले आहे. दर्शन करून घरी जात असताना पाटील यांना रस्त्यात अडवून केलेला हा हल्ला हा केवळ व्यक्तीवरचा प्रहार नव्हता, तर मनसे कार्यकर्त्यांच्या मनात भीती निर्माण करण्याचा उघड प्रयत्न होता.

मनसे वाहतूक सेनेचे राज्य उपाध्यक्ष सतीश पाटील यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी पाटील यांना जबरदस्तीने आमदारांच्या बंगल्यासमोर नेऊन माफी मागण्यास भाग पाडले आणि त्या संपूर्ण अपमानास्पद प्रसंगाचे व्हिडिओ शूट करून राजकीय दादागिरीची पराकाष्ठा गाठली.

या गुंडगिरीत सहभागी असलेले गणेश पाटील, कौशिक शहा, निलेश पाटील, संजोग गांधी, सनी भोईर, विशाल पाटेकर, अमन शर्मा, गणेश सुतार, महेश लाड, रोहन गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासाची सूत्रे उपनिरीक्षक सतीश गोरे यांच्या हाती देण्यात आली आहेत.

घटनेवर प्रतिक्रिया देताना महाविकास आघाडीच्या नेत्या भावना घाणेकर यांनी उरण बिहारच्या दिशेने चालले आहे. अशा दहशतवादी राजकारणाला जनता योग्य उत्तर देईल, असा संतप्त स्वर लावला. तर महाविकास आघाडीचे नेते मनोहर भोईर यांनी निवडणुकीनंतर असा सूड उगवणं ही उरणच्या संस्कृतीला काळिमा फासणारी बाब असल्याचे सांगत या कृत्याचा निषेध केला.

दत्तजयंतीसारख्या धार्मिक यात्रेच्या दिवशीच उरणमध्ये केलेल्या या राजकीय सूड प्रकरणामुळे शहरात संतापाची लाट पसरली असून, नागरिकांनी अशा दहशतीला चोख उत्तर देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## गुड टच बॅड टच जनजागृती

कोलाड : प्राथमिक आदर्श शाळा (केंद्र) कोलाड या ठिकाणी शुक्रवारी (दि.१२) संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रविणदादा गायकवाड आणि रायगड जिल्हाध्यक्ष वैभव हरिश्चंद्र सुर्वे यांच्या मार्गदर्शन तसेच रायगड जिल्हा उपाध्यक्ष सिद्धार्थ गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक धामणसे, रोहा तालुका संघटक आत्माराम दिवेकर यांच्या नियंत्रणाखाली संभाजी ब्रिगेड रायगड जिल्हा अंतर्गत रोहा तालुक्याच्या वतीने तसेच दामिनी पथक महाराष्ट्र पोलीस यांच्या विशेष सहकार्याच्या माध्यमातून 'गुड टच बॅड टच' हा जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी इयत्ता पहिली ते सातवी वर्गातील जवळपास ४५० ते ५०० विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी यामध्ये सहभाग घेतला.



# बिबट्याचा शोध घेण्यासाठी वनविभाग सरसावले

## रात्रीची गस्त, नागरिकांमध्ये जनजागृती

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणच्या पूर्व भागातील पुनाड, कोप्रोली परिसरात बिबट्याचा संचार असून, कोप्रोली गावातील एका शेतकऱ्याच्या दोन बकऱ्या मारल्या असल्याची बाब समोर आली आहे. या बकऱ्यांचा अर्धवट खाल्लेला मृतदेह जंगलात आढळून आल्याने बिबट्याच्या असण्याच्या शक्यतेवर शिक्कामोर्तब झाले आहे. या परिसरात आणखी काही प्राण्यांचे मृतदेह सापडले आहेत. बुधवारी घडलेल्या या प्रकारानंतर वनविभागाने तातडीने या जंगलात गस्त सुरू केली असून, बिबट्याचा शोध घेण्यात येत आहे.

वन विभागाने सर्च ऑपरेशन केल्यानंतर येथे बिबट्याची विष्ठा सापडली असून, त्यात प्राण्यांच्या केसांचे अवशेष सापडले असल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. बिबट्याचा आणि मानवाचा संघर्ष होवू नये म्हणून वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी पुनाडे, रानसई येथिल वाड्यांवरील नागरीकांना बिबट्यापासून कसे संरक्षण करायचे आणि कोणती खबरदारी घ्यावी याबाबत गुरूवारी रात्री मार्गदर्शन केले. तसेच कोप्रोली ग्रामपंचायतीच्यावतीने खबरदारी घेण्यासाठी पोस्टरबाजी करण्यात आली आहे.

> उरण पूर्व भागातील कोप्रोली-पुनाडे येथील जंगलात बिबट्या असल्याचे पुरावे सापडले आहेत. या ठिकाणी मोठे जंगल असल्यामुळे त्याचा शोध घेणे कठीण जात आहे. बिबट्या अर्धवट टाकलेले खाद्य खाण्यासाठी पुन्हा या ठिकाणी येण्याची शक्यता आहे. आम्ही या ठिकाणी सीसी टीव्ही आणि पिंजरे लावण्याच्या प्रयत्नात आहोत. कर्नाळा अभयारण्य जवळच असल्याने तेथून हा बिबट्या या परिसरात आला असण्याची शक्यता आहे.
>
> - एन.डी. कोकरे, परिक्षेत्र वन अधिकारी, उरण

# ईव्हीएम, स्ट्राँगरूमवर खडा पहारा

## निवडणूक साहित्य सुरक्षिततेसाठी बंदोबस्त

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपालिका निवडणुकीचा ताप वाढत असताना ईव्हीएम मशिन्स व मतपेट्या ठेवण्यात आलेल्या स्ट्राँगरूमवर सुरक्षेचा लोखंडी कवच चढविण्यात आला आहे. प्रशासकीय भवनातील सभागृहासह नगरपालिका कार्यालय परिसरात पोलिसांनी अक्षरशः कडेकोट बंदोबस्त उभा करत 'नो-एरर झोन' घोषित केला आहे.

निवडणूक प्रक्रियेत कुठलाही संशयास्पद हालचाल, हस्तक्षेप किंवा गोंधळ होऊ नये म्हणून प्रशासन कोठलीही जोखीम घ्यायला तयार नाही. संपूर्ण परिसरात दिवसरात्र पोलिसांचा तगडा फौजफाटा तैनात असून, प्रवेशद्वारावर कडक तपासणी सुरू आहे. सुरक्षा रिंगणात घाटलेल्या अधिकाऱ्यांनी स्ट्राँगरूमची पाहणी करत सर्व यंत्रणा सतत सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.



प्रशासकीय अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्ट्राँगरूममधील ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन्सची प्रत्यक्ष पाहणी करत परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केले. कोणताही दोष, गडबड किंवा शंका राहू नये म्हणून सुरक्षा तपासण्या वारंवार केल्या जात आहेत. स्ट्राँगरूम परिसरात २४ तास सीसीटीव्ही देखरेख, आधुनिक अलार्म सिस्टम, ड्युअल लॉकिंग सिस्टीम व तांत्रिक निगराणी बसवण्यात आली आहे. अग्निशमन दलालाही सतर्क राहण्याच्या सूचना देत संपूर्ण परिसरात अग्निसुरक्षेची व्यवस्था उभारण्यात आली आहे. निवडणूक साहित्य ठेवण्यात आलेल्या उरण नगरपालिका कार्यालयालाही हाय-रिस्क झोन घोषित करून अतिरिक्त पोलिस बळ तैनात केले आहे.

मतपेट्या, ईव्हीएम व संवेदनशील कागदपत्रांवर कुठल्याही परिस्थितीत सावली येऊ नये यासाठी प्रशासनाने पाऊलं टोकावर आणली आहेत. उरणमध्ये राजकीय वातावरण तापले असताना, सुरक्षेचा हा कडेकोट आवरण पाहता यंदाची निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, कठोर व शून्य-तडजोडीच्या भूमिकेतून पार पाडण्याचा प्रशासनाचा निर्धार स्पष्ट दिसत आहे.

## एसटी, टेम्पोच्या धडकेत चार जखमी

रत्नागिरी : लांजा-साटवली मार्गावरील गोळवशी डंगाच्या कोपऱ्यावर गुरुवारी (दि.११) कॅरी टेम्पोने एसटी बसला धडक दिली. यात टेम्पोतील चौघेजण जखमी झाले. याप्रकरणी टेम्पो चालक फिरोज इकबाल शेखवर लांजा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. बस चालक प्रशांत यादव हे रुण लांजा या मार्गावर एसटी बस घेऊन येत असताना गोळवशी डंगाच्या कोपऱ्यावर चढणीदरम्यान लांजाहून देवीहसोळकडे जाणारा कॅरी टेम्पोने बसला धडक दिली.

# शतकभर जुने घर आगीत जळून खाक

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणच्या राजपाल नाका परिसरातील गुलझार भाटकर यांच्या तब्बल १०० ते १२५ वर्षांपूर्वीच्या जुन्या घराला गुरुवारी दुपारी सुमारे चारच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात असताना काही क्षणांतच खालच्या मजल्यातून उठलेला धूर वरच्या मजल्यापर्यंत पोहोचून संपूर्ण घर ज्वाळांनी वेढले.

आगीच्या वेळी घराच्या वरच्या मजल्यावर तीन जण अडकले होते. धूर आणि ज्वाळा झपाट्याने वर चढत असल्याने परिस्थिती गंभीर बनली आणि जीव वाचवण्यासाठी या तिघांची तारांबळ उडाली. शेवटी त्यांनी खिडकीतून उड्या मारत स्वतः चा जीव वाचवला. उड्या मारताना सर्वजण जखमी झाले असून, त्यांना तातडीने उरणमधील गाडे हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. आगीत घराचे प्रचंड नुकसान झाले.

घटनास्थळी अग्निशमन दल, पोलीस यंत्रणा तसेच स्थानिक नागरिकांनी धाव घेऊन आग विझविण्यासाठी मोठे प्रयत्न केले. मात्र घर जुने, लाकडी बांधकामाचे असल्याने आग क्षणोक्षणी भडकत गेली. दरम्यान, ही जागा जुनी असून, त्यावर काही व्यक्तींचा डोळा असल्याची चर्चा परिसरात मागील अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे आग लागली ती खरोखरच शॉर्ट सर्किटमुळे की जागेवर डोळा असलेल्या कुणी हेतुपुरस्सर लावली, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

या आगीमागील सत्य बाहेर आणण्यासाठी सखोल चौकशीची मागणी स्थानिक नागरिकांकडून जोर धरू लागली असून, प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहावे, अशीही मागणी होत आहे.

**महिला बचत गटांना उत्पन्नाचे स्त्रोत** | **जेवणात कोकणी पदार्थांना पसंती**

# श्रीवर्धनमध्ये शैक्षणिक सहलींचे प्रमाण वाढले

**। श्रीवर्धन । समीर रिसबूड ।**

श्रीवर्धन येथे नोव्हेंबर, डिसेंबर महिना दरम्यान शैक्षणिक सहलींचे प्रमाण वाढले आहे. आलेल्या विद्यार्थ्यांची निवासाची सुविधा ही सामाजिक सभागृहमधून केली जात आहे. एखाद दोन दिवसासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची चहा, नाश्ता व दोन्ही वेळेची भोजनाची ऑर्डर श्रीवर्धन येथील महिला बचत गटांना दिली जात आहे. यामुळे महिलांच्या हाताला काम मिळाले आहे.



मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी शैक्षणिक सहलींचे प्रमाण खूपच वाढले आहे. यावेळेस महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थी श्रीवर्धनला भेट देत आहेत. ०१ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत सुमारे १७३ शैक्षणिक सहलींच्या बसेस श्रीवर्धन येथे दाखल झाल्या. शाळांच्या खोल्या, लॉज तसेच येथील विविध समाज सभागृहमधून विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या नाश्ता, भोजन व्यवस्था उत्तम व्हावी, या दृष्टीने येथील समाज सभागृह व्यवस्थापकांनी कंत्राट महिला बचत गटांना दिले आहे.

> **शालेय सहलीच्या विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था समाज सभागृहात केली जाते. साधारण शंभर ते सव्वाशे विद्यार्थ्यांच्या नाश्ता व जेवणाचे कंत्राट महिला बचत गटांना देण्यात येते. नाश्त्याला पोहे त्याचबरोबर जेवणात चपाती, डाळ भात व बिरड्याची उसळ या प्रमाणे उत्तम व्यवस्था करण्यात येते.**
>
> **- महेश अनंत चोगले, व्यवस्थापक, माळी समाज सभागृह, श्रीवर्धन**

श्रीवर्धन येथे अकरा महिला बचत गट कार्यरत आहेत. शैक्षणिक सहल व्यवस्थापक यांच्याकडून कोकणी प्रकारचे अल्पोपहार, शाकाहारी जेवणात कोकणातील विविध प्रकारच्या भाज्यासह सणासुदीच्या दिवसात केल्या जाणाऱ्या गोड पदार्थांची ऑर्डर महिला बचत गटांना देण्यात आली होती. यातून जेवणात कोकणी पदार्थांना पसंती मिळत असल्याचेही दिसून येत आहे. शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून या निमित्ताने महिला बचत गटांना आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत प्राप्त होऊ लागले आहे.

## निवडक



### माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात

**माणगाव :** कोल्हाण राजिप शाळा येथे मंगळवारी (दि.९) माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. अनेक माजी विद्यार्थी एकत्र येत शालेय जीवनातील गोड आठवणींना उजाळा देत तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासाबाबत विचारमंथन करण्यात आले. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान संदेश कडवेकर यांनी भूषविले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पोवाडा, नाटिका यांसारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांचे मनोरंजन केले आणि वातावरण अधिक रंगतदार बनवले. मुख्याध्यापक अशोक आव्हाड यांनी शाळेचा समृद्ध इतिहास, लोकसहभागाचे महत्त्व, तसेच माजी विद्यार्थी संघाची रचना व उद्दिष्टे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर मनोगतात बोलताना विश्वास सुतार यांनी शालेय आठवणी शेअर करत उपस्थितांना भावूक केले. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा शालिनीताई वाढवळ, उपाध्यक्षा रंजिता वाढवळ, विनोद गवाने, राहुल गवाने आणि पालक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला.



### महाविद्यालयाचा नव्हाळी महोत्सव

**नेरळ :** नेरळ ममदापूर येथील विद्या मंदिर मंडळ माहीम मुंबई यांच्या मातोश्री टिपणीस महाविद्यालयाचा नव्हाळी महोत्सव सहा दिवस आयोजित करण्यात आला होता. दि.२४ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत साजरा झाला. या महोत्सवाच्या निमित्ताने महाविद्यालयात सालाबादप्रमाणे नव्हाळी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला. या महोत्सवातील तीन दिवस क्रीडा स्पर्धा झाल्या. त्यात लांब उडी, उंच उडी, धावण्याच्या शर्यती, गोळाफेक, कॅरम, चेस, कबड्डी व क्रिकेट या स्पर्धांचा समावेश होता. तसेच रांगोळी, मेहेंदी, कोलाज, पोस्टर मेकिंग, क्ले मॉडलिंगसह वक्तृत्व, कथाकथन स्पर्धांनी सर्जनशीलतेचे दर्शन घडवले. नृत्य व गायन कार्यक्रमांनी नव्हाळी महोत्सवात अधिक रंगत आणली.नव्हती महोत्सवाचा समारोपाच्या दिवशी श्रमण साळवी, मिस्टर महाविद्यालय तर आज्ञा जामघरे हिने मिस महाविद्यालय या किताबाची मानकरी ठरली.




### पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**माणगाव :** जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या पतसंस्थांपैकी एक ओळखली जाणारी माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था. या नामांकित पतसंस्थेतर्फे गेली अनेक वर्ष नवीन वर्षाची दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. संस्थेतर्फे येणाऱ्या २०२६ च्या दिनदर्शिकेचा प्रकाशन समारंभ शुक्रवारी (दि.१२) संस्था कार्यालय चौधरी कॉम्लेक्स, निजामपूर रोड, माणगाव येथे उत्साहात पार पडला. यावेळी चेअरमन आनंदशेठ यादव व संस्थेचे जेष्ठ संचालक दिलीप जाधव, उदय म्हशेळकर, व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, कर्मचारीवृंद, स्वल्पबचत प्रतिनिधी, खातेदार, हितचिंतक आदी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना चेअरमन आनंदशेट यादव यांनी दिनदर्शिका घराघरात पोहचवा, असे आव्हान करून येणाऱ्या नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.



### एचआयव्ही जागरूकता कार्यक्रम

**माणगाव :** जे.बी.सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगावमध्ये शुक्रवारी (दि.१२) जागतिक एड्स दिनानिमित्त एच.आय.व्ही.जागरूकता कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या उपजिल्हा रुग्णालय माणगावच्या समुपदेशिका रंजिता खेडेकर यांनी एच.आय.व्ही./एड्स कसा होतो, त्याची कारणे आणि त्याबाबत काळजी कशी घ्यावी, याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच एचआयव्ही एड्ससारख्या आजाराविषयी आपण स्वत: जागरूक राहून रॅली, पथनाट्यसारख्या वेगवेगळ्या जागरूकता कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांना जागरूक करावे, असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अमृता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रेड रिबन क्लब यांच्या वतीने करण्यात आले होते.



### प्रशालेत रंगला संगीत अनावरण सोहळा

**नेरळ :** 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम' या चित्रपटातील रत्नाकर मतकरी यांनी लिहिलेल्या स्वर्गात आकाशगंगा हे गाणे कर्जत येथे शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत लाँच करण्यात आले. कर्जत येथेच शिक्षण घेतलेल्या अभिनेता आणि दिग्दर्शक हेमंत डोमे यांनी आपल्याच बालपणीच्या शाळेत ही गाण लाँच करण्याचा निर्णय घेतला होता. या गाण्याचा अनावरण सोहळा अभिनव ज्ञानमंदिर प्रशालेतील पटांगणात पार पडला. हेमंत यांनी पहिल्यांदा नाटकात काम केलं ते याच शाळेच्या मंचावर. त्यामुळे त्यांच्यासाठी हा एक जिव्हाळ्याचा सोहळा असून शाळेला दिलेली एक मानवंदना आहे. यावेळी क्षिती जोग, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, हरीश दुधाडे, पुष्कराज चिरपुटकर, कादंबरी कदम यांच्यासह गायक रोहित राऊत, जुईली जोगळेकर, संगीतकार हर्ष-विजय उपस्थित होते. या खास सोहळ्यात चित्रपटातील कलाकार हजारो विद्यार्थ्यांसोबत गाण्यावर थिरकले.



# विशेष मुलांना ओळखपत्र वाटप

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील आरसीएफ वसाहतीत असलेली आत्मनिर्भर पालक संचलित व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण केंद्रातील मतीमंद विद्यार्थ्यांना ओळख पत्र देण्यात आहे. आरसीएफ प्रशासनाने वसाहतीत प्रवेश करण्यासाठी ओळखपत्र आवश्यक असल्याचे सांगितल्याने, या विदयार्थ्यांची गरज लक्षात घेऊन अलिबाग असोसिएशनच्या वतीने या शाळेतील विद्यार्थ्यांना आणि शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना मोफत ओळखपत्र देण्यात आले. यावेळी या विदयार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद दिसत होता. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता देसाई रायगड फोटोग्राफर्स ॲण्ड व्हिडीओ ग्राफर्स असोसिएशन चे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, शाळेचे संचालक नागेश कुलकर्णी, अलिबाग फोटोग्राफर असोसिएशन चे अध्यक्ष तुषार थळे, सचिव विकास पाटील योगेश सावंत पत्रकार महेंद्र म्हात्रे उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालकांने त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| मधुकर वाळवू बार्शी, दत्तू भिवा बार्शी, लक्ष्मण भिवा बार्शी, जिजाबाई उर्फ मालाबाई तुकाराम जोशी, गंगूबाई तुकाराम जोशी, रखमाबाई उर्फ द्वारकाबाई परशुराम माळी, लक्ष्मीबाई उर्फ ठमाबाई नारायण रुठे | ६ | १५ | ०-२३-३० <br> ०-०३-३० <br> ०-२६-६० | ०=३४ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : १२/१२/२०२५
मोबाईल: ९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री. अे. पी. डिमेलो**
भिसेगाव, ता.कर्जत, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालकांने त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे सालपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| कॅजिटन फ्रान्सिस फर्नांडीस | ८४ | ७ | ०-२१-३० <br> ०-०२-०० <br> ०-२३-३० | ०=२३ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : १२/१२/२०२५
मोबाईल: ९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री. अे. पी. डिमेलो**
मु. भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड

## कुळअखत्यारपत्र रद्द करण्याबाबत जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे तिघर, ता. कर्जत, जिल्हा रायगड येथील सर्व्हे नं. २७, हिस्सा नं. १ अ, एकूण क्षेत्र ०-८०-०० हे.आर., आकार रु. ०.८७ पैसे या वर्णनाची कुळकायद्याने नियंत्रीत सत्ता प्रकारची जमीन मिळकत आमचे अशील श्री. चंदु मारुती मरले, रा. तिघर, ता. कर्जत, जि. रायगड यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी त्यांचे नांवे दाखल आहे. श्री. वसंत गोविंद रवणे, रा. तिघर, ता. कर्जत, जि. रायगड यांनी आमचे वर नमूद अशील यांना सदरील जमिनीचे किंमतीचा मोबदला न देता आमचे अशिलांचे अशिक्षितपणाचा गैरफायदा घेऊन, खोटेपणाने, बेकायदेशीरपणे आमचे अशिलांकडून सदरील जमिनीसंबंधी कुळमुखत्यार पत्र स्वतःचे लाभांत लिहून घेऊन ते मा. दुय्यम निबंधक कर्जत यांचे कार्यालयात दस्त अ.क्र. ७९८०/२०१० दिनांक २२/१०/२०१० रोजी अनधिकाराने व बेकायदेशीरपणे नोंदविलेले आहे. आता मात्र आमचे अशिलांचे असे लक्षात आले की, सदर व्यक्ति अखत्यारपत्राच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत.

आमचे अशिलांनी याबाबत श्री. वसंत गोविंद रवणे यांना दिनांक १२/१२/२०२५ रोजी वकीलामार्फत नोटीस पाठवून दिनांक २२/१०/२०१० रोजीचे अखत्यारपत्र रद्द केले आहे. त्याप्रमाणे या जाहीर नोटीसीनंतर कोणीही आमचे अशिलांचे वतीने श्री. वसंत गोविंद रवणे यांनी स्वतःचे लाभात अगर कुणाबरोबर केलेली कोणतीही कामे या खरेदी विक्रीचे व्यवहार, करार मदार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व रद्द पात्र राहतील, याची गंभीर नोंद सर्वांनी घ्यावी.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांतर्फे मुखत्यारी म्हणून श्री.वसंत गोविंद रवणे यांचेबरोबर कोणीही कसलेही प्रकारचे व्यवहार करू नये. तसे केल्यास सदर व्यवहार बेकायदेशीर ठरून ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, रद्द होणेस पात्र राहतील व मग त्याकामी होणारे कायदेशीर कारवाई व त्यांचे सर्व, खर्च, नुकसानी व होणारे परिणामांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत व्यक्तिवर राहील, याची गंभीर नोंद घ्यावी.

कळावे.

कर्जत
दिनांक : १३/१२/२०२५

सही/-
**ॲड.राजेंद्र पी.निगुडकर**
कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत
रायगड मो.९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- सासवणे येथील वाडीमध्ये कामासाठी कायमस्वरूपी जोडपे पाहिजे आहेत. संपर्क : ८००७८९३२३२/८८०६६८३२३२
- प्रथम, पुर्नविवाह सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- Job opportunity - Office staff required for office in Alibag. Fresh graduate and post graduate candidates can call 9923750549 For interview
- अलिबाग येथे घरकामासाठी बाई, मुलगी पाहिजेत वेळ ९ ते ६. फोन ८१४९८६५६२५.
- लीफ एक्सोटिका विला वाडगाव येथे राहण्यासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे त्यासाठी पुढील नंबर वर संपर्क करावा ९८२२९३८४४४
- HP गॅस हाशिवरे इथे कामासाठी मुलगा पाहिजे शिक्षण बी.कॉम ग्रॅज्युएट (इंग्रजी मिडीयम) काम अकाऊन्टंट २ वर्षी अनुभव असल्यास प्राधान्य संपर्क : ७७९६४२८५५५/७७६९४१८५५५.
- घरकामासाठी बाई पाहिजे अर्धवेळ साठी,स्थळ-पंतनगर, संपर्क क्र-८०९७२०५९३९/९४२२३७५१२४

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## PUBLIC NOTICE

NOTICE IS HEREBY GIVEN to all concerned that, we, on behalf of our client, are investigating the ownership right, title and interest of (i) Balkrishna Gopiram Goenka, (ii) Dipali Balkrishna Goenka, (iii) Raman Brijmohan Tikka, (iv) Kinnari Raman Tikka and (v) Ajit Dhanrajmal Dayal, to all those pieces and parcels of land comprised in various gat numbers and admeasuring in the aggregate 02-72-00 (hectare-ares-square meters) equivalent to 27,200 square meters along with perpetual and irrevocable right of access to these land parcels passing through Gat Nos. 211/2 and 212/4, all situate, lying and being at Village Agarsure, Taluka Alibaug and District Raigad and more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter collectively referred to as the "Property").

Any person/ entities having or claiming to have any share, right, title, interest, claim, objection and/ or demand (directly or indirectly) whether by way of sale, memorandum of understanding, transfer, assignment, exchange, allotment, charge, encumbrance, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, mortgage (equitable or otherwise), inheritance, occupation, possession, partition, share, gift, devise, lien, charge, outgoings, development rights, maintenance, easement, trust, covenant or condition, easement, release, relinquishment or any other method through any agreement, contract, deed, document, writing, conveyance deed, devise, bequest, succession, family arrangement/ settlement, litigation, decree or order or award of any court of law or tribunal or revenue or statutory authority or arbitration or otherwise howsoever of any nature whatsoever, in to, out of or upon the Property or any part thereof are hereby required to give notice thereof in writing along with complete and certified true copies of documentary evidence/ proof thereof, to the undersigned, at One World Centre, 7 th Floor, Tower 2A, Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai – 400 013 and also by e-mail to monika.bhonsale@trilegal.com and uday.shah@trilegal.com, within 14 (fourteen) days from the date hereof, failing which, claim/s, if any, of such person, shall be deemed to have been waived and/ or abandoned and not binding in any manner whatsoever.

**SCHEDULE**
**(Description of the Property and Names of the Landowners)**

All those pieces and parcels of land admeasuring in the aggregate 02-72-00 (hectare-ares-square meters) equivalent to 27,200 square meters along with perpetual and irrevocable right of access to these land parcels passing through Gat Nos. 211/2 and 212/4, all situate, lying and being at Village Agarsure, Taluka Alibaug and District Raigad and more particularly described and bearing gat numbers and corresponding area as under:

| Gat No. | Area (in square meters) | Name of the Landowners |
|---|---|---|
| 212/5 | 4,820 | Balkrishna Gopiram Goenka |
| 212/6 | 4,430 | Dipali Balkrishna Goenka |
| 212/7 | 4,820 | Raman Brijmohan Tikka |
| 212/8 | 4,430 | Kinnari Raman Tikka |
| 212/9 | 8,700 | Ajit Dhanrajmal Dayal |
| Total | 27,200 square meters | |

Dated this 13 th day of December, 2025

**Monika Bhonsale**
Partner, Trilegal
Advocates and Solicitors
One World Centre, 7 th Floor,
Tower 2A, Senapati Bapat Marg,
Lower Parel (West),
Mumbai - 400 013

जा.क्र.२७८८
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि. रायगड
दि. १२/१२/२०२५

## चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक :- ४०९/२०२५
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक:- श्री. विठ्ठल रखुमाई मंदिर ट्रस्ट, ...... बाबत
श्री. शिरीष नारायण घरत
पत्ता :- रा. श्रीकृष्णा विल्ला, फ्लॅट नं. ५९५,
जि. रायगड ४१०२१० सेक्टर ३ खारघर, ता. पनवेल ......अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-
१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत वर्णन**

| अ.क्र. | तपशील | नग | दर | अंदाजे किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | खुर्ची | १०० | ३०० | ३०,००० |
| २ | टाळ जोड | २० | ६०० | १२,००० |
| ३ | पालखी | १ | १,००० | १,००० |
| ४ | समई मोठी | ४ | १,००० | ४,००० |
| ५ | लहान समई | २ | ५०० | १,००० |
| ६ | मोठे जर्मन टोप | ३ | २,००० | ६,००० |
| ७ | लहान जर्मन टोप | २ | १,५०० | ३,००० |
| ८ | स्टिल बादली | २० | २०० | ४,००० |
| ९ | साउंड स्पिकर | ४ | १२,५०० | ५०,००० |
| १० | विणा | १ | १५०० | १,५०० |
| ११ | पितळ घंटे | २ | १,००० | २,००० |
| १२ | सिलिंग फॅन | १० | १,००० | १०,००० |
| १३ | भजन पेटी | १ | १,५०० | १,५०० |
| १४ | पखवाज | २ | २,००० | ४,००० |
| १५ | तबले | २ | १,५०० | ३,००० |
| १६ | दानपेटी | १ | ३,००० | ३,००० |
| १७ | गॅस शेगडी | १ | १,००० | १,००० |
| | | | एकूण रुपये | १,३७,०००/- |

(अ) जंगम मिळकत :- रोख रक्कम-रुपये २५,०००/-
स्थावर मिळकत : (वर्णन)
उपअधिक्षक भूमिअभिलेख पनवेल यांचे मालमत्ता पत्रक उताऱ्यानुसार भुमापन क्र.१००९ मधील श्री. विठ्ठल रखुमाई मंदिर, बेलपाडा (मंदिराने एकुण क्षेत्रफळ १३२ चौ. मी. आहे)

चतुसिमा :-

| | | |
|---|---|---|
| १. | पुर्व | गावाचे जाण्याचा रस्ता |
| २. | पश्चिमेस | श्री. लक्ष्मण काचऱ्या काकडे यांचे घर |
| ३. | दक्षिणेस | रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा बेलपाडा |
| ४. | उत्तरेस | मोकळी जागा. |

(ब) स्थावर मिळकत :-

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणाची काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

हि नोटीस माझे सहीनिशी व मी सहाय्यक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १२/१२/२०२५ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग,रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल वनिता पांडूरंग वेळे रा. आगरआळी, समाज मंदिरा जवळ, खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक दिपाली विनय हेगडे रा. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड. यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| पवेळे ता.अलिबाग | १३/१ | ०-११-१० <br> पो.ख. ०-००-५० <br> एकुण ०-११-६० | २-६९ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहान, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दिनांक :१२-१२-२०२५

सही/-
**ॲड. प्रदिप गो. तांडेल**
ओम निवास श्री. स्वामी समर्थ नगर,
पिंपळभाट चेंढरे अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकती मधुन कायम स्वरूपी वहिवाटीचा रस्त्या संदर्भात विद्यमान मालक यांचे सोबत वहिवाटीचा करार नोंदणीकृत करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कामथ ता. अलिबाग | १६३ | वरकस ००-०७-० <br> पो.ख.क्षेत्र ०-०२-१० <br> एकुण क्षेत्र ०-०९-१० | ०.१२ |

वर वर्णन जमिन मिळकतीचे एकुण क्षेत्रापैकी रस्त्याकरीता १४० चौ. मीटर क्षेत्र (९ मीटर रूंदीचा ) सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक सुरेखा जनार्दन काठे, रंजना जनार्दन काठे, अरूणा जनार्दन काठे, निशा जनार्दन काठे, आशा जनार्दन काठे, उषा जनार्दन काठे, सुषा जनार्दन काठे, रश्मी रंजन पाटील, महेश दत्तात्रेय काठे, रचना दत्तात्रेय काठे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशीलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदर रस्त्याबाबत व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करणेंसाठी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशील विद्यमान मालकांबरोवर वहिवाटीचा करारनामा नोंदणीकृत करतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १२/१२/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा
नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर,
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

वकील-रूपेश कृष्णा पाटील

**जाहिर नोटीस**

निशाणी क्र. :-१६/ड

अलिबाग येथील मे. मोटार अपघात न्यायाधिकरण सो. रायगड यांचे न्यायालयात
मोटार अपघात अर्ज नं. ६२/२०२५

श्री. गणेश शिवाजी देशमुख ... अर्जदार
विरूध्द
१. श्री. अमित परशुराम मोरे
रा. आपटी, समाज मंदीराजवळ, पो. डोणवत ता. खालापुर, जि. रायगंड
२. रिलायन्स जनरल इन्श्युरस कंपनी लि.
ओबेरॉय कॉमर्स इंटरनॅशनल बिजनेस पार्क, ६ वा मजला,
ओबेरॉय गार्डन सिटीच्या समोर, पश्चिम द्रुतगती मार्ग, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६८
३. श्री. सागर रमेश खोंडगे
रा. वारंगवाडी, आंबी, मावळ, पुणे ४१०५०७ ... सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं. १
१. श्री. अमित परशुराम मोरे
रा. आपटी, समाज मंदीराजवळ, पो. डोणवत, ता. खालापुर,जि. रायगड

सदर कामी दि. ०४/०१/२०२५ रोजी जुना पुणे-मुंबई हायवे रोडवर, मौजे नायगाव गावच्या हद्दीत झालेल्या अपघातामध्ये अर्जदार सौ. कृतिका गणेश देशमुख या जखमी झाल्या आहेत. म्हणुन अर्जदार यांनी सामनेवाला यांचेविरुद्ध नुकसान भरपाई मिळणेकरिता मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जाच्या सुनावणीकामी सामनेवाला नं. १ यांस वरील पत्त्यावर नोटिस काढली असता त्याची बजावणी होवु शकली नाही त्यामुळे अर्जाचे सुनावणीचे काम प्रलंबित आहे.

तरी तुम्हांला जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि. १४/०१/२०२६ रोजी सकाळी ठिक १०:३० वा व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलांमार्फत हजर राहुन आपले म्हणणे व आपला पत्ता न्यायालयात सादर करावा. तसे न केल्यास आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १० माहे १२ सन २०२५ रोजी आमच्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक**
(कोर्टाचा शिक्का)
**सही /-**
**अधिक्षक (न्याय विभाग)**
**जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक होमियार नरीमन वकील, खुर्शीद होमियार वकील, महारुख मिनोचहेर वकील, मिनोचहेर नरिमन वकील, सुझान मिनोचहेर वकील व फिरझा ध्रुवीन सरवाला यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे, त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/ किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

**नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-चोंढी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित मिळकती खालील प्रमाणे,**

| अनुक्रमांक | भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | १) होमियार नरीमन वकील <br> २) खुर्शीद होमियार वकील | ६२/१/३ | २-८५-०० | २८.५० |
| २. | १) महारख मिनोचहेर वकील <br> २) मिनोचहेर नरिमन वकील <br> ३) सुझान मिनोचहेर वकील | ६२/१/४ | ३-००-०० | ३०.०० |
| ३. | फिरुझा झुबीन सरवाला | ६२/१/६ | २-८५-०० | २८.५० |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १३/१२/२०२५
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे बोर्ली पंचतन ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ६६/२३/अ, एकूण क्षेत्र १६५.००.०० आकार -१६५०.०० पैकी श्री. मुजफ्फर अ. रहिमान मुकादम यांच्या मालकीचे क्षेत्र ३२.००.००, पैकी १२.००.०० या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मुजफ्फर अ.रहीमान मुकादम, रा. बोर्लीपंचतन ता. श्रीवर्धन जि. रायगड. यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची बोलणी करून बयाणा चिठ्ठी करण्यात आली असून संबंधीत जमिन मालकांनी आमच्या अशिलांकडून त्यानुसार बयाणा रक्कम यापूर्वीच स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे कब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. सदर जमिन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधीत सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी मिळवून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दि. १२/१२/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा. महेश्वर आळी, श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड

सही/-
**अतुल अरविंद चौगुले**
B.L.S.LL.B
खरेदीदाराचे वकील

वकील-रूपेश कृष्णा पाटील

**जाहिर नोटीस**

निशाणी क्र. :-१८/ड

अलिबाग येथील मे. मोटार अपघात न्यायाधिकरण सो. रायगड यांचे न्यायालयात
मोटार अपघात अर्ज नं. ६०/२०२५

श्रीमती मनाली रोशन देशमुख ... अर्जदार
विरूध्द
१. श्री. अमित परशुराम मोरे
रा. आपटी, समाज मंदीराजवळ, पो. डोणवत ता. खालापुर, जि. रायगंड
२. रिलायन्स जनरल इन्श्युरस कंपनी लि.
ओबेरॉय कॉमर्स इंटरनॅशनल बिजनेस पार्क, ६ वा मजला,
ओबेरॉय गार्डन सिटीच्या समोर, पश्चिम द्रुतगती मार्ग, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६८
३. श्री. सागर रमेश खोंडगे
रा. वारंगवाडी, आंबी, मावळ, पुणे ४१०५०७ ... सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं. १
१. श्री. अमित परशुराम मोरे
रा. आपटी, समाज मंदीराजवळ, पो. डोणवत, ता. खालापुर,जि. रायगड

सदर कामी दि. ०४/०१/२०२५ रोजी जुना पुणे-मुंबई हायवे रोडवर, मौजे नायगाव गावच्या हद्दीत झालेल्या अपघातामध्ये अर्जदार सौ. कृतिका गणेश देशमुख या जखमी झाल्या आहेत. म्हणुन अर्जदार यांनी सामनेवाला यांचेविरुद्ध नुकसान भरपाई मिळणेकरिता मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जाच्या सुनावणीकामी सामनेवाला नं. १ यांस वरील पत्त्यावर नोटिस काढली असता त्याची बजावणी होवु शकली नाही त्यामुळे अर्जाचे सुनावणीचे काम प्रलंबित आहे.

तरी तुम्हांला जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि. १६/१२/२०२५ रोजी सकाळी ठिक १०:३० वा व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलांमार्फत हजर राहुन आपले म्हणणे व आपला पत्ता न्यायालयात सादर करावा. तसे न केल्यास आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११ माहे १२ सन २०२५ रोजी आमच्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक**
(कोर्टाचा शिक्का)
**सही /-**
**अधिक्षक (न्याय विभाग)**
**जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे चांडगांव, ता. रोहा, जि. रायगड येथील गट नंबर २८३ क्षेत्र ०-८८-०० हे. आर, आकार ० रुपये ६७ पैसे, पैकी ०-३८-०० हे. आर, आकार ० रुपये २७ पैसे ही वरकस मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार मेहरुन्नीसा मुस्ताक बडे, रा.चांडगांव, ता.रोहा यांचे खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची असुन सदर मिळकत आमचे आशिलांनी सदर विद्यमान कबजेदार यांजकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांच्यात झालेला आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबा कबजा मिळकतीचे विद्यमान कबजेदार मेहरुन्नीसा मस्ताक बडे यांचाच आहे असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ''खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट'' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कबजा मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांचाच आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. १२/१२/२०२५

सही/-
**ॲड. श्रध्दा प्रदिप वैद्य**
'नागेश्वरभुवन', गणपती आळी,
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे चांडगांव, ता. रोहा, जि. रायगड येथील गट नंबर २८४ क्षेत्र १-४८-०० हे. आर, आकार ० रुपये ८३ पैसे, ही वरकस मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार रफीक मोहीद्दीन बडे, अजिज मोहीद्दीन बडे, मेहबूब मोहीद्दीन बडे, मेहरुन्नीसा मुस्ताक बडे, सुरैय्या खलिद काजी, रा.चांडगांव, ता.रोहा यांचे खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची (नियंत्रित सत्ता प्रकारची) असुन सदर मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदारांकडून आमचे आशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांच्यात झालेला आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबा कबजा मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांचाच आहे असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार ''खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट'' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कबजा मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार यांचाच आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. १२/१२/२०२५

सही/-
**ॲड. श्रध्दा प्रदिप वैद्य**
'नागेश्वरभुवन', गणपती आळी,
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)




### राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक खर्च टाळायला हवा. बोलण्यातून गैरसमज संभवतात. जुनी येणी पुन्हा रखडणार आहेत.
- **वृषभ** : छोटा-मोठा प्रवास घडेल. व्यावसायिक करार लाभदायक ठरतील. स्थावर प्रश्नात लाभ होईल.
- **मिथुन** : अकारण वाद-विवाद टाळावे. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. महत्त्वाच्या घटना घडतील.
- **कर्क** : इतरांच्या कल्पनांना दाद द्या. स्वमताग्रह टाळायला हवा. स्थापत्य, कला क्षेत्रात प्रगती होईल.
- **सिंह** : कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. व्यवसायात नव्या संकल्पनांना वाव मिळेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **कन्या** : आजचा दिवस महत्त्वाचा राहील. व्यावसायिक करार मार्गी लागतील. प्रियजनांना दिलासा मिळेल.
- **तूळ** : कलाकारांना मानसन्मान लाभेल. प्रवासात मौल्यवान वस्तुंची काळजी घ्यावी. प्रकृती सांभाळावी.
- **वृश्चिक** : कामाचा ताण अधिक राहील. जोडीदाराचा सल्ला लाभदायक ठरेल. आर्थिक प्रश्न सुटतील.
- **धनु** : आवडीच्या छंदात रमाल. रखडलेली कामं मार्गी लागतील. आर्थिक व्यवहारात चांगला लाभ होईल.
- **मकर** : अपेक्षापूर्तीचं समाधान लाभेल. व्यवसायात नव्या समस्या निर्माण होतील. विचारानं रहायला हवं.
- **कुंभ** : उत्साहवर्धक घटना घडतील. एकाच वेळी अनेक कामं मार्गी लावू शकाल. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **मीन** : किरकोळ कारणावरून मनस्वास्थ बिघडेल. होणारी कामं रखडतील. प्रवास शक्यतो टाळावा.

### १३ डिसेंबर

दिनविशेष

- **१९१६** : प्रख्यात मुष्टियोद्धा आची मूरे यांचा जन्म.
- **१९८६** : हिंदी, मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनयसम्राज्ञी स्मिता पाटील कालवश.
- **१९९६** : क्रांतिकारक श्रीधर पुरुषोत्तम अर्थात शिरूभाऊ लिमये यांचं निधन.
- **२०१३** : दिल्लीत सरकार स्थापनेसाठी काँग्रेसने आम आदमी पक्षाला बिनशर्त पाठिंबा देण्याची तयारी दाखवली.
- **२०१६** : सायरस मिस्त्री यांना टीसीएसच्या संचालक मंडळ आणि अध्यक्षपदावरून काढलं.

### आरोग्यमंत्र : औषधी लिंबाची पानं

लोणचं, कोशिंबिरीवर पिळण्यासाठी वा अन्य माध्यमातून वर्षभर आहारात समाविष्ट असणाऱ्या लिंबातील गुणधर्म आपण जाणतो, पण लिंबाच्या झाडाच्या पानांमध्येही विविध प्रकारचे गुणधर्म आहेत. तेदेखील जाणून घ्यायला हवे.

* लिंबाचे पान चुरुन किंवा रगडून त्याचा वास घेतला तर डोकेदुखीमध्ये आराम पडतो. म्हणूनच डोकेदुखी वा अर्धशिशी असेल तर लिंबाच्या पानाचा हा प्रयोग करून तुम्ही ठीक होऊ शकता. यासाठी लिंबाची पाने हातावर रगडून पाच मिनिटे त्याचा वास घ्या. यामुळे तुम्हाला आराम मिळेल. * ही पाने चेहऱ्यावरील डाग, खड्डे, मुरूमे दूर करण्यासाठीही फायदेशीर ठरतात. हे लाभ मिळवण्यासाठी लिंबाची पाच ते सहा छोटी पाने घेऊन वाटा आणि त्यात मध मिसळून चेहऱ्यावर लावा. दिवसातून एकदा हा प्रयोग केल्यास चेहऱ्यावरील सुरकुत्या, डाग, मुरूमे दूर होतील आणि चेहरा चमकदार होईल. * लिंबाच्या पानांचे आणखी बरेच फायदे आहेत. त्वचारोग, खाज, खरूज, नायटा, फोड आदींचा त्रास असेल तर तो दूर करण्यासाठी लिंबाच्या पानांचा वापर हे उत्तम औषध आहे. त्यासाठी एक साधा प्रयोग करून बघा. पाने वाटून त्याची पेस्ट करा. आता त्यात थोडा कापूर आणि कडुनिंबाचे तेल मिसळा. एक चिमुट हळद घाला. सगळे घटक एकत्र मिसळा आणि खाज, खरूज, नायटा असणाऱ्या जागी ही पेस्ट लावा. कोणत्याही त्वचारोगात हा लेप खूपच फायदेशीर आहे.



### व्हॉट्स न्यू? : पहिली इलेक्ट्रिक बोट

'कँडेला स्पीडबोट एबी' या स्वीडिश कंपनीने जगातली पहिली इलेक्ट्रिक बोट तयार केली आहे. 'कँडेला ७' नावाच्या या बोटीची किंमत २,४५,०० डॉलर इतकी आहे. २५ फूट लांबीच्या या 'कँडेला ७' मध्ये एका वेळी पाच प्रवासी बसू शकतात. ३४ मैल प्रतितास एवढा तिचा वेग आहे. ही बोट बनवण्यासाठी कार्बन फायबरचा वापर करण्यात आला असून पाणी कापताना अजिबात आवाज न करणं हे तिचं वैशिष्ट्य म्हटलं पाहिजे. 'कँडेला ७' एका वेळी ५० समुद्री मैल म्हणजे ५८ मैल अंतर कापू शकते. बोटीच्या पुढच्या आणि मागच्या बाजूला रिट्रेक्टेबल बसवण्यात आले आहेत. उथळ पाण्यात प्रवास करताना वेगळा मोड देण्यात आला आहे. बोटीत लिथियम आयर्न बॅटरी बसवण्यात आली असून पूर्ण चार्ज होण्यासाठी तिला १२ तास लागतात. इलेक्ट्रॉनिक बोटीमुळे ऊर्जेची बरीच बचत होऊ शकते, असा कंपनीच्या सीईओंचा दावा आहे. सध्या बाजारात इलेक्ट्रिक बोटी उपलब्ध नाहीत. एखाद-दुसरी बोट असली तरी गतीअभावी फारसा वापर होत नाही. पण इलेक्ट्रिक बोटींच्या निर्मितीचं प्रमाण वाढवून त्यांची किंमत कमी करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. यामुळे बराच फायदा होणार आहे.

### स्मार्ट शॉपिंग : लिपस्टिकची खरेदी?

प्रसाधनांच्या यादीत लिपस्टिकला वरचं स्थान असतं. लिपस्टिकशिवाय मेक अप पूर्ण होत नाही. बाजारात लिपस्टिकचे अनेकविध प्रकार मिळतात. मॅट, ग्लॉसी, शायनी, लिक्विड आदींच्या भाऊगर्दीतून परफेक्ट शेड निवडताना बराच गोंधळ उडतो. आपल्या चेहऱ्याला, रंगाला साजेशी लिपस्टिक हवी. सौंदर्य खुलवणाऱ्या या प्रसाधनाची निवड कशी करायची? पाहू या.

* आपली नेमकी गरज ओळखा. क्रीम, मॅट, फ्रॉस्ट फिनिश, शिमर असे लिपस्टिकचे प्रकार बाजारात मिळतात. यापैकी कोणती लिपस्टिक निवडायची हे आधी ठरवा.

* लिपस्टिक निवडताना ओठांची रचना आणि त्वचेचा रंग या महत्त्वाच्या बाबी लक्षात घ्या. लिपस्टिकचा रंग ओठांवर प्रभाव टाकतो. डीप शेडमुळे ओठ मोठे दिसतात तर ब्राईट शेडमुळे लहान वाटतात.

* विविध प्रकारच्या आणि रंगांच्या लिपस्टिक्सची तुलना करुन पहा. इंटरनेटवर त्याविषयीच्या प्रतिक्रिया वाचा. दुकानात जाण्याआधी थोडा अभ्यास करा. ब्रँड्सबद्दल जाणून घ्या. **(क्रमश:)**

### पंचांग

**शनिवार, १३ डिसेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष कृ. ९, चंद्रराशी : कन्या, नक्षत्र : हस्त, योग : आयुष्मान, सूर्योदय ७.०५, सूर्यास्त १८.०१

### फॉरवर्डस

**कमियाँ ढूंढोगे तो मिल ही जायेग़ी ज़नाब...**

**रब के बन्दें हैं रब तो नहीं...!**

### फॅशन पॅशन

* बॉंबर जॅकेट हा प्रकारही हिट आहे. हा प्रकार तुम्हाला स्टायलिश लूक देतोच शिवाय त्याची फारशी देखभालही करावी लागत नाही. बॉंबर फार महाग नसतात. मुख्य म्हणजे हा प्रकार कोणत्याही कपड्यांवर शोभून दिसतो. * डेनिम जॅकेट्स तर सर्वोत्कृष्ट ठरतात. विशेष म्हणजे ती आरामदायी आणि स्वस्त असतात. कॅज्युअल किंवा स्मार्ट कॅज्युअल लूकला चार चाँद लावण्यासाठी तुम्ही एखादं डेनिम जॅकेट घ्यायलाच हवं. * हूडीज हा प्रकारही हिट आहे. हूडीज आरामदायी आणि स्टायलिश असतात. हा प्रकार अगदी सहज कॅरी करता येतो. हूडीज कशावरही घालू शकता.

### करिअरवाटा : बायोमेडिकल इंजिनिअरसाठी...

डॉक्टरांना लागणाऱ्या साधनांचा विकास, निर्मिती आणि देखभाल यासाठी म्हणून वैद्यकीय आणि अभियांत्रिकी या दोन्ही शाखांचा मिलाप घडवून बायोमेडिकल इंजिनिअरींग हे शास्त्र विकसित झालं. या शाखेचं शिक्षण घेतलेले पदवीधर आणि तंत्रज्ञ अनेक प्रकारांनी डॉक्टरांना उपयुक्त काम करू शकतात. सध्या वैद्यकीय व्यवसायात निरनिराळ्या प्रकारच्या साधनांचा वापर वाढत आहे. अशी साधने जास्त असतील तितका त्या दवाखान्याकडे रुग्णांचा ओढा असतो. म्हणून अशा रुग्णालयात डॉक्टरांच्या इतकंच बायोमेडिकल इंजिनअर्स आणि परिचारिकांइतकंच बायो मेडिकल तंत्रज्ञ आवश्यक ठरत आहेत. या कामाच्या पहिल्या प्रकारात साधनांचा विकास आणि संशोधन तर दुसऱ्या प्रकारात दुरुस्ती, देखभाल या गोष्टी येतात. ही पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्याला वैद्यकीय शाखेचं आणि अभियांत्रिकी शाखेचंही तेवढंच ज्ञान असतं. त्यामुळे वैद्यकीय निदानासाठी नवनवी साधनं शोधून काढून ती विकसित करण्याचे काम संशोधक बुद्धी असणारा बायोमेडिकल इंजिनअर करू शकतो. किंवा अशा प्रकारची साधनं विकसित करण्यासाठी स्थापित एखाद्या संस्थेत संशोधक म्हणून नोकरी करू शकतो. विविध रुग्णालयांमधील साधनांची देखभाल, दुरुस्ती करण्याची नोकरी मिळवू शकतो. सध्या बायोमेडिकल इंजिनिअर्सची गरजही वाढत आहे. बदलत्या काळाची ही गरज वेळीच लक्षात घ्यायला हवी.



### खेचाखेची : खूप पुढे जाशील

एसटीत बसलेल्या कॉलेजातील मुलीला कंडक्टर म्हणाला, बाळा तुझ्या हातात हा जो स्मार्ट फोन आहे ना, त्याच्यामुळे तू तुझ्या आयुष्यात... अजून खूप पुढे जाशील!

मुलीला खूप आनंद झाला.
ती म्हणाली, अरे व्वा काका, पण तुम्हाला असे का वाटले ?

कंडक्टर म्हणाला, कारण बाळा, तुझा स्टॉप जाऊन अर्धा तास झालाय.

### वेगळं काही

मध्यंतरी पॅरिसमध्ये झालेल्या लिलावात एका व्यक्तीने १४ फूट उंचीचा जिना खरेदी करण्यासाठी तब्बल १.३२ कोटी रुपये मोजले. हा जिना आयफेल टॉवरच्या दुसऱ्या अणि तिसऱ्या मजल्याचा भाग होता. अर्थात असं पहिल्यांदाच घडलेलं नाही. २०१६ मध्ये एका आशियाई इसमाने टॉवरच्या जिन्याचा एक भाग तब्बल ४.१६ कोटी रुपयांना खरेदी केला होता. त्याला अवघ्या १४ पायऱ्या होत्या. ३२४ मीटर उंच आयफेल टॉवर फ्रेंच इंजिनियर गुस्ताव एलिल यांच्या संकल्पनेतून साकारला. वरच्या मजल्यांवर जाण्यासाठी पूर्वी या जिन्यांचाच वापर होत असे. १९८३ मध्ये तिथे लिफ्ट बसवण्यात आली. तेव्हापासून जिन्यांना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालं.

### फॅशन पॅशन : करा हटके स्टाईल



सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या फॅशनेबल जमान्यात वॉर्डरोबमध्ये नवनव्या वस्त्रांची भर पडावी असं अनेकींना वाटतं. त्यात वेगवेगळ्या स्टाईलच्या, फॅशनच्या कुर्त्यांचा समावेश असतो. पण हेच कुर्ते तुम्ही जीन्सवरही कॅरी करू शकता. फक्त सिंपलच नाही तर ट्रेंडी कुर्तेही जीन्सवर शोभून दिसतात. ही स्टाईल कशी साधायची? पाहू या.

* सध्या फ्रंट ओपन कुर्त्यांची चलती आहे. सिगारेट पँट किंवा पलाझोबरोबर तसेच जीन्सवरही हे कुर्ते घालता येतील. डिस्ट्रेस्ड किंवा बॉयफ्रेंड जीन्सवरही असे कुर्ते शोभून दिसतील. * सध्या हाय अँड लो कुर्त्यांची फॅशन आहे. हा प्रकारही जीन्सवर घालता येतो. त्यावर स्टेटमेंट नेकलेस किंवा कानातलं घालून इंडो-वेस्टर्न लूक मिळवता येतो. * पेप्लम ही एक वेगळी स्टाईल आहे. या स्टाईलचे शॉर्ट कुर्ते आणि फ्रॉक्स मिळतात. ते घेरदार असतात. हा प्रकार जीन्सवर खुलून दिसतो. * अनारकली कुर्त्याला ट्विस्ट देता येईल. चुडीदार, लेगिंग्जऐवजी जीन्सवर तो घालता येईल. रिप्ड जीन्सवर तो शोभून दिसेल.

## सुडोकू ४०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | | | ८ | | ३ |
| | ३ | २ | | | | | १ | |
| | | ६ | ३ | १ | | | ९ | |
| ३ | | | १ | | | ९ | | |
| | | ९ | ५ | ८ | ७ | ३ | | |
| | | ८ | | | ९ | | | ४ |
| | १ | | | ७ | ५ | ४ | | |
| | ८ | | | | | २ | ३ | |
| ५ | | ४ | | | | | | ६ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ३९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ७ | ६ | २ | ९ | ३ | ८ | १ | ४ |
| २ | ३ | ८ | ७ | ४ | १ | ९ | ५ | ६ |
| १ | ४ | ९ | ८ | ५ | ६ | ३ | ७ | २ |
| ३ | ९ | १ | ५ | ६ | ७ | ४ | २ | ८ |
| ४ | ८ | २ | १ | ३ | ९ | ५ | ६ | ७ |
| ६ | ५ | ७ | ४ | ८ | २ | १ | ९ | ३ |
| ९ | २ | ४ | ३ | ७ | ५ | ६ | ८ | १ |
| ७ | ६ | ३ | ९ | १ | ८ | २ | ४ | ५ |
| ८ | १ | ५ | ६ | २ | ४ | ७ | ३ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ४०

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ■ | ४ | | ५ | ६ | ■ | ७ | | ८ |
| ९ | | ■ | १० | | | | ■ | ११ | | | | ■ | |
| | ■ | १२ | | | ■ | १३ | १४ | ■ | | ■ | १५ | १६ | |
| १७ | १८ | | | ■ | १९ | | | | | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | ■ | २० | | ■ | | ■ | ■ | ■ | २१ | | |
| २२ | | २३ | २४ | | ■ | २५ | | | २६ | ■ | | ■ | ■ |
| | ■ | २७ | | ■ | २८ | | | ■ | २९ | ३० | | ३१ | |
| ३२ | ३३ | | ■ | ३४ | | | ■ | ३५ | ■ | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | ३६ | ■ | ३७ | | ३८ | | ३९ | ■ | ४० | | ४१ |
| ४२ | | | | ■ | | ■ | | ■ | ४३ | | | ■ | |
| ■ | | ■ | ४४ | ४५ | ■ | ४६ | | ४७ | | ■ | ४८ | ४९ | |
| ५० | | ५१ | ■ | ५२ | | | ■ | | ■ | ५३ | | | |
| | ■ | ५४ | | | ■ | ५५ | | | ■ | | ■ | | ■ |
| ५६ | | | ■ | ५७ | | | ■ | ५८ | | | | ■ | ५९ |

**आडवे शब्द :-**
१) झेंडा, ध्वज
४) भुंगा, भ्रमर
७) झुणका ***
९) काढलेली सुट्टी
१०) संयुक्त मालकीचा
११) बारीकसारीक तपशीलासह
१२) शुभ्र, पांढरा
१३) वर्ण
१५) नक्षीदार ताटली
१७) लोणी
१९) जेवणे
२०) मुंबईचा घरगडी
२१) रव, ध्वनी
२२) लोकांच्या मनातील विचार
२५) मित्र
२७) सत्वांश
२८) तसराळे
२९) चित्रपटाचा पडदा
३२) फुरसत
३४) एक फळ
३७) नम्रतेने मान खाली घातलेला
४०) दहावी रास
४२) पुष्कळ
४३) ढगांनी भरलेले पावसाळी वातावरण
४४) वल्लरी
४६) मिठाई तयार करणारा
४८) लाकडाचे गोदाम, माल साठविण्याची जागा
५०) श्रीकृष्णाचे एक नाव
५२)लेख लिहिणारा
५३) त्रासदायक बडबड
५४) चणचण, दुर्भिक्ष
५५) गोदावरीच्या काठावरचे तीर्थक्षेत्र
५६) खबदडी
५७) धोबी
५८) यथाशास्त्र, पद्धतीनुसार
५९) बैलाच्या मानेवरील जोखड

**उभे शब्द :-**
१) पोते
२) गणितातील उणे
३) जास्तीत जास्त
४) मध
५) जातीचा गुण, सत्वांश
६) रविवासर
७) हिंदुस्थान
८) रक्षण करणारा
१०) नवऱ्याची दुसरी पत्नी
१२) मालक
१४) गरजू मनुष्य
१६) चांगला
१८) मुख, चेहरा
१९) पार्वतीचे एक नाव
२०) पैशाचा ढीग
२१) लांबट चौकोन
२२) अळशी धान्याचे एक नाव
२३) मर्कट
२४) धमनी
२५) वाकबगार, निष्णांत
२६) अंकुर
२८) संत्र, मोसंबीच्या जातीतील एक मोठे फळ
३०) वजनदार
३१) पराक्रमाबद्दल मिळणारा बिल्ला
३३) विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असलेली इमारत
३५) योग्य, उचित, बरोबर
३६) पैंजण
३८) निस्तेज, उदास, खिन्न
३९) तळण्याचे पात्र
४०) कपाळभर लावलेले कुंकू
४१) भात शिजतानाचा आवाज
४५) श्रीमंत
४६) उगाच, विनाकारण
४७) नियमित यात्रा करणारा
४९) घसा साफ करणे, बेडका
५०) गणेशाला आवडणारा गोड पदार्थ
५१) बाज विणण्याची सुती पट्टी
५३) देवळाच्या शिखराचे टोक

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | न | ग | ण | म | न | ■ | आ | ग | म | न | ■ | स | ■ |
| रा | व | ण | ■ | ग | म | ना | ग | म | न | ■ | का | म | ना |
| बा | ■ | गो | वा | ■ | स्का | ■ | ■ | न | क | ला | का | र | ■ |
| ज | र | त | र | ■ | र | क | बा | ■ | व | ट | ■ | स | ल |
| रा | ज | ■ | स | दा | ■ | ड | ■ | ख | डा | ■ | ना | ■ | ह |
| ■ | त | र | ■ | स | ल | वा | र | ■ | ■ | रा | त | सा | र |
| वा | ■ | य | क्ष | ■ | ष्क | ■ | या | ता | या | त | ■ | र | ■ |
| म | म | ता | ■ | प | र | वा | ■ | र | ग | ■ | ज | वा | न |
| ना | ■ | वा | प | र | ■ | ट | व | का | ■ | अ | न | न | स |
| व | सा | ■ | त | त | प | प | ■ | ना | ग | ■ | ग | ■ | ता |
| ता | व | दा | न | ■ | गा | ■ | म | थ | ळा | ■ | ण | ■ | ■ |
| र | ■ | वे | ■ | आ | र | मा | र | ■ | ■ | वि | ना | य | क |
| ■ | म | दा | ल | सा | ■ | स्त | ■ | सा | म | ना | ■ | म | स |
| वि | जा | र | ■ | म | ग | र | मि | ठी | ■ | ■ | झा | ल | र |

# कलासक्त





**पुण्यातील अशोक कुमार सराफ यांनी अनेक सुशिक्षित आणि गायनाची व संगीताची आवड असणारे तरुण एकत्र केले व 'मेलडी मेकर्स' या ऑर्केस्ट्राची स्थापना केली. या ऑर्केस्ट्रामध्ये अनेक तरुण सहभागी झाले. त्यानंतर सुदेश भोसले व चंद्रशेखर गाडगीळ हे या टिमचे प्रमुख कलाकार होते. या ऑर्केस्ट्राने देश-विदेशात अनेक गाण्यांचे कार्यक्रम केले व ते लोकप्रियही झाले. चंद्रशेखर गाडगीळ यांनी त्यानंतर स्वतःचा 'चंद्रशेखर गाडगीळ ऑर्केस्ट्रा' स्थापन केला व अनेक ठिकाणी कार्यक्रम केले.**



## चंद्रशेखर गाडगीळ एक उपेक्षित गंधर्व!

रंगबहार

शरद कोरडे

अलिबाग मधील सार्वजनिक बांधकाम विभागातील गणेशोत्सवात या ऑर्केस्ट्राचे सलग तीन वर्षे कार्यक्रम झाले. प्रेक्षकांना हा कार्यक्रम खूप आवडल्यामुळे त्यांनी सलग तीन वर्षे या कार्यक्रमाची मागणी केली. त्यातील प्रमुख गायक असलेल्या चंद्रशेखर गाडगीळ हे या कार्यक्रमाची सुरुवात राज कपूरच्या 'दिल ही तो है' या चित्रपटांतील 'लागा चुनरी मे दाग छुपाऊँ कैसे' या गाण्याने करीत असत. पुढे चंद्रशेखर गाडगीळ यांनी आपल्या पत्नीच्या नावाने 'रश्मी ऑर्केस्ट्रा' स्थापन केला. रश्मी आणि चंद्रशेखर हे या ऑर्केस्ट्रा मधील प्रमुख कलावंत होते. पुढे दोघांमध्ये मतभेद झाल्यामुळे चंद्रशेखर यांनी या ऑर्केस्ट्रा मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. 'मेलडी मेकर्स' च्या एका कार्यक्रमाला संगीतकार राम कदम उपस्थित होते, त्यांना चंद्रशेखर यांचे गाणे खूप आवडले. त्यांनी त्यांची भेट घेतली व त्यांना थेट व्ही. शांताराम यांच्याकडे नेले व पुढील चित्रपटांसाठी चंद्रशेखर गाडगीळ यांना संधी द्यावी अशी विनंती केली. व्ही. शांताराम यांनी चंद्रशेखर यांचे गाणे ऐकले व पसंती दर्शविली. १९७५ मधील राजकमलच्या 'झुंज' या मराठी चित्रपटासाठी त्यांनी चंद्रशेखर यांना दोन गाणी गाण्याची संधी दिली व चंद्रशेखर यांचा मराठी व हिंदी चित्रपटांतील प्रवास सुरू झाला. चंद्रशेखर गाडगीळ यांनी पंडित सदाशिव बुवा जाधव यांचे कडून किराणा घराण्याची तालीम घेतली होती. याशिवाय पंडित हृदयनाथ मंगेशकर, यशवंत देव, पंडित मनोहर चिमोटे, यांच्यासारख्या दिग्गजांकडून त्यांनी संगीताचे धडे घेतले होते. त्यामुळे त्यांना क्लासिकल संगीताचीही जाण होती. 'झुंज'मध्ये त्यांनी 'निसर्ग राजा ऐक सांगतो' व 'कोण होतीस तू काय झालीस तू' ही गाणी खूप लोकप्रिय झाली. ही गाणी जगदीश खेबुडकर यांनी लिहिलेली होती व राम कदम यांनी त्यांवर संगीत साथ चढविला होता. त्यानंतर सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते व दिग्दर्शक चेतन आनंद यांनी त्यांच्या 'कुदरत' या चित्रपटासाठी थीम साँग 'दुखसुखकी हरमाला कुदरत की पिरोती है' हे गाणे चंद्रशेखर यांचेकडून गाऊन घेतले. या चित्रपटाचे संगीतकार होते आर डी बर्मन. स्वतः चेतन आनंद व आर.डी. यांना हे गाणे खूप आवडले, प ण

काही विघ्नसंतोषी लोकांनी चेतन आनंद यांचे कान भरले व त्यांना हे गाणे महम्मद रफी यांच्याकडून गावून घेण्याचा आग्रह धरला. शेवटी स्टुडिओमध्ये हे गाणे महम्मद रफी यांच्याकडून गावून घेण्यात आले. हे गाणे चार अंतऱ्याचे होते.स्टुडिओमध्ये तीन अंतरे झाल्यावर काही काळ विश्रांती घेण्यासाठी रफी थांबले, यावेळी चाललेल्या चर्चेतून रफींना समजले की हे गाणे आपल्या अगोदर दुसऱ्या कोणीतरी गायलेले आहे. तेव्हा त्यांना राग आला व त्यांनी रेकॉर्डिंग थांबवले. माझ्यामुळे दुसऱ्या कुणाही गायकावर अन्याय होऊ नये अशी माझी धारणा आहे. त्यामुळे मी हे गाणे गाणार नाही, असे म्हणून महम्मद रफी निघून गेले. त्यामुळे पुढे चित्रपटात हे गाणे रफीच्या आवाजात तीन अंतराचे ठेवण्यात आले, परंतु ध्वनिफिती वर मात्र चंद्रशेखर गाडगीळ यांनी गायलेले गाणे कायम राहिले. महम्मद रफी गायक म्हणून जितके मोठे होते, त्याहीपेक्षा ते माणूस म्हणून महान होते.

पुण्यामध्ये एकदा गायक मन्ना डे यांचे गायनाचा कार्यक्रम होता, त्यावेळी त्यांनी 'लागा चुनरी मे दाग' हे गाणे गायले व प्रेक्षक त्या गाण्यावर खुश झाले. त्यानंतर मात्र जमलेल्या रसिकांनी हे गाणे चंद्रशेखर गाडगीळ यांनी गावे असा आग्रह धरला. चंद्रशेखर या कार्यक्रमाला उपस्थित असल्याने आयोजकांनी त्यांना गाणे गाण्याची विनंती केली व मन्ना डे यांनीही त्याला संमती दिली. चंद्रशेखर यांचे गाणे ऐकून मन्ना डे यांनीही त्यांचे कौतुक केले व आशिर्वाद दिला. त्या वेळेचे कलाकार इतरांचे कौतुक करणारे व आदर करणारे होते हेच यातून सिद्ध होते.

संगीत दिग्दर्शक राम कदम, आर डी बर्मन, लक्ष्मीकांत प्यारेलाल व रवींद्र जैन या संगीतकारांसह गायक व संगीत सहाय्यक म्हणूनही चंद्रशेखर यांनी काम केले. मुंबई दूरदर्शनसाठी त्यांनी गायलेले 'कानाने बहिरा मुका परी नाही' हे गाणे खूप गाजले होते. अनेक उदयोन्मुख कलाकारांना मार्गदर्शन व सहाय्य करण्याचे कामही चंद्रशेखर यांनी केले. त्यांनी 'स्कूल ऑफ म्युझिक' या संस्थेची स्थापना करून त्याद्वारे युवा संगीतकारांना गायनाचे हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले. शास्त्रोक्त गाण्यापेक्षा श्रवणीय व संस्कारमय गाणे रसिकांपर्यंत पोहोचते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. तसेच कॉपीराइट्स, रॉयल्टी या संकल्पना नवोदितांना त्यांनी समजावून सांगितल्या.

चंद्रशेखर यांनी खासदार विजय दर्डा यांच्या सुविद्य पत्नी व सखीमंचच्या संस्थापक अध्यक्षा स्वर्गीय जोत्स्ना दर्डा यांच्या भजनाची 'महावीर नमन' ही कॅसेट संगीतबद्ध केली. या कॅसेटमध्ये वैशाली सामंत, सुरेश वाडकर, साधना सरगम, आर.जैन आदी गायकांनी सहभाग घेतला होता. चंद्रशेखर यांनी कमलाकर तोरणे यांच्या १९८२ सालांत आलेल्या 'नवरे सगळे गाढव' या चित्रपटातील गाणी गायली, ज्याचे संगीतकार राम लक्ष्मण हे होते आणि या चित्रपटात पद्मा चव्हाण, कुलदीप पवार, शरद तळवळकर व उषा नाईक हे कलाकार होते. रमेश देव निर्मित 'जानकी' या १९७९ सालच्या चित्रपटांत चंद्रशेखर यांनी गाणे गायले होते. १९८७ च्या 'इतिहास' या हिंदी चित्रपटात चंद्रशेखर यांनी. 'बाबुल के घर से डोली में जाती है कवारिया' हे गाणे गायले होते. या चित्रपटात राजकुमार, अनिल कपूर, शबाना आझमी, राखी व रती अग्निहोत्री यांच्या भूमिका होत्या.

चंद्रशेखर यांची काही गाजलेली गाणी खालील प्रमाणे आहेत. 'अजून आठवे ती रात्र पावसाळी' हे 'पारध' या मराठी चित्रपटातील गाणे जे मधुसूदन कालेलकर यांनी लिहिलेले होते, 'अन् हलगीच्या तालावर' हे जगदीश खेबुडकर यांचे गाणे राम कदम यांनी संगीतबद्ध केले होते जे चंद्रशेखर यांनी गायले होते. 'अरुपाशी पाहे रुपी तोच भाग्यवंत' हे सुधीर मोघे यांचे गाणे बाळ बर्वे यांनी संगीतबद्ध केले होते. 'अरे कोंडला कोंडला देव' हे शरद निफाडकर यांनी लिहिलेले गाणे राम लक्ष्मण यांनी संगीतबद्ध केले होते. 'अष्टविनायका तुझा महिमा अपार' या 'अष्टविनायक' चित्रपटातील जगदीश खेबुडकर यांनी लिहिलेल्या गाण्यांतील दोन कडवी चंद्रशेखर यांनी गायली होती. 'आज या एकांत काली' या गदिमांच्या गाण्यास राम कदम यांनी संगीत दिले होते, जे गाणे 'नाते जडले दोन जीवांचे' या चित्रपटांतील होते. 'घबाड मिळू दे मला' हे 'देवकीनंदन गोपाला'या चित्रपटातील गाणे चंद्रशेखर व पुष्पा पागधरे यांनी गायले होते, त्याला राम कदम यांनी सांगितले होते 'चल झुकू झुकू' हे 'पांडोबा पोरगी फसली' या चित्रपटांतील गाणे चंद्रशेखर यांनी गायले होते, त्याशिवाय 'जाई ग जाई,' 'देव माणूस देवळात आला', 'विठू माऊली तू माऊली जगाची : हे 'अरे संसार संसार' या चित्रपटातील अनिल अरुण यांनी संगीत दिलेले गाणे सुधीर फडके, जयवंत कुलकर्णी व सुरेश वाडकर यांच्यासह चंद्रशेखर गाडगीळ यांनी गायले होते 'इतिहास' या १९८७ सालच्या चित्रपटांतील 'बाबुल के घर से डोलीमे जाती है कवारिया' हे गाणे चंद्रशेखर यांनी गायले असून या चित्रपटात राजकुमार, अनिल कपूर, शबाना आझमी, राखी व रती अग्निहोत्री हे कलाकार होते.अनेक चित्रपटांतील गाणी, भावगीते, लोकगीते गावूनही चंद्रशेखर गाडगीळ यांना फार मोठे यश मिळाले नाही. काही काळ ते उपेक्षित राहिले. त्यांनी आपल्या जीवनचरित्र 'शापित गंधर्व' या नावाने लिहिलेले आहे. प्राध्यापक प्रज्ञा देशपांडे यांनी हे चरित्र शब्दबद्ध केले असून सन्मित्र प्रकाशन ने ते प्रसिद्ध केले, मात्र त्यापूर्वीच २ ऑक्टोबर २०१४ मध्ये त्यांचे वयाच्या ६७ व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. 'दूर जाऊनी जाशील कुठवर या धरतीला सीमा आहे जाशील तेथे हेच ऐकशील सर्वस्वी मी तुझाच आहे', हे गीत प्रेमीकेला उद्देशून असले तरी गाडगीळ यांनी ते रसिकांना उद्देशून म्हटलेले आहे. बा.भ.बोरकर यांनी लिहिलेल्या कवितांवर आधारित 'कांचनसंध्या' हा कार्यक्रम चंद्रशेखर गाडगीळ करीत असत आणि हा कार्यक्रम प्रचंड लोकप्रिय झाला होता. अशा या लोकप्रिय गायकाचा व शापित गंधर्वांचा मृत्यू मुंबई मधील एका खाजगी रुग्णालयात झाल्याने त्यांच्या चाहत्यांना व आपणा सर्वांना खचतच दुःख झाले असेल. ••

## जोडीदार निवडतांना?

अंकुश शिंगाडे

जोडीदार निवडतांना महिलांबाबत ती कशा स्वभावाची आहे? तिचं राहणीमान कसं आहे? तिचं वागणं कसं आहे? ती फॅशनेबल आहे का? याचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच पुरुषांबाबत तो फॅशन पाहणारा आहे का? तो व्यसनी आहे का? हे पाहणे आवश्यक आहे. परंतु अलिकडील काळात तसं न पाहता लोकं महिलांबाबत विचार करतांना ती फॅशनेबल आहे का? हे पाहतात. ज्यातून ती फॅशनेबल असल्यानं घरात जेवढा पैसा येतो. तो पैसा खायला पुरत नाही. अशावेळेस संसाराची राखरांगोळी होते व व्यभिचार वाढतो व हीच बाब पुढं निदर्शनास आली की घटस्फोट होतात. तशीच असतात मुलंही. मुलांबद्दलही विचार करतांना त्याचं घरदार आहे का हे पाहतात. त्याला असलेली व्यसनं पाहात नाहीत. मुलगा तसा मिळतोही. परंतु जे घर असतं. ते घर त्याच्या आईवडीलांचं असतं. अन् तेच घर मुलगा होतकरु न निघाल्यास वा व्यसनाधीन निघाल्यास असलेलं घर हातातून जातं. ज्यातून घटस्फोटासारखे निर्णय घ्यावे लागतात. त्यानंही संसाराची राखरांगोळी होत असते.

जोडीदार........ जोडीदार हा अतिशय महत्वाचा भाग आहे. त्यातच जोडीदारावर आपलं उज्ज्वल भविष्य अवलंबून असतं. जोडीदार हा जर चांगला असेल तर संसाराची चांदी होत असते आणि तो जर योग्य नसेल तर संसाराची दुर्गती होते. हे तेवढंच खरं.

संसारचक्रात जोडीदार जसा महत्वाचा, तसं जोडीदार निवडीलाही स्वातंत्र्य असायला हवं. पुर्वी असं स्वातंत्र्य असायचं. त्या काळात स्रिया आपल्या स्वतःचा स्वयंवर आयोजित करायच्या. त्यातच जे व्यक्ती त्या स्वयंवरात भाग घेत असत. ते त्या मुलींना त्या स्वयंवरात जिंकत असत. ज्यातून मनालायक जोडीदार मिळत असे. परंतु मध्यंतरीच्या काळात जोडीदार निवडीचं स्वातंत्र्य हिरावलं गेलं. स्रियांना गुलाम केलं गेलं. त्यातच त्या स्त्रियांवर आपले विचार लादण्यात आले. त्यानंतर तिच्या जोडीदार निवडीवर बंधनं आलीत. त्यानंतर ना तिचं स्वयंवर होवू लागलं. ना ती आपल्या स्वतःसाठी जोडीदार निवडू लागली.

जोडीदार....... निसर्गातील पशुपक्षीही आपल्यासाठी स्वतःच्या विचारानं जोडीदार निवडतात. सुगरण पक्षात जोडीदार निवडतांना आधी घराचा विचार केला जातो. ज्यात सुगरण पक्षातील नर हे आपले घरटं बांधणं सुरु करतात. तेव्हा त्या घरट्यांना त्यांच्या माद्या पाहात असतात. ज्या त्यांच्या कला न्याहाळत असतात. त्यातच ज्या सुगरण पक्षाच्या नराची कला सुगरण पक्षाच्या मादीला भावते. तीच मादी त्या नराकडे आकर्षित होते. त्यानंतर तिही त्याला घरटं बांधण्यास मदत करीत असते. हेच घडतं गरुडाच्या जातीत. गरुडाची मादी नरापेक्षा उंच उडत असते व ती प्रत्येक वेळेस एक तुटकी फांदी आपल्या चोचीतून खाली सोडत असते. जर ती फांदी त्या नरानं झेलली तर त्या नराला ती मादी पसंत करीत असते. उद्देश असतो, त्या नरानं केलेली कामगिरी. कारण त्या पक्षात अतिशय उंच घरटं बांधलं जातं. अशावेळेस त्या घरट्यातून आपलं एखादं पिल्लू जर पडलं तर त्या पिल्लाला अलगद वरच्यावर झेलून पकडण्याची क्षमता ही नरात असायला हवी. ही मादीची भावना. तसंच झालं आहे, आपल्या मानवजातीतही. पुर्वी झाडावर राहणारा मानव आज खाली जमीनीवर राहायला आला. त्या माणसानं जोडीदार निवडतांना स्वयंवर तपासलं. त्यानंतर मुलीचा विवाह हा तिच्या मायबापाच्याही मनानं घडवला. अन् त्याही काळाला आज मागं टाकत आता पशुपक्षाची जोडीदार निवडीची पद्धती आलेली आहे. आज जोडीदार निवडतांना प्रेम आणि खरंच तो आपल्या लायक आहे की नाही हे तपासण्यासाठी पशुपक्षांची पद्धत वापरली जाते. त्यातच आज त्या मुलाचं घर आहे का आणि आहे तर कसं? त्या मुलाची शेती आहे का? आहे तर किती?

पशुपक्षी हे आपले जोडीदार निवडतांना जशी आपली अक्कल वापरतात. तीच अक्कल आज वापरण्यात येत असलेली दिसून येत आहे. काळ बदलला आहे व बदलत्या काळानुसार जोडीदार निवडीचीही पद्धत बदलली असून लोकांनी आपआपल्या मतानुसार जोडीदार निवडीची पद्धत बदलवलेली आहे. आता मुली त्या मुलाचं घरच नाही तर शेतीही आहे का हेही तपासतात आहे. मुलगा साधा असला की औओ विवाहाला चालतच नाही. आज लोकांना विवाह करण्यासाठी साध्या भोळ्या मुलामुलींची गरज नाही. गरज वाटते, एखाद्या मादक मुलांची, जो मुलगा व्यसन करतो. दारु, अफीम, गांजा पितो आणि पाजतो. त्यातच अशा मुलांना चित्रपट बघण्याचा शौक आहे काय? त्यातच अशा मुलांना रेस्टॉरंटमध्ये जाण्याचा शौक आहे काय? तसेच अशी मुलं ही डान्सबारमध्ये जातात का? हेही आजच्या काळात पाहिलं जात आहे. मात्र अशा मुलाजवळ घर असेल आणि तेही चांगलं असेल तर उत्तमच. परंतु तो मुलगा होतकरु आहे किंवा नाही? हे पाहिलं जात नाही. हीच वास्तविकता बऱ्याच घरात आज अनुभावयास मिळते. याबाबतीत मुलंही काही मागे नाहीत. त्यांनाही मुली या फॅशनेबल हव्यात. मग त्या मुलींचे बाहेर प्रेमचक्कर असले तरी त्यांना चालते. तू काहीही कर. फक्त पैसे कमवून आण. ही फॅशन आज जोर धरु लागलेली आहे. आजच्या मुली जोडीदार निवडतांना कधीही स्वयंवर पद्धतीनं वागत नाहीत वा परीक्षा घेत नाहीत आणि मुलंही कधी त्या परीक्षेत उतरत नाहीत. मात्र पक्षी ज्याप्रमाणे आपला जोडीदार निवडतात. तशाच आजच्या मुलीही आपला जोडीदार निवडतात. परंतु पक्षी जोडीदार निवडतांना तो आपल्या किती कामाचा? याचा रास्त दृष्टीकोनातून विचार करतात. ज्यात लेकरांचं संगोपन हा भाग येतो आणि आजच्या मुली हा दृष्टीकोन बाजूला ठेवून केवळ मनोरंजन म्हणून जोडीदार निवडत असतात. म हत्वाचं म्हणजे जोडीदार निवडतांना ज्या प्रमाणे पशुपक्षी हे आपला जोडीदार आपली मुलं झाल्यावर आपल्या मुलांप्रती किती उपयोगाची ठरतील, हा विषय घेवून जोडीदार निवडतात. त्याप्रमाणे आजच्या मुलींनीही तसाच विषय अंगीकारावा. त्यांनी जोडीदार निवडतांना तेच मुल्य जोपासावं. मग तो मुलगा फॅशनेबल नसला तरी चालेल. तो मुलगा घेवून चालणारा असावा. त्यातच तो निर्वसनी असावा. त्याचं घर नसलं तरी चालेल. त्याच्या घरादाराचा विचार करु नये. कारण व्यसन जर नसतील तर असे व्यक्ती संसारात रमल्यावर कितीतरी घरं घेवून टाकतात. विशेष म्हणजे मुलांमुलींनी जोडीदार निवडावा. परंतु त्यात केवळ वासनापुर्ती, फॅशनेबलपणा, व्यसनाधीनता हाच उद्देश ठेवू नये. उद्देश ठेवावा, संसार करणे. अन् तोही चांगला संसार करणे. जर असं जोडीदाराला करता येत नसेल तर त्यांनी विवाहच करु नये. ••

**जगातील सर्वात देखणा अभिनेता म्हणून आंतरराष्ट्रीय माध्यमांनी गौरव करुनही धर्मेंद्र यांचे पाय कायम मातीत राहिले. त्यांनी कधीही स्वतःला नंबर वन मानले नाही. धर्मेंद्र यांचे स्टारडम प्रचंड होते. सुपरस्टार असूनही त्यांचे आयुष्य साधेपणाने प्रेरीत होते. हा उमदा कलाकार आता काळाच्या पडद्याआड गेला असला तरी उत्तमोत्तम भूमिका, संस्मरणीय व्यक्तिरेखा आणि अव्वल अभिनय यासाठी रसिकांच्या हृदयात राहील.**

## ही मॅनची एक्झिट



मधुरा कुलकर्णी

धर्मेंद्रसारख्या दिग्गजाला निरोप देण्यासाठी एक शिष्टाचार असतो. राष्ट्रीय सन्मान विसरून जा; त्यांच्या मृत्यूची बातमीच सस्पेन्समध्ये लपून राहिली. धर्मेंद्र यांना राष्ट्रीय सन्मानाने अंतिम निरोप द्यायला हवा होता. त्यांना देशाचा तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेल्या पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. सुरुवातीला रुग्णालयात त्यांच्या आजाराभोवती असलेल्या सस्पेन्समुळे चाहत्यांना धक्का बसला. नंतर, त्यांच्या मृत्यूबाबतच्या अफवांनी एक नाट्य निर्माण केले. कुटुंबातील सदस्यांनी माध्यमांवर आगपाखड केली. धर्मेंद्र हे भाजपचे माजी खासदार होते. त्यांचे पुत्र, सनी देओल आणि हेमा मालिनी यांनीही भाजपच्या तिकिटावर लोकसभा निवडणूक लढवली होती. त्यामुळे या कुटुंबाने सर्व राजकीय पक्षांशी जवळचे संबंध राखले आहेत. मुंबईतील विलेपार्ले येथील पवन हंस स्मशानभूमीमध्ये अतिशय खासगी पद्धतीने त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले. याबाबत इतकी गुप्तता का पाळली गेली, असा प्रश्न यावेळी उपस्थित झाला. त्यांना तोफांच्या सलामीसारखा राज्यस्तरीय सन्मान मिळाला नाही. पद्मभूषण पुरस्कारप्राप्त लोकप्रतिनिधीसाठी हा सन्मान अपेक्षित असतो; परंतु कुटुंबाची त्वरित अंत्यसंस्काराची इच्छा होती. त्यामुळे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होऊ शकले नाहीत.

धर्मेंद्र साधेपणा, नम्रता आणि मोकळ्या स्वभावाबद्दल ओळखले जात होते. रूपेरी पडद्यावर धर्मेंद्र 'ॲक्शन-ओरिएंटेड' प्रतिमेत कैद झाले असले, तरी मुळात कवी होते. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफदेखील त्यांचे चाहते होते. धर्मेंद्र त्यांच्या अभिनयासाठी तसेच उदारतेसाठीही प्रसिद्ध होते. 'धर्मेंद्र- नॉट जस्ट अ ही-मॅन' हे पुस्तक पंजाबपासून मुंबईपर्यंतच्या त्यांच्या प्रवासाच्या आठवणी उलगडून दाखवते. धर्मेंद्र यांचे वडील लुधियानाजवळील सानेवाल गावात गणिताचे शिक्षक होते आणि मुलानेही प्राध्यापक व्हावे असे त्यांना वाटत होते; परंतु मुळात हुशार असलेल्या धर्मेंद्र यांनी चित्रपटक्षेत्राची वाट धरली. चित्रपट पाहणे हे त्यांचे एक दूरचे स्वप्न होते. लहानपणी, १९४८ मध्ये प्रदर्शित झालेला दिलीपकुमार यांचा 'शहीद' हा चित्रपट त्यांनी गुपचूप पाहिला. चित्रपट आणि दिलीपकुमार यांनी त्यांच्या हृदयावर जादू केली आणि जणू काही त्या दिवशी त्यांचे नशीब पालटले. नशीबही त्यांच्या बाजूने होते. १९५८ मध्ये 'फिल्मफेअर' मासिकाने नव्या कलाकारांच्या प्रतिभा शोधासाठी मोहीम राबवली. त्यात बिमल रॉय आणि गुरुदत्त सारखे दिग्गज उपस्थित होते. त्यावेळी मालेर कोटलामध्ये काम करणारे धर्मेंद्र जान मोहम्मद फोटो स्टुडिओमध्ये गेले आणि म्हणाले, 'मला दिलीपकुमारसारखे दिसायचे आहे; काही तरी करा.' आणि अगदी तसेच घडले. 'फिल्मफेअर'तर्फे त्यांची निवड झाली आणि ते मुंबईत आले.

त्यानंतर धर्मेंद्र यांची बहुरंगी, बहुढंगी चित्रपट कथा सुरू झाली. १९६० च्या दशकाच्या अखेरीस धर्मेंद्र यशाच्या शिड्या चढत होते. बिमल रॉय यांनी त्यांना 'बंदिनी' या चित्रपटात पहिली भूमिका दिली; पण हा चित्रपट तयार होण्यासाठी वेळ लागला आणि त्यांच्या संघर्षाच्या काळात अर्जुन हिंगोरानी यांनी 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटासाठी धर्मेंद्रला साइन केले. १९६६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'फूल और पत्थर' या चित्रपटाने धर्मेंद्रला एकल नायक म्हणून स्थापित केले. या चित्रपटातील एका दृश्यात धर्मेंद्र एक गुंड आणि मद्यपीची भूमिका करत होता. तो आपला शर्ट काढून एका भिकारी आणि विधवेला घालतो. त्यावेळी, कोणत्याही नायकाकडे अशी शरीरयष्टी नव्हती. या चित्रपटाने 'ही-मॅन' पात्राची पहिली झलक दाखवली आणि धर्मेंद्रला पहिले फिल्मफेअर नामांकन मिळवून दिले. यशाची शिडी चढताना हा प्रवास सोपा नक्कीच नव्हता. स्पर्धा चुरशीची होती. १९६० च्या दशकात धर्मेंद्र सुरुवात करत होता, तेव्हा शम्मी कपूर सर्वांच्या पसंतीला उतरला होता. १९७० च्या दशकात राजेश खन्नारुपी वादळ घोंगावत होते. तो नवी उंची गाठत होता. त्यानंतर अमिताभ नावाचे नवे वादळ आले; पण या सगळ्यात धर्मेंद्र हा कदाचित एकमेव अभिनेता असेल, जो ६० ते ८० च्या दशकापर्यंत 'हिट मशीन' राहिला. हा काळ धर्मेंद्रच्या 'हकीकत', 'दिल ने फिर याद किया,' 'ममता', आणि 'मेरे हमदम, मेरे दोस्त' सारख्या चित्रपटांचा होता, तिथे त्याला बिमल रॉय, हृषिकेश मुखर्जी आणि चेतन आनंद सारख्या दिग्दर्शकांनी सन्मानित केले होते.

नंतर १९७० चे दशक आले. त्यात धर्मेंद्र यांची अनोखी शैली दिसली. त्यात ॲक्शन, रोमान्स, कॉमेडी आणि व्यावसायिक चित्रपटांपासून ते सर्व काही होते. 'जीवन मृत्यू', 'सीता और गीता', 'चरस', 'ब्लॅकमेल', 'चुपके चुपके' असा प्रवास सुरू होता. १९७५ मध्ये 'शोले'च्या वेळी त्यांची, 'वीरू'च्या व्यक्तिरेखेची लोकप्रियता शिगेला पोहोचली होती. मग ते टाकीवर चढण्याचे दृश्य असो वा अन्य; या चित्रपटाने धर्मेंद्र यांना स्टारडमपर्यंत पोहोचवले. धर्मेंद्र सर्वात देखण्या अभिनेत्यांपैकी एक होता. दिलीपकुमार हे धर्मेंद्र यांचे आदर्श होते. एकदा एका कार्यक्रमात दिलीपकुमार म्हणाले होते, की ते मंदिरात जात, तेव्हा आपल्याला धर्मेंद्रइतके देखणे का बनवले गेले नाही, असे विचारायचे! एके काळी धर्मेंद्र यांना प्रचंड प्रसिद्धी मिळाली होती; परंतु दारूच्या व्यसनामुळे त्यांचे नुकसान झाले. १९९० च्या दशकानंतर 'सत्यकाम' आणि 'चुपके चुपके' या चित्रपटांचे स्टार धर्मेंद्र यांनी 'पापी देवता', 'वीरू दादा', 'डाकू भैरव सिंह' आणि 'महाशक्ती' यासारख्या चित्रपटांमध्ये ज्या प्रकारच्या भूमिका केल्या, त्या अनेक चाहत्यांसाठी वेदनादायक होत्या. १९९० ते २००३ हा काळ धर्मेंद्र यांच्या कारकिर्दीतील प्रतिगामी काळ म्हणता येईल. १९९९ मध्ये केलेल्या 'मुन्नीबाई' या चित्रपटाद्वारे त्यांनी स्वतःला 'बी-ग्रेड' चित्रपटांमध्ये पूर्णपणे बुडवून घेतले. अभिनय आणि धर्मेंद्र यांचे नाते अतूट होते.

एका मुलाखतीत धर्मेंद्र म्हणाले होते, 'अभिनय हा माझ्यासाठी प्रियकर आहे. मला तो आवडतो. प्रियकर आणि आणि प्रेयसीमध्ये जसे भांडण होते, तसे आमच्यातही होते. कधी कधी ती नाराज होते आणि मी तिला शांत करतो; तर कधी कधी मी नाराज होतो आणि ती मला शांत करते; पण मी कधीही हार मानली नाही.' धर्मेंद्रने कधीही अभिनय सोडला नाही. अभिनयाव्यतिरिक्त धर्मेंद्र यांना उर्दू भाषेतील रचना आणि कविता आवडायच्या. त्यांच्या अभिनयात एक साधेपणा होता. एक अशी कृपा होती, जी कधी कधी पडद्यावर दिसून येते आणि कधीकधी 'ही-मॅन'च्या सावलीत लपलेली राहते; परंतु धर्मेंद्रचा शोध कधीच संपला नाही. त्यांच्या चित्रपटातील एक संवाद आहे, 'काही तरी मिळवण्याची इच्छा, काही तरी चांगले शोधणे या प्रक्रियेत माणूस त्याच्याकडे असलेले सर्वस्व गमावतो. शोध कधीच संपत नाही. वेळ संपतो...' एका कार्यक्रमात धर्मेंद्र म्हणाले होते, की प्रत्येकजण आपल्या मेंदूने काम करतो; परंतु आपण आपल्या हृदयाचा वापर करतो, कारण देवाने आपल्याला हृदय दिले आहे. आपण आपल्या हृदयाचा वापर जास्त करतो. जगातील सर्वात देखणा अभिनेता म्हणून आंतरराष्ट्रीय माध्यमांनी गौरव करुनही धर्मेंद्र यांचे पाय कायम मातीत राहिले. मातीशी त्यांचे इमान कधीच तुटले नाही. एक यशस्वी अभिनेता म्हणून धर्मेंद्र यांचा वारसा चित्रपटसृष्टीत मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. त्यांनी कधीही स्वतःला नंबर वन मानले नाही. धर्मेंद्र एक दिग्गज अभिनेते होते आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील महान कलाकारांपैकी एक होते. त्यांचे स्टारडम प्रचंड होते. सुपरस्टार असूनही त्यांचे आयुष्य साधेपणाने प्रेरीत होते. हा उमदा कलाकार आता काळाच्या पडद्याआड गेला असला तरी उत्तमोत्तम भूमिका, संस्मरणीय व्यक्तिरेखा आणि अव्वल अभिनय यासाठी रसिकांच्या हृदयात राहील. ••

# बालांगण



## हान्सचा ख्रिसमस

**ख**प खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. जर्मनीमध्ये ब्रुकेनडॉर्फ नावाचे एक लहान गाव होते. त्या गावात हान्स नावाचा एक गरीब मुलगा राहत होता. त्याला कुणीही नव्हते. जे मिळेल ते खाऊन तो दिवस काढत असे. एका वर्षी ख्रिसमसच्या दिवसात प्रचंड थंडी पडली होती. हान्स कुडकुडत रस्त्यावरून फिरत होता. गावात सगळीकडे ख्रिसमसची तयारी चालू होती. लोक झाडे सजवत होते. रंगीत दिवे लावत होते. गोड पदार्थ बनवत होते. हान्सला खूप वाईट वाटत होते. कारण त्याच्याकडे काही नव्हते. अचानक त्याला गावातल्या चौकात एका आजोबा भेटले. ते होते सेंट निकोलस. ते हान्सला म्हणाले, हान्स, दु:खी होऊ नकोस. देव खूप दयाळू आहे. त्याचे तुझ्याकडे लक्ष आहे. तू इतरांना आनंद दिलास, तर देव तुलाही आनंद देईल.

हान्सने काही फळे गोळा केली. छोट्या मुलांना दिली. आजूबाजूच्या घरात



जाऊन लोकांना मदत केली. गमतीदार गोष्टी सांगून सर्वांना हसवलं. लोक त्याच्यावर खुश झाले. हान्सचे दु:ख दूर पळून गेले.

ख्रिसमसच्या दिवशी चर्चमध्ये प्रार्थना करून हान्स रात्री घरी आला. पाहतो तर काय ? तर त्याचे घर सुंदर सजवले होते. घरात झाडावर दिवे लावले होते. दारापाशी खाऊ आणि खेळणी ठेवली होती. सेंट निकोलसने आणि गावातल्या लोकांनी त्याला बक्षीस दिले होते.

**जर्मन लोककथा**

'आपण इतरांना मदत केली तर देव आपल्याला मदत करतो.' सेंट निकोलस म्हणाले. हान्सला खूप आनंद झाला. त्याला कळले होते की ख्रिसमस प्रेम, मदत आणि आनंद वाटण्याचा दिवस आहे. आजही ब्रुकेनडॉर्फसारख्या गावात ख्रिसमसच्या दिवशी लोक एकमेकांच्या घरात हळूच भेटवस्तू ठेवतात आणि आनंद साजरा करतात.


## बहुपयोगी लोह

**ख**निज म्हणजे पृथ्वीच्या आत नैसर्गिकरित्या तयार झालेले खास पदार्थ किंवा दगड. पृथ्वीच्या पोटात असलेल्या उष्णता, दाब आणि बदलांमुळे खनिजे तयार होतात. दगड फोडताना चमकणारे किंवा वेगळे दिसणारे तुकडे पाहून प्राचीन माणसांना खनिजांची ओळख झाली.

**माहिती खनिजांची**

हळूहळू त्यांना समजले, की ही खनिजे आग लावून किंवा घासून वेगवेगळ्या वस्तूंसाठी वापरता येतात. तेव्हापासून खनिजांचा शोध आणि वापर सुरू झाला.

लोखंड हे अत्यंत महत्वाचे, मजबूत, कठीण आणि पृथ्वीवरील सर्वात जास्त वापरले जाणारे खनिज आहे. त्याचे वैज्ञानिक नाव ऋश आहे. लोखंड जमिनीखाली मोठमोठ्या दगडांच्या रूपात आढळते. हे दगड खाणींतून मोठमोठी यंत्रे



वापरून बाहेर काढले जातात. भारतात लोखंडाच्या खाणी मुख्यतः ओडिशा, झारखंड, छत्तीसगड आणि कर्नाटक या राज्यांत आहेत.

साध्या परिस्थितीत लोखंड सहज विरघळत नाही.पण हवा, पाणी आणि मीठ यामुळे त्याला गंज लागू शकतो.

लोखंडावर प्रक्रिया केल्याशिवाय त्याचा उपयोग होत नाही. आजही काही ठिकाणी लहान साधने, लोखंडी खेळणी किंवा हातात धरायला सोपी वस्तू बनवण्यासाठी साध्या लोखंडाचा उपयोग केला जातो. भारतामध्ये लोखंड शुद्ध करून स्टील बनवण्यासाठी मोठे कारखाने आहेत. जमशेदपूर येथील टाटा स्टील हा भारतातील सर्वात जुना आणि मोठा स्टील कारखाना आहे.त्याशिवाय छत्तीसगड राज्यात भिलाई, ओडिशामधील रुरकेला, आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम आणि कर्नाटकातील भद्रावती हेही महत्त्वाचे लोखंड-स्टील कारखाने आहेत. खाणींतून मिळालेले लोहखनिज या कारखान्यांत तापवून आणि शुद्ध करून स्टील बनवले जाते. त्यानंतर ते गाड्या, पूल, घरे, मशीन, रेल्वे आणि अनेक दैनंदिन वस्तूंमध्ये वापरले जाते.जाते.

## प्राण्यांचं रंजक विश्व

**मि**त्रांनो, पशुपक्ष्यांचं जीवन आपल्यापेक्षा कितीतरी वेगळं असतं. अनोखं असतं. हे जीव आपल्यापेक्षा अगदी वेगळ्या पद्धतीनं



जगतात, म्हणूनच त्यांच्या वेगळ्या जगण्याचा वेध घेणं, त्याबद्दल माहिती मिळवणं ही बाब रंजक आणि ज्ञान वाढवणारी ठरते. आकार-प्रकार, रंग-रूप या प्रत्येक बाबीत प्राणी एकमेकांपेक्षा वेगळे असतात. प्रत्येकाची वेगळी खासियत असते. चला, जाणून घेऊ या प्राणीजगतातल्या काही रंजक बाबी...

**चिवित्र विश्व**


✻ दक्षिण आफ्रिकेत आढळून येणाऱ्या एका प्रजातीतील बेडकांच्या शरीरात इतकं घातक विष असतं की त्यांना स्पर्श केला तरी माणूस मरू शकतो.

✻ आजूबाजूला डास असेल तर गुणगुण कानी पडते आणि आपण बेचैन होतो. हा आवाज नेमका कसा येतो हा एक प्रश्नच असतो. मुलांना हा आवाज असतो त्यांच्या पंख्यांच्या फडफडीचा. डासांचे पंख एका सेकंदात ५०० ते ६०० वेळा फडफडतात.

✻ चकोर हा पाकिस्तानचा राष्ट्रीय पक्षी आहे. याचं वैशिष्टय म्हणजे विषारी अन्न समोर ठेवताच त्याचे डोळे लाल होतात. विषारी अन्न पाहताच त्याचा मृत्यू होतो. म्हणूनच जुन्या काळात राजमहालात राजासाठी बनवण्यात येणारं अन्न विषरहित आहे की नाही हे तपासण्यासाठी या पक्ष्यांना पाळलं जात असे.

✻ चिंचुदरी एका रात्रीत जवळपास ३०० फुट जमीन खोदू शकते. ✻कुत्र्याची श्रवणक्षमता माणसापेक्षा नऊ पट जास्त असते.







## घडवा तुमचं व्यक्तिमत्त्व

**मि**त्रांनो, अभ्यासासोबतच व्यक्तिमत्त्व विकासही तितकाच महत्त्वाचा असतो. शाळेत आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धा तुमच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासात भरच घालत असतात. त्यामुळे अशा स्पर्धांमध्ये तुम्ही भाग घ्यायला हवा. गणपतीत तसंच दिवाळीतही सोसायट्यांमध्ये विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. लहानग्यांसाठी वक्तृत्त्व, गायन, नृत्य, चर्चासत्र, विविध गुणदर्शनसारख्या स्पर्धांचं आयोजन केलेलं असतं. या स्पर्धांमध्ये तुम्ही सहभागी होऊ शकता. सध्या आंतरशालेय स्पर्धांचीही धूम असते. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष तयारी करावी लागते. या स्पर्धांच्या निमित्ताने तुम्ही इतर शाळेतल्या मुलांना भेटू शकता. तुमच्या मित्र-मैत्रिणींची संख्या वाढू शकते.

आंतरशालेय वक्तृत्त्व, गायन, नृत्य, वादविवाद, बुद्धीबळ अशाही स्पर्धा घेतल्या जातात. निबंध स्पर्धांचंही आयोजन केलं जातं. यातून तुम्ही तुमचे विचार मांडू शकता. वादविवाद स्पर्धेत भाग घेतल्याने भांडण न करता स्वत:चा मुद्दा पटवून देण्याचं कौशल्य तुम्ही अंगी बाणवू शकता. वक्तृत्त्व स्पर्धेत भाग घेऊन तुम्ही स्टेजची भीती घालवू शकता.

**फन फॅक्टस**

एखाद्या खेळात प्रवीण असाल तर शाळेच्या संघात सहभागी होऊ शकता. बॅडमिंटन, टेनिससारख्या खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकता. खो-खो, कबड्डीसारख्या खेळांसाठी शाळांचे संघ निवडले जातात. या संघांसाठीच्या निवड चाचणीत तुम्ही सहभागी होऊ शकता. अंगात चपळता असेल तर तुमची निवड होऊशकेल. चित्रकला, हस्तकला येत असेल तर शालेय तसंच राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धांमध्ये सहभागी होता येईल. शाळेतर्फे एखादं मासिक निघत असेल तर त्यात तुम्ही लिखाण करू शकता. त्यामुळे अभ्यासासोबतच व्यक्तिमत्त्व



विकासावरही भर द्या आणि बक्षिसं मिळवण्याचा प्रयत्न नक्की करा.

## स्कँडीनेव्हियन्स माउंटेन रेंज

**स्कँ**डीनेव्हियन्स माउंटेन रेंज ही युरोपमधील खूप सुंदर पर्वतश्रृंखला आहे. ही शृंखला नॉर्वे, स्वीडन आणि काही प्रमाणात फिनलंडमध्ये पसरलेली आहे. ही पर्वतश्रेणी खूप मोठी नाही पण खूप मजबूत आणि सुंदर आहे.नॉर्वे भागात जेंट्स्टिननहे सर्वात उंच शिखर सुमारे २,४६९ मीटर उंच आहे तर स्वीडनमध्ये केबनेका इस्क हे शिखर सुमारे २,०९७ मीटर उंच आहे. हिवाळ्यात या पर्वतांवर बर्फ असतो. उन्हाळ्यात हा बर्फ काही प्रमाणात वितळतो. स्कँडीनेव्हियन्स माउंटेन्समध्ये खूप खोल दऱ्या, नद्या आणि धबधबे आहेत. येथे पर्वतारोहण, स्कीइंग आणि हायकिंग करण्यासाठी उत्तम ठिकाणे आहेत. स्कँडीनेव्हियन्स माउंटेन रेंजमध्ये सांबार जातीची हरणे, लाल कोल्हे, बर्फातले उंदीर, मूस आणि वुल्फ या लांडग्यांच्या जाती आढळतात. तर गरुड आणि हॉर्न्ड आउल यासारखे काही पक्षी



दिसतात. नद्यांमध्ये सालमन, ट्राऊट यासारखे मासे आहेत. या पर्वतांमध्ये सामी हे आदिवासी लोक राहतात. ते मुख्यतः पशुपालन, विशेषतः रेनडियर पालन करतात. हिवाळ्यात ते झोपड्या आणि उबदार घरात राहतात. सामी लोक जेवायला मुख्यतः हरणाचे मांस, मासे, दूध आणि चीज खातात. उन्हाळ्यात ते जंगलातून फळे आणि बेरीज गोळा करतात.

**ओळख पर्वतांची**


सामी लोकांचे जेवण खूप साधे पण पौष्टिक असते. ते त्यांना थंडीत उब आणि ऊर्जा देतं. स्कँडीनेव्हियन्स माउंटेन्सचा निसर्ग आणि लोकसंस्कृती खूप खास आहे. प्राणी, पर्वत, बर्फ आणि आदिवासी लोकांचा सांस्कृतिक जीवन यामुळे हे ठिकाण साहसी प्रवाशांसाठी आणि अभ्यासकांसाठी खूप आकर्षक आहे.

## मुखवटे हत्तीचे

**छो**ट्या दोस्तांनो, गणपती विसर्जनाला किंवा इतर आनंदसोहळ्या प्रसंगी खूप धमाल असते. या दिवशी तुम्ही हत्तीचे मुखवटे घालून फिरू शकता. हे मुखवटे घरच्या घरी तयार करता येतील. कसे करायचे हे मुखवटे? जाणून घेऊ या...

**साहित्य :**

मोठ्या आकाराच्या पेपर प्लेट, ग्रे रंग, ग्रे रंगाचा कार्ड पेपर, रंगीत कागद, सजावटीचं साहित्य, गम, बारीक इलॅस्टिक




**कृती :**

पेपरप्लेट घ्या. तिची मागची बाजू ग्रे रंगाने रंगवून घ्या. हा रंग वाळू द्या. रंग वाळल्यानंतर प्लेटच्या मध्यभागी डोळ्यांचा आकार कापून घ्या. ग्रे रंगाचा कार्ड पेपर घ्या. या कार्डपेपरपासून सोंडेचा आकार कापून घ्या. तसंच हत्तीचे कान कापून घ्या. भारतीय हत्तीचे कान छोट्या आकाराचे असतात. त्यामुळे कानांचा आकार छोटा असू द्या. आता ग्रे रंग दिलेली प्लेट घ्या. ही प्लेट म्हणजे हत्तीचं तोंड आहे. या प्लेटच्या दोन्ही बाजूंना कान चिकटवा. मध्यभागी सोंड चिकटवा. आता हत्तीचं तोंड तयार झालं. तुमच्याकडे असलेला रंगीत कागद घ्या. या कागदापासून त्रिकोण कापा. हा त्रिकोण हत्तीच्या डोक्यावर चिकटवायचा आहे. हा त्रिकोण म्हणजे झूल. या त्रिकोणावर मणी तसंच

**करून तर पहा**

सजावटीच्या इतर वस्तू चिकटवता येतील. आता या पेपरप्लेटच्या दोन्ही बाजूंना छोटं भोक पाडा. त्यात इलॅस्टिक अडकवता येईल. हे मास्क घालून तुम्ही मिरवू शकता.

**ठिपके जुळवा**






**जिज्ञासा**

### ओळखा पाहू...

१) रक्ताभिसरण क्रियेचा शोध कोणी लावला?
२) राष्ट्रीय हक्क दिवस कधी असतो?
३) विजेचा सर्वात उत्तम वाहक कोण?
४) मौर्य काळातली प्रसिद्ध शैक्षणिक संस्था कोणती?
५) एनइएफटीचं पूर्णरूप काय?
६) सर्वात थंड ग्रह कोणता?
७) सर्वात छोटा खंड कोणता?
८) सर्वात मोठ्या पर्वतरांगा कोणत्या?
९) जगातला सर्वात उंच धबधबा कोणता?
१०) जगातलं सर्वात उंच धरण कोणतं?

उत्तर : १) विलियम हार्वे २) १० डिसेंबर ३) खारं पाणी ४) तक्षशिला ५) नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्सफर सिस्टिम ६) नेपच्यून ७) ऑस्ट्रेलिया ८) अँडीज ९) अँजल(व्हेनेझुवेला) १०) जिनपिंग १ (चीन)

## फिटनेसच्या क्षेत्रात...

**दो**स्तांनो, सध्या सगळीकडेच फिटनेसबद्दल जागरूकता निर्माण झाली आहे. लोकांना आपलं आरोग्य टिकवून ठेवायचं आहे. म्हणूनच जीममध्ये जाणाऱ्यांची, डाएट करणाऱ्यांची अजिबात कमतरता नाही. त्यामुळे फिटनेस ट्रेनरना सर्वत्र भरपूर मागणी आहे. या क्षेत्रात तुम्ही उत्तम करीअर घडवू शकता.

फिटनेस ट्रेनर बनण्यासाठी तुम्हाला स्वत:ला फिटनेसची विशेष आवड असणं गरजेचं आहे. तुम्हाला फिटनेसचं महत्त्व असायला हवं. फिटनेस ट्रेनर बनण्यासाठी विशिष्ट शैक्षणिक पात्रतेची गरज असतेच असं नाही पण फिटनेसबाबतचे काही अभ्यासक्रम तुम्ही करू शकता. इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्टस सायन्स, नवी दिल्ली, लक्ष्मीबाई नॅशनल कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यासारख्या संस्थांमधून शारीरिक शिक्षणासंबंधीचे अभ्यासक्रम तुम्ही पूर्ण करू शकता. यासह फिटनेसविषयक अभ्यासक्रम



शिकवणाऱ्या अनेक संस्था देशात आहेत. डाएट अँड न्यूट्रिशनचा अभ्यासक्रमही तुम्ही करू शकता. या क्षेत्राचा सखोल अभ्यास करण्याची तयारी असेल तर पीएचडीही करता येईल.

या क्षेत्रात संधींची अजिबात कमतरता नाही. फिटनेसचं क्षेत्र झपाट्याने विस्तारत आहे. त्यातच शहरी भागात जीवनशैलीशी संबंधित विकारांच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्याकडे लक्ष देण्याचं प्रमाण बरंच वाढताना दिसत आहे. तरूणांमध्येही फिटनेसबाबत जागरूकता

**कोण होणार ?**

वाढताना दिसते आहे. सरकारी तसंच खाजगी क्षेत्रात नोकरीच्या संधी मिळू शकतात. पुरेशा अनुभवानंतर तुम्ही स्वत:चा व्यवसाय सुरु करू शकता. वैयक्तिक सल्लागार म्हणूनही काम करता येईल. फिटनेस ट्रेनर म्हणून तुम्ही वेगवेगळ्या भूमिका पार पाडू शकता.

**खादाडी**

### नूडल अँण्ड चीझ

सणासुदीला गोड गोड खाऊन कंटाळा येतो. काही तरी चमचमीत खावंसं वाटतं. अशा वेळी तुम्ही नूडल्स विथ चीज ही रेसिपी बनवू शकता. यासाठी एक कप नूडल्स घ्या. एक कप दूध, मीठ आणि मीरपूड आणि चीझ असे पदार्थ घ्या. नूडल्स शिजवून घ्या. पाणी काढून टाका. एका कढईत दूध घाला. गरम झाल्यानंतर त्यात चीज घालून गरम करा. यात नूडल्स घाला. वरून मीठ आणि मिरपूड घाला आणि मस्तपैकी खा.



**टेक ग्यान**

### मोबाईल चार्ज करताना

दोस्तांनो, तुम्ही लॅपटॉपला वायर जोडून मोबाईल चार्ज करता का? ही चुकीची पद्धत आहे. अशा प्रकारे मोबाईल चार्ज केला तर त्यातली माहिती हॅक होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारे मोबाईल चार्ज करण्याआधी थोडा विचार करा.



**दोस्त हे मस्त**

### भेटा टकिनला

मित्रांनो, प्रत्येक देशाचा एक राष्ट्रीय प्राणी असतो. टकिन हा भूतानचा राष्ट्रीय प्राणी आहे. टकिन हा बकऱ्यांच्या प्रजातीचा प्राणी आहे. हे प्राणी साधारण २० जणांच्या कळपात राहतात. उन्हाळ्यात ३०० जणांचा कळपही तयार होतो. टकिन डोंगराळ तसंच गवताळ भागात आढळतो. अरुणाचल प्रदेश तसंच चीनमध्येही टकिन आढळतो. शिकार आणि अधिवासाची कमतरता यामुळे टकिनची संख्या कमी कमी होताना दिसत आहे. त्यांचं संरक्षण करणं गरजेचं झालं आहे.



**समाजभान**

### बी इको फ्रेंडली

दोस्तांनो, सण-उत्सवांचा आनंद लुटताना पर्यावरणाचं भान राखणंही गरजेचं आहे. गणपतीत तुम्ही पर्यावरणाचा जागर केला. आता येणाऱ्या उत्सवांमध्येही अशी काळजी घेता येईल. दिवाळीत तुम्ही कमी फटाके फोडू शकता. नवरात्रीत लाउडस्पीकरचा आवाज कमी ठेऊ शकता. गणपतीचं निर्माल्य कलशात टाकण्याचा निर्धार करा. अशा प्रकारे सण-उत्सव साजरे करताना पर्यावरणाचं भान राखलं जाईल.



# निवडक

## ॲथलेटिक्समध्ये घनश्याम मशिलकरांना दोन पदके

**रसायनी :** सातवी सिनियर सिटीझन ओपन नॅशनल ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा सच्छिंद्राबाद हैद्राबाद उनमैय्या युनिव्हर्सिटी ॲथलेटिक्स ग्राऊंड येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये रसायनीतील रिस कांबे गावचे रहिवासी घनश्याम श्रीकृष्ण मशिलकर यांनी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड पाताळगंगा यांच्यातर्फे खेळून रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले आहे. त्यांनी रायगड जिल्ह्याचे नाव हैद्राबादपर्यंत पोहोचवण्याचा मान मिळविला आहे. घनश्याम श्रीकृष्ण मशिलकर यांनी ५५ वर्षांवरील गटात लांब उडी, तिहेरी उडी, सुवर्णपदक, तर गोळा फेकमध्ये कांस्यपदक पटकावून नावलौकिक केले आहे. मान्यवरांच्या हस्ते त्यांना पदक देऊन सन्मानित करण्यात आले. यामुळे घनश्याम श्रीकृष्ण मशिलकर यांनी रसायनीसह रायगड जिल्ह्याचे नावलौकिक केले आहे. त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## पैशासाठी नको, देशासाठी खेळा!



कपिल देव यांच्या खेळाडूंना कानपिचक्या

**नवी दिल्ली :** प्रत्येकाला पैसा हवाय, परंतु आयपीएलपेक्षा देशासाठी खेळणे महत्त्वाचे आहे, अशा शब्दात भारतीय संघाचे माजी कर्णधार कपिल देव यांनी खेळाडूंना कानपिचक्या दिल्या आहेत. गेल्या काही महिन्यांपासून भारतीय क्रिकेट संघाचं प्रदर्शन अत्यंत सुमार दर्जाचं राहिलं आहे. भारताला अनेक कसोटी मालिकेत पराभवाचा सामना करावा लागला. याशिवाय टी-२० मालिकेतही पराभवाची चव चाखावी लागली आहेत. भारतीय संघाच्या सुमार कामगिरीवर बोट ठेवत त्यांनी मार्गदर्शनही केले. भारतीय संघाच्या कामगिरीनंतर कर्णधार आणि प्रशिक्षकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. अशातच कसोटी आणि टी-२० साठी वेगळे प्रशिक्षक असावेत का? अशी चर्चाही क्रिकेट वर्तुळात सुरु आहे. यावर कपिल देव यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, ''दोन प्रशिक्षक असावे की नाही हे मला माहिती नाही. मी याचे स्पष्ट उत्तर देऊ शकत नाही. अशा गोष्टींबाबत नीट विचार करावा लागतो. भारतीय क्रिकेटसाठी जे चांगले, तेच करायला हवे''. पुढे बोलताना ते म्हणाले, टी-२० लीगच्या वाढत्या आकर्षणामुळे खेळाडू राष्ट्रीय संघापेक्षा फ्रँचायझीला प्राधान्य देत आहेत. सगळ्यांना पैसा आवडतो, पण काहींसाठी तो अतिशय महत्त्वाचा असतो.

## भारताचा फायनलचा मार्ग अवघड!

**नवी दिल्ली :** भारतीय संघाचे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या फायनलमध्ये पोहोचण्याचे स्वप्न धुळीस मिळाल्यात जमा झाले आहेत. न्यूझीलंडने शुक्रवारी वेस्ट इंडिजवर दुसऱ्या कसोटीत ९ विकेट्स राखून विजय मिळवला. न्यूझीलंडच्या या विजयामुळे भारतासह पाकिस्तानलाही मोठा धक्का बसला आहे. किवींनी ५७ धावांचे लक्ष्य १ विकेट्सच्या मोबदल्यात सहज पार केले. या विजयासह न्यूझीलंडने चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे आणि पाकिस्तान व भारत यांची घसरण झाली आहे.वेस्ट इंडिजच्या पहिल्या डावाच्या २०५ धावांच्या प्रत्युत्तरात न्यूझीलंडला ९ बाद २७८ धावांवर डाव घोषित करावा लागला. त्यांचा गोलंदाज ब्लेअर टिकनर दुखापतीमुळे खेळू शकला नाही. त्याने पहिल्या डावात ४ विकेट्स घेतल्या होत्या. विंडीजला दुसऱ्या डावात १२८ धावा करता आल्या. जेकब डफीने ५, तर मिचेल राएने ३ विकेट्स घेतल्या. किवींसमोर ५७ धावांचे माफक लक्ष्य विंडीजला ठेवता आले. १० षटकांत त्यांनी ते पार केले. २०२७ जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा संघ आतापर्यंत अपराजित आहे आणि पाच सामने जिंकून ते तालिकेत १०० टक्क्यांसह अव्वल स्थानी आहेत. गतविजेत्या दक्षिण आफ्रिकेने भारत दौऱ्यावर २-० असा दणदणीत विजय मिळवून ७५ टक्के मिळवून दुसरे स्थान पटकावले आहे. श्रीलंका ६६.६७ टक्क्यांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. न्यूझीलंड विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातल्या दुसऱ्या कसोटीपूर्वी पाकिस्तान (५० टक्के) व भारत (४८.१५ टक्के) अनुक्रमे चौथ्या व पाचव्या क्रमांकावर होते. आता दोन्ही संघ एक स्थान खाली घसरले आहेत. न्यूझीलंड ६६.६७ टक्क्यांसह चौथ्या क्रमांकावर आला आहे. विंडीजचा संघ ४.७६ टक्क्यांसह नवव्या क्रमांकावर आहे. भारतीय संघाला आता एकूण ९ कसोटी सामने खेळायचे आहेत आणि त्यापैकी ७ सामने जिंकल्यास भारताची टक्केवारी ६२.९६ इतकी होणार आहे.

## विनेश फोगाटचा निवृत्तीचा निर्णय मागे



ऑलिम्पिकमध्ये खेळणार असल्याचे जाहीर

**नवी दिल्ली :** भारताची महिला कुस्तीपटू विनेश फोगाटने २०२४ मध्ये झालेल्या पॅरिस ऑलिम्पिकनंतर कुस्तीतून निवृत्तीची घोषणा केली होती. मात्र, आता तिने या निर्णयावरून यू-टर्न घेतला आहे. आपण निवृत्तीचा निर्णय मागे घेत असल्याचं जाहीर करत २०२८ मध्ये होणाऱ्या ऑलंपिक स्पर्धेत आपण खेळणार असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे विविध चर्चांनाही उधाण आलं आहे. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये विनेश अंतिम फेरीत पोहोचली होती. मात्र, ५० किलो वजनी गटात खेळताना तिचं वजन १०० ग्रॅम जास्त निघालं होतं. त्यामुळे तिला अंतिम फेरीतून बाद करण्यात आलं होतं. या निर्णयानंतर ती मानसिकदृष्ट्या खचली होती. तसेच आपण कुस्तीतून निवृत्ती घेत असल्याचं जाहीर केलं होतं. मात्र, आता तिने हा निर्णय मागे घेतला आहे. विनेश फोगाटने सोशल मीडियावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. लोक सतत विचारत होते, पॅरिस ऑलिम्पिक माझी शेवटची स्पर्धा होती का? बराच काळ माझ्याकडे याचे उत्तर नव्हते. मला मॅटपासून, दबावापासून, अपेक्षांपासूनअगदी स्वतःच्या महत्त्वाकांक्षांपासूनही दूर जाण्याची गरज होती. अनेक वर्षांनी पहिल्यांदा मी स्वतःला शांतपणे श्वास घेऊ दिला. हृदय तुटणे, त्याग माझ्या त्या अनेक रूपांना जगाने कधी पाहिलंच नाही, असं तिने या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

# भारताचा लाजिरवाणा पराभव

**● यमजान दक्षिण आफ्रिकेचा दणदणीत विजय ● पाच सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी**



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

पहिल्या टी-२० सामन्यातील लाजिरवाण्या पराभवानंतर दक्षिण आफ्रिकेच्या संघाने टीम इंडियावर पलटवार करत दुसऱ्या टी-२० सामना जिंकला आहे. या सामन्यातील विजयासह पाहुण्या संघाने पाच सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरीत साधली आहे. दुसऱ्या बाजूला भारतीय संघावर आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये धावांच्या दृष्टीने घरच्या मैदानात सर्वात मोठ्या पराभवाची नामुष्की ओढावली.

दक्षिण आफ्रिकेनं ठेवलेल्या २०० पार धावसंख्येचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. सलामीवीर शुभमन गिल आणि अभिषेक शर्मा स्वस्तात माघारी फिरला. कर्णधार सूर्या पुन्हा फंदाजीत अपयशी ठरला. तिलक वर्माचे अर्धशतक वगळता एकाही फलंदाजाला लौकिकाला साजेसा खेळ करता आला नाही. परिणामी, भारतीय संघ २० व्या षटकातील पहिल्याच चेंडूवर १६२ धावांवर ऑलआऊट झाला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने ५१ धावांनी सामना जिंकत मालिका सहजा सहजी सोडणार नाही, याचे संकेत दिले. भारताकडून तिलक वर्मानं ३४ चेंडूत २ चौकार आणि ५ षटकाराच्या मदतीने ६२ धावांची सर्वोच्च खेळी केली.

दक्षिण आफ्रिकेनं सेट केले २०० पार धावांचे टार्गेट पंजाब येथील न्यू चंदीगड येथील मुल्लानपूरच्या महाराजा यादविंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या संघाने निर्धारित २० षटकात ४ बाद २१३ धावा करत टीम इंडियासमोर २१४ धावांचे विक्रमी धावांचे टार्गेट सेट केले होते. आतापर्यंत टी-२० क्रिकेटमध्ये भारतीय संघाने एवढ्या धावांचा यशस्वी पाठलाग कधीच केलेला नव्हता. यावेळीही ते साध्य झालं नाही.

दक्षिण आफ्रिकेकडून क्विंटन डी कॉक याने ४६ चेंडूत ९० धावांची धमाकेदार खेळी केली. याशिवाय कर्णधार मार्करमनं २६ चेंडूत केलेल्या २९ धावा आणि अखेरच्या षटकात फेरा ३० (१६) आणि डेविड मिलर २०(१२) यांच्या तुफान फटकेबाजीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेच्या संघाने २१३ धावांपर्यंत मजल मारली होती. भारताकडून गोलंदाजीत वरुण चक्रवर्तीनं घेतलेल्या २ विकेट्सशिवाय अक्षर पटेलनं एक विकेट घेतली.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाने फलंदाजीनंतर गोलंदाजीतही केली कमालीची कामगिरीभारतीय संघासमोर मोठे आव्हान ठेवल्यावर दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी सर्वोत्तम कामगिरी करून दाखवत टीम इंडियाला ठराविक अंतराने धक्यावर धक्के दिले. ओटनील बार्टमन याने ४ षटकात २४ धावा खर्च करून दक्षिण आफ्रिकेकडून सर्वोत्तम कामगिरी केली. त्याच्याशिवाय लुंगी एनिगडी, मार्को यान्सेन आणि लुथो सिपामला यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या.

**आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये भारतीय संघाच्या पदरी आलेले मोठे पराभव**

८० धावा विरुद्ध न्यूझीलंड, वेलिंग्टन (२०१९)
५१ धावा विरुद्ध दक्षिण आफ्रिका, मुल्लानपूर, (२०२५)
४९ धावा विरुद्ध ऑस्ट्रेलिया, ब्रिजटाऊन (२०१०)
४९ धावा विरुद्ध इंदूर, (२०२२)
४७ धावा विरुद्ध न्यूझीलंड, नागपूर, (२०१६)

## संकेत म्हात्रेंची भरीव कामगिरी



| पेण | प्रतिनिधी |

५० वी कोकण परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धा रत्नागिरी येथे सुरू असून, या स्पर्धेमध्ये कळंबोली नवी मुंबई पोलीस ठाण्याचे जलतरणपटू संकेत केशव म्हात्रे यांनी भरीव कामगिरी करत दोन सुर्वण व एका कांस्यपदकाची कमाई केली आहे.

पोलीस खात्याकडून दरवर्षी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. दि. ८ ते १३ डिसेंबर या वर्षाच्या क्रीडा स्पर्धा रत्नागिरी येथे घेण्यात येत आहेत. यामध्ये सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर या जिल्ह्यांच्या पोलीस खात्यातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये जलतरण स्पर्धेमध्ये पेण तालुक्यातील पाटणेश्वर गावचे सुपुत्र तथा कळंबोली नवी मुंबई पोलीस ठाण्याचे हवालदार संकेत म्हात्रे यांनी जलतरणच्या ५० मीटर फ्री स्टाईलमध्ये सुवर्णपदक, १०० मीटर फ्री स्टाईल सुवर्णपदक, ४ बाय १०० मीटर आयएम रीलेमध्ये कांस्यपदक पटकाविले आहे. त्यांच्या या यशाबद्दल कळंबोली नवी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांकडून तसेच पाटणेश्वर ग्रामस्थांकडून अभिनंदन केले जात आहे.

## मेस्सी भारत दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** जगातील महान फुटबॉल खेळाडूंपैकी एक मानला जाणारा लिओनेल मेस्सी उद्यापासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहे. १३, १४ आणि १५ डिसेंबर रोजी तो भारतात असेल. २०११ नंतर मेस्सीचा हा पहिलाच भारत दौरा असल्याने चाहते त्याला भेटण्यासाठी, त्याची एक झलक पाहण्यासाठी आधीच उत्सुक आहेत. तीन दिवसांत मेस्सी कोलकाता, हैदराबाद, मुंबई आणि नवी दिल्ली या चार प्रमुख शहरांना भेट देणार आहे. या दौऱ्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे हा दौरा नवी दिल्लीत संपेल. यावेळी मेस्सी पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही भेटेल. विशेष म्हणजे मेस्सीचे सहकारी लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डी पॉल हे देखील या दौऱ्यात असतील. मुंबईतील कार्यक्रमांमध्ये हे दोन्ही दिग्गज मेस्सीसोबत सहभागी होणार आहेत. कोलकातामध्ये मेस्सीचे स्वागत करण्यासाठी बॉलिवूड सुपरस्टार शाहरुख खानने या कार्यक्रमात उपस्थित असेल.

## वैभव सूर्यवंशीने धू-धू धुतलं



| नवी दिल्ली | प्रतिनिधी |

टीम इंडियाची जर्सी घालताच वैभव सूर्यवंशीने पुन्हा एकदा आपल्या तुफानी कामगिरी धमाका केला. यावेळी वनडे फॉर्मेटमधील अंडर-१९ आशिया कपमध्ये वैभवने तांडव घातला. दुबईत भारत आणि यूएई यांच्यातील सामन्यात वैभवने तुफानी कामगिरी करत यूएईच्या गोलंदाजांना धू-धू धुतलं. कर्णधार आयुष म्हात्रे फक्त ४ धावांवर बाद झाल्यानंतर १४ वर्षांच्या या पठ्ठ्याने जबाबदारी हाती घेतली. कोणतीही घाई न करता, अप्रतिम संयम राखत त्याने फटकेबाजीची आतषबाजी केली आणि केवळ ५६ चेंडूमध्ये शतक ठोकले.

५६ चेंडूमध्ये ठोकले शतक यूएईविरुद्धच्या या सामन्यात वैभव सूर्यवंशीने फक्त ५६ चेंडूमध्ये शतक झळकावले.

या दरम्यान त्याने ९ षटकार आणि ५ चौकार मारत गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. त्याआधी त्याने आपले अर्धशतक फक्त ३० चेंडूमध्ये पूर्ण केले होते. या शतकी खेळीमुळे वैभव अंडर-१९ आशिया कपच्या इतिहासातील सर्वात कमी वयात शतक करणारा खेळाडू ठरला. वैभव सूर्यवंशीच्या या तडाखेबंद खेळी चर्चा सर्वत्र होत आहे.

### चौकार-षटकारांची बरसात, ठोकलं शतक

**सर्वात कमी वयात शतक ठोकणारा खेळाडू**

वैभव सूर्यवंशीने हे शतक १४ वर्षे २६० दिवसांच्या वयात झळकावून नवा विक्रम रचला. तो आता या स्पर्धेत सर्वात कमी वयात शतक ठोकणारा पहिला फलंदाज ठरला. यूएई 'ए' संघाविरुद्धही हे त्याचे पहिलाच शतक होते. तर युथ वनडेमध्ये त्याच्या कारकिर्दीतील हे दुसरे शतक आहे. यापूर्वी त्याने इंग्लंडविरुद्धच्या युथ वनडेमध्ये शतक झळकावले होते.

**२०२५ मध्ये सूर्यवंशीची कामगिरी**

- आयपीएलमधील शतक
- इंग्लंडमधील युवा एकदिवसीय सामन्यात शतक.
- ऑस्ट्रेलियातील युवा कसोटीत शतक.
- भारत अ संघासाठी ३२ चेंडूत शतक.
- सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये शतक.
- १९ वर्षांखालील आशिया कपमध्ये भारतासाठी शतक.

## श्रमिक जिमखाना मैदानावर रंगणार उपांत्य फेरीच्या लढती



| मुंबई | प्रतिनिधी |

अमर हिंद, डॉ. शिरोडकर, शिवशक्ती महिला यांनी महिलांत, तर जय भारत, अंकुर स्पोर्ट्स् यांनी पुरुषांत आंबेकर चषक कबड्डी स्पर्धेत उपांत्य फेरीत धडक दिली. राष्ट्रीय मिल मजदूर संघ, मुंबई यांच्या विद्यमाने ग.दि. आंबेकर सप्ताहनिमित्त अध्यक्ष आमदार सचिन अहिर यांच्या मार्गदर्शनाखाली ना.म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे या विविध गटातील कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

तिसऱ्या दिवशी झालेल्या महिलांच्या उप उपांत्य सामन्यात अमर हिंद मंडळाने श्री स्वामी समर्थ मंडळाचा कडवा प्रतिकार २५-२३ असा मोडून काढला. साईक्षा पेडणेकर, रिया मांड यांनी आक्रमक सुरुवात करीत पूर्वार्धात अमर हिंदला १७-०८ अशी आघाडी मिळवून दिली होती. उत्तरार्धात श्री स्वामी समर्थच्या लेखा शिंदे, आर्या रावळ, सई शिंदे यांनी आपला खेळ उंचावत संघाच्या विजयाच्या आशा पल्लवीत केल्या. पण त्यांना वेळेचे गणित साधता न आल्याने ३गुणांच्या निसटत्या फरकाने पराभवाचा सामना करावा लागला. दुसऱ्या सामन्यात उपांत्य फेरी गाठताना डॉ. शिरोडकर संघाने भारतमाता स्पोर्टस् चा ५१-२१ असा सहज पाडाव केला. मध्यंतराला ३५-०९ अशी आघाडी घेणाऱ्या शिरोडकरने नंतर सावध खेळ करीत आपला विजय सोपा केला. रुचिता पटेल, वैष्णवी जाधव यांच्या चढाई पकडीच्या झंझावाती खेळाला या मोठ्या विजयाचे श्रेय जाते. भारतमाताची रिया मोहेरेलिया चमकली.

शिवशक्ती महिला संघाने गोलफादेवी प्रतिष्ठानवर ४२-१३ अशी मात करीत उपांत्य फेरी गाठली. पहिल्या डावात २ लोण देत २३-०४ अशी आघाडी घेणाऱ्या शिवशक्तीने दुसऱ्या डावात आणखी एक लोण देत २९ गुणांच्या फरकाने सामना आपल्या नावे केला. शुभदा खोत, रिया मडकईकर, अक्षता पाटील यांच्या चतुरस्त्र खेळाने शिवशक्तीने ही किमया साधली. जय भारत मंडळाने पुरुषांत उपांत्य फेरी गाठताना शिवशक्ती मंडळावर २७-१४ असा विजय मिळविला. आकाश केसरकर जय भारतकडून, तर साई चौगुले शिवशक्ती कडून उत्तम खेळले.

## मनत्रा क्रिकेट क्लबने जिंकली ट्रॉफी



| पनवेल | प्रतिनिधी |

नवी पनवेल येथील दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमीच्या मैदानावर नुकत्याच झालेल्या पहिल्या 'रामशेठ ठाकूर कप' अंडर१६ क्रिकेट स्पर्धेत मनत्रा क्रिकेट क्लबने उत्कृष्ट कामगिरी करत एमसीसी (ठाणे) संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले.

दरम्यान, खेळाडूंना मार्गदर्शन करताना भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर म्हणाले, ''Learn to play long innings. Discipline, Dedication & Determination ही तीन गुणवैशिष्ट्ये तुम्हाला खेळात अधिक उंचीवर घेऊन जातील.'' वेंगसरकर यांनी प्रशिक्षक अमित जाधव, किरण ठाकूर, पंडलिक पोटेकर, संदीप पवार आणि कृष्णा बालू यांच्या काटेकोर नियोजनामुळे स्पर्धा सुरळीत पार पडल्याचे सांगितले. तसेच उत्कृष्ट खेळपट्टी तयार केल्याबद्दल ग्राऊंड्समनचेही त्यांनी विशेष कौतुक केले. स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग घेतला. पारितोषिकांचे उद्योजक व क्रिकेटप्रेमी राजू गुप्ते यांच्या हस्ते करण्यात आले.

**२० संघांमध्ये खेळवणार ५५ सामने | गुरुवारपासून तिकीट विक्री सुरू**

# विश्वचषकाचा थरार अवघ्या १०० रुपयांत




| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आगामी फेब्रुवारी-मार्च महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकाचा थरार सामान्य क्रिकेटप्रेमींनाही अनुभवता यावा म्हणून आयसीसीने अवघ्या १०० रुपयांत तिकिटे उपलब्ध करून दिली आहेत. गुरुवारी तिकीट विक्रीचा पहिला टप्पा सुरू होताच क्रिकेटप्रेमींचा उत्साह केवळ भारतीय संघाच्या सामन्यालाच दिसला. १५ फेब्रुवारीला कोलंबोत होणारा भारत-पाकिस्तान यांच्यातील लढतींची तिकिटे तासाभरात विक्री झाली. एवढेच नव्हे तर, सुपर-एटमधील भारताचे पहिल्या गटातील अव्वल स्थान मानत क्रिकेटप्रेमींनी तिकिटे काढल्याचे दिसून आले आहे.

आजपासून आयसीसी टी-२० वर्ल्ड कपची तिकीट विक्रीचा पहिला टप्पा सुरू झाला. त्यात उपांत्य फेरी आणि अंतिम सामना वगळता सर्व तिकिटे उपलब्ध करून देण्यात आली होती. २० संघांचा सहभाग असलेल्या वेगवान क्रिकेटमध्ये एकूण ५५ सामने खेळविले जाणार आहेत. त्यापैकी ५३ सामन्यांची तब्बल २० लाख तिकिटे विक्रीसाठी उपलब्ध झाली आहेत. भारतातील सामन्यांचे किमान तिकीट १०० रुपये, तर श्रीलंकेतील सामन्यांचे तिकीट १००० लंकन रुपये ठेवण्यात आले आहे.

**चाहत्यांच्या पर्यटनाचीही काळजी**

क्रिकेट स्पर्धेदरम्यान पर्यटनाचाही आनंद लुटता यावा म्हणून अनेक संघाच्या साखळी लढती एका किंवा दोन शहरांमध्ये विभागण्यात आल्या आहेत. म्हणजे, सामन्यांच्या विश्रांतीदरम्यान क्रिकेटप्रेमींना पर्यटनाचाही आस्वाद घेता येईल. आयसीसीने चाहत्यांच्या पर्यटनाची चांगलीच काळजी घेतली असून, नेपाळी संघाच्या सर्व लढती मुंबईत खेळविल्या आहेत. तसेच ऑस्ट्रेलियाचे सर्व साखळी सामने लंकेत असतील. पाकिस्तानही आपले सर्व सामने श्रीलंकेतच खेळणार आहे. बांगलादेश आणि इटली आपल्या तीन-तीन लढती कोलकात्यात खेळतील. न्यूझीलंडच्याही तीन साखळी लढती चेन्नईत रंगणार आहेत. यूएईचा संघ दिल्ली मुक्कामी तीन सामने खेळेल. या विचारपूर्वक कार्यक्रमामुळे यंदा परदेशी पर्यटक चांगल्या संख्येने स्पर्धेत येण्याची शक्यता आयसीसीने वर्तवली आहे.

> क्रिकेटचे सामने परवडणाऱ्या किमतीत सर्वांना पाहता यावेत म्हणून तिकिटांचे दर १०० रुपयांपासून सुरू केले आहेत. चाहता कोणताही असो, कोणत्याही पार्श्वभूमीचा असो, त्याला जागतिक दर्जाच्या क्रिकेटचा थरार प्रत्यक्ष स्टेडियममध्ये अनुभवता आला पाहिजे, असे आमचे प्रामाणिक मत आहे. तिकिटांचे दर कमी असल्यामुळे नवख्या संघांच्या लढतींनाही प्रेक्षक मोठ्या संख्येने येतील, अशी अपेक्षा आहे.
> – संजोग गुप्ता, सीईओ, आयसीसी

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)